


हडपसर रेल्वे स्थानकाला 'हायटेक साज'...!

P४

● पुणे, बुधवार, २३ जुलै २०२५ ● RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 235 ● वर्ष ४ थे, अंक २३५ ● किंमत ₹ ६ ● पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com *Beyond The News*



इंग्लंडची ती 'चूक' भारताच्या पथ्यावर पडणार

१२

**At a Glance**

### काँग्रेसला मोठा धक्का

**नवी दिल्ली :** मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला करवादात मोठा धक्का बसला आहे. प्राप्तिकर अपील लवादाने (आयटीएटी) १९९ कोटी रुपयांच्या उत्पन्नावरील कर मागणी प्रकरणी काँग्रेसचे अपील फेटाळून लावले आहे. २०१७-१८ आणि २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून प्रलंबित असलेल्या १९९ कोटी रुपयांच्या उत्पन्नावरील कर मागणीत काँग्रेसला कोणताही दिलासा मिळणार नाही, असेही लवादाने स्पष्ट केले. प्राप्तिकर विवरणपत्र भरण्यास उशीर आणि रोख देणगी मर्यादेचे उल्लंघन केल्यामुळे प्राप्तिकर अपील लवादाने (आयटीएटी) पक्षाचा सवलतीचा दावा फेटाळून लावला आहे. न्यायाधिकरणाने आपल्या निकालात » पान ७ वर

# विश्वासाचा हात असू दे...

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून हटके शुभेच्छा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा आज वाढदिवस आहे. अशात राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या दोन्ही सहका-यांना 'एक्स'वर पोस्ट करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना 'विश्वासाचा हात असू दे, मैत्रीचा सहवास असू दे', असे म्हणत शुभेच्छा दिल्या आहेत. एकनाथ शिंदे यांच्या या पोस्टची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे.



आपल्या पोस्टच्या सुरुवातीला एकनाथ शिंदे यांनी, "विश्वासाचा हात असू दे, मैत्रीचा सहवास असू दे, महाराष्ट्राच्या उद्धाराचा रात्रंदिन हा ध्यास असू दे. महाराष्ट्राच्या विकासयात्रेचे बिनीचे शिलेदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जन्मदिनाच्या उदंड शुभेच्छा!", असे म्हटले आहे.

ते म्हणाले की, "सर्व साथीदारांना खंबीरपणे पुढे नेणारे महायुतीचे अव्वल » पान ७ वर

### एकमुखाने कर्जमाफी जाहीर करा – रोहिणी खडसे

● या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी दोन्ही नेत्यांना एकत्र शुभेच्छा दिल्या आहेत. इतकेच नाही तर शेतक-यांच्या कर्जमाफीची अपेक्षा देखील व्यक्त केली आहे. आपल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, "देवेंद्रजी, अजित दादा... काय योगायोग आहे बघा! एकेकाळचे विरोधी एक झाले. एकाच सरकारमध्ये एकत्र महत्त्वाची पदे सांभाळतात. बरं, दोघांचे वाढदिवसही एकच! म्हणून तुम्हाला एकत्र वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! चला, आता आज एकमुखाने शेतकरी बांधवांना कर्जमाफी जाहीर करा आणि शेतक-यांना हा दुग्धशर्करा योग साजरा करू द्या!"

# गदिमांप्रमाणे कोथरुडमध्ये 'बाबूजीं' चेही होणार स्मारक

## नामदार चंद्रकांतदादा पाटील यांची सूचना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गदिमांप्रमाणे कोथरूड मध्ये सुधीर फडके अर्थात बाबूजींचे स्मारक उभारण्यासाठीचा प्रस्ताव तयार करा, अशी सूचना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आणि कोथरुडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील यांनी महापालिका आयुक्तांना केले आहे.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने गीतरामायणाचे कवी ग. दि. माडगूळकर यांचे स्मारक कोथरुड मध्ये उभारण्यात येत आहे. त्याचप्रमाणे गीतरामायणाचे संगीतकार असलेल्या सुधीरजी फडके यांच्या कार्यास साजेसे स्मारक कोथरुडमध्ये झाल्यास ते अधिक संयुक्तिक होईल. या दोन महान शिल्पकारांची स्मृती जतन करण्याची संधी यानिमित्ताने पुणे



महानगरपालिकेला मिळणार आहे. चांदणी चौक परिसर रस्ते विकासामुळे आणि बंगलोर-मुंबईकडे जाणारा राष्ट्रीय महामार्ग कोथरुडजवळूनच जात असल्यामुळे हे स्मारक कोथरुड परिसरातच होणे आवश्यक वाटते.

यामुळे शहरातील वाहतुक या अडचणीशिवाय संपूर्ण राज्यातील आणि देशभरातील रसिकांना तसेच मान्यवर मंडळींना » पान ७ वर

# उद्धव ठाकरेंची मुख्यमंत्र्यांवर स्तुतीसुमने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** देवेंद्र फडणवीस हे अतिशय हुशार राजकारणी असून भविष्यात त्यांना केंद्रात मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे, असं सांगत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर कौतुकाचा वर्षाव केला. समोर आलेल्या आव्हानांवर आपल्या अभ्यासू आणि मुत्सद्दी स्वभावाने मात करुन त्यांनी आपली विश्वासार्हता वाढवली, असं उद्धव ठाकरे म्हणाले. देवेंद्र फडणवीसांची प्रतिमा ही एक गतिमान, अभ्यासू आणि पक्षनिष्ठ राजकारणी अशी आहे, असंही ते म्हणाले. मंत्री गिरीश महाजन यांच्या



पुढाकाराने 'महाराष्ट्राचा नायक' हे कॉफी टेबल बुक प्रकाशित करण्यात आलं आहे. त्यामध्ये उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीसांच्या राजकीय प्रवासावर आणि त्यांच्या कामगिरीवर भाष्य केलं.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. 'महाराष्ट्राचा नायक' या कॉफी टेबल बुकमधून ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे, नितीन गडकरींसह अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी त्यांच्या राजकीय प्रवासाचे कौतुक केलं आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्राच्या राजकारणात गंगाधरराव फडणवीस यांनी एक आदर्श राजकारणी म्हणून आपली प्रतिमा निर्माण केली होती. हा वारसा अतिशय मेहनतीने आणि समर्थपणे चालवण्याचे कार्य देवेंद्र गंगाधरराव फडणवीस करत आहेत. देवेंद्र आज महाराष्ट्राचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत. त्यांच्या » पान ७ वर

### रोहित पवारांकडून कोकाटेंचा नवीन व्हिडीओ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सभागृहात चालू कामकाजात रमी खेळल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आजपर्यंत एक रुपयाची रमी खेळलो नाही. मला रमी खेळता येत नाही, असे म्हणत त्याच्यांवर होत असलेल्या आरोप धूडकावून लावले आहेत. याविषयी त्यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेत व्हायरल होणाऱ्या व्हिडीओचे स्पष्टीकरण दिले आहे.

शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी कृषिमंत्री सभागृहात रमी गेम खेळत असल्याचा आरोप करत एक्सवरून पोस्ट » पान ७ वर

# वाल्मिक कराडचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** राज्यभर गाजलेल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणावर मंगळवारी (२२ जुलै) सुनावणी पार पडली. यामध्ये आरोपी वाल्मिक कराडचा दोषमुक्तीचा अर्ज न्यायालयानं फेटाळला आहे. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ही ४ ऑगस्ट रोजी होणार आहे. याबाबतची माहिती विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी दिली आहे.

विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी आज



न्यायालयात भक्कम बाजू मांडली. या सुनावणीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितलं की, "आरोपी वाल्मिक कराडनं संतोष देशमुख खून खटल्यातून मला दोषमुक्त करावं, असा अर्ज सादर केला होता. मात्र, हा अर्ज न्यायालयानं फेटाळून लावला आहे. त्याचप्रमाणे, दुसरा आरोपी विष्णू चाटे यासह इतर सर्व आरोपींनी देखील आम्हाला या खटल्यातून वगळण्यात यावं, दोषमुक्त करण्यात यावं, असे अर्ज न्यायालयात सादर केले होते. या सर्व अर्जांवर आम्ही जोरदार हरकत घेतली. तसंच, न्यायालयाला हे स्पष्टपणं सांगितलं की, ही आरोपींची 'मोडस ऑपरेंडी' आहे. खटल्यात विलंब करण्याची आणि » पान ७ वर





## शहर पोलिस दलातील १२ निरीक्षकांच्याअंतर्गत बदल्या

**पुणे :** शहर पोलिस दलातील १२ पोलिस निरीक्षकांच्या प्रशासकीय कारणास्तव अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पाच पोलिस ठाण्यांतील वरिष्ठ निरीक्षकांचा समावेश आहे. पोलिस निरीक्षकाचे नाव, सध्याचे ठिकाण आणि कंसात नव्याने नेमणूक झालेले ठिकाण : संतोष पांढरे- गुन्हे शाखा (वरिष्ठ निरीक्षक, विश्रामबाग पोलिस ठाणे), विठ्ठल पवार- उत्तमनगर पोलिस ठाणे (वरिष्ठ निरीक्षक, सहकारनगर पोलिस ठाणे), यशवंत निकम- सायबर पोलिस ठाणे (वरिष्ठ निरीक्षक, स्वारगेट), उत्तम भजनावळे- सिंहगड रस्ता (वरिष्ठ निरीक्षक, चतु:शृंगी), विक्रमसिंह कदम- कोथरूड (वरिष्ठ निरीक्षक, खडकी), दिलीप फुलपगारे- खडकी पोलिस ठाणे (वाहतूक शाखा), विजयमाला पवार- विश्रामबाग (वाहतूक शाखा), राहुल गौड- सहकारनगर (वाहतूक शाखा), युवराज नांद्रे- स्वारगेट (वाहतूक शाखा), उल्हास कदम- चतु:शृंगी (पोलिस निरीक्षक गुन्हे, सिंहगड रस्ता), जितेंद्र कदम- भारती विद्यापीठ (गुन्हे, विश्रामबाग), दत्ताराम बागवे- गुन्हे, खडकी (गुन्हे, विश्रांतवाडी).

## वडकी येथे सासऱ्याच्या केला जावयाचा खून

**पुणे :** फुरसुंगी येथील वडकी परिसरात कौटुंबिक वादातून सासऱ्याने जावयाचा गमजाने गळा आवळून आणि डोके फरशीवर आपटून खून केल्याची धक्कादायक घटना रात्री घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सासऱ्याला अटक करून खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव प्रशांत सुरेश जमदाडे (वय ३५) असून, आरोपी सासऱ्याचे नाव सुरेश बाबूराव जमदाडे (वय ५९) आहे. घटनेच्या दिवशी प्रशांत हा वडकी येथील वलवा वस्तीतील सासरवाडीला भेट देण्यासाठी आला होता. मात्र, दारूच्या नशेत असलेल्या प्रशांतने सासू-सासऱ्यावर अपशब्दांचा वर्षाव केला.

वाद वाढल्यानंतर प्रशांत आणि त्याचा सासरा सुरेश यांच्यात जोरदार झटापट झाली. त्यावेळी संतप्त झालेल्या सुरेश जमदाडे यांनी घरातील कापडी गमजाने प्रशांतचा गळा आवळला आणि त्यानंतर त्याचे डोके जोरात फरशीवर आपटले. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या प्रशांतचा जागीच मृत्यू झाला.

## शेतीमाल साठवणीसाठी पाच नव्या अ‍ॅग्री लॉजिस्टिक पार्क्स

**पुणे :** राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे काढणीपश्चात नुकसान टाळण्यासाठी आणि साठवणुकीसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात पाच ठिकाणी नव्या अ‍ॅग्री लॉजिस्टिक पार्क्स उभारण्यात येणार आहेत. यासाठी ८७ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करून राज्य शासन आणि जागतिक बँकेकडे सादर करण्यात आला आहे. ही माहिती महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कौस्तुभ दिवेगावकर यांनी दिली.या लॉजिस्टिक पार्क्सच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना शेतीमाल साठवणूक, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि तारण कर्जाच्या सुविधांचा लाभ मिळणार आहे. यामुळे शेतमालाचे बाजारभाव नियंत्रित राहतील आणि शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## गायन, वादनाची 'संगीत संध्या' मैफल शनिवारी

**पुणे :** इंडियन मेडिकल असोसिएशन, आय. एम. ए. आर्ट सर्कल व कलासक्त कल्चरल फाऊंडेशनतर्फे शनिवार, दि. २६ जुलै रोजी 'संगीत संध्या' या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात डॉ. प्रांजल पंडित यांचे एकल तबलावादन होणार असून मृण्मयी भिडे यांचे शास्त्रीय-उपशास्त्रीय गायन होणार आहे. कलाकारांना सारंग जोशी, चिंतामणी वारणकर साथसंगत करणार आहेत. कार्यक्रम सायंकाळी ५:३० वाजता डॉ. के. एच. संचेती सभागृह, डॉ. नितू मांडके आय. एम. ए. हाऊस, टिळक रोड येथे होणार आहे, अशी माहिती आय. एम. ए.चे अध्यक्ष डॉ. सुनिल इंगळे, आर्ट सर्कलचे अध्यक्ष डॉ. मोहन जोशी, कलासक्त कल्चरल फाऊंडेशनचे अध्यक्ष श्रीरंग कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे.



## गाथा जाधव-आयगोळे यांना स्व. करंदीकर स्मृती पुरस्कार

**पुणे :** रंगत-संगत प्रतिष्ठान व करम प्रतिष्ठानर्फे स्व. दीपक करंदरीकर स्मृती गझल पुरस्काराने गझलकारा गाथा जाधव-आयगोळे (कल्याण) यांना गौरविले जाणार आहे. पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पत्रकार भवन, नवी पेठ येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रमोद आडकर, करम प्रतिष्ठानचे अध्यक्ष भूषण कटककर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. प्रज्ञा महाजन, मैथिली आडकर, वासंती वैद्य, प्राजक्ता वेदपाठक, ऋचा कर्वे संयोजन करीत आहेत. पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त निमंत्रितांचे गझल संमेलन आयोजित करण्यात आले असून कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.



## अतीक्रमणावर 'हातोडा'...!




पुणे — औंध बाणेर क्षेत्रिय कार्यालय हद्दीतअतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत अभिमानश्री रस्ता, वेस्टएंड मॉल भाले चौक या ठिकाणी अनधिकृत कच्चे शेड, फ्रंट मर्जिन, साइड मार्जिनवर अतिक्रमण निर्मूलन कारवाई करण्यात आली.

## महापालिकेची औंधमध्ये अतीक्रमण कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** औंध बाणेर क्षेत्रिय कार्यालय हद्दीतअतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत अभिमानश्री रस्ता, वेस्टएंड मॉल भाले चौक या ठिकाणी अनधिकृत कच्चे शेड, फ्रंट मर्जिन, साइड मार्जिनवर अतिक्रमण निर्मूलन कारवाई करण्यात आली. सदर कारवाईसाठी परिमंडळ क्र.१ कडील संपूर्ण अतिक्रमण स्टाफ महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान १ गट, पोलिस कर्मचारी ,बिगारी सेवक ,अतिक्रमण निरीक्षक, औंध बाणेर कार्यालयाकडील सहायक अतिक्रमण निरीक्षक ०४ , ओपन ट्रक ०३,पिंजरा वाहन ०२,जेसीबी ०१ अशी यंत्रणा वापरण्यात आली. औंध बाणेर क्षेत्रिय कार्यालय अतिक्रमण निरीक्षक राहुल बोकन, सहायक निरीक्षक राहुल डोके,वैभव जगताप ,हाशम पटेल, पंकज आवाड यांच्या कारवाई पथकाने अतिक्रमण निर्मूलन विभाग उपआयुक्त संदीप खलाटे, महापालिका सहायक आयुक्त गिरीश दापकेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कारवाई केली.सदर कारवाईत काउंटर १० , हातगाडी ०२, इतर १७,कच्चे पक्के शेड २० निष्कासित करण्यात आले. ०५ ट्रक साहित्य जप्त करण्यात आले.

# 'खड्ड्या'तून दिसणार 'उन्नतीचा मार्ग'...!

### 'खड्डेमुक्त पुणे'साठी महापालिकेचा पुढाकार

रस्त्यावरील खड्डे आणि त्रस्त पुणेकर हे गेल्या काही वर्षांपासूनच समीकरण चांगलेच जमले आहे, थोडासा जरी पाऊस झाला तरी रस्त्यावर खड्ड्यांचा चक्क 'सडा'च पडलेला असतो. त्यामुळे रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते याचे कोडे कधीच सुटत नाही, परिणामी या रस्त्यावरुन वाहन चालविताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागते. त्यातूनच गेल्या काही वर्षांच्या कालावधीत या रस्त्यावर अपघातांचे सत्र सुरु असून अनेक निष्पापांना नाहक प्राण गमवावे लागले आहेत, तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. त्याची आता महापालिका प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे, विशेष म्हणजे त्यासाठी खुद्द महापालिका आयुक्त नवलकिशोर राम हे 'अलर्ट मोड'वर आले असून या खड्ड्यांचे छायाचित्र संबधित अ‍ॅपवर मिळाल्यास त्याची तातडीने दुरुस्ती होणार आहे.



> गेल्या पाच वर्षांत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या विविध सूचना व तक्रारींचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्यातील काही सूचना पूर्वीही प्राप्त झालेल्या असून, त्या अद्याप प्रलंबित आहेत. त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. याशिवाय, महापालिकेच्या स्वागत कक्षात नागरिकांच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी पूर्णवेळ अधिकारी उपस्थित राहतील.
>
> **-नवलकिशोर राम,** आयुक्त, पुणे महापालिका



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न गंभीर होत असताना, महापालिकेने 'खड्डेमुक्त पुणे' उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांच्या सहभागातून समस्यांची नोंद घेण्यासाठी एक विशेष मोबाइल अ‍ॅप तयार करण्यात येत असून, त्यामार्फत खड्ड्यांची माहिती व छायाचित्रे मागवण्यात येणार आहेत. तक्रार प्राप्त होताच त्वरित अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिली.

या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या स्तरावर विविध विभागांची बैठक नुकतीच पार पडली. यामध्ये संबंधित सर्व विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, पुढील काही दिवसांत आणखी बैठका घेण्यात येणार आहेत. उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी नियोजन सुरू असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या उपक्रमांमध्ये स्वच्छता हा प्रमुख घटक असून, नागरिकांपर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहोचवण्यासाठी सर्व मंडळांतील कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. यासाठी महापालिकेकडून विशेष पत्रके व जिंगल्स तयार करून कार्यकर्त्यांना पुरवण्यात येणार आहेत.

महापालिका प्रशासनाच्या वतीने रस्ते दणकट ठेवण्यासाठी नेहमीच प्रयत्न केला जातो, परंतु गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहर आणि परिसरात पावसाने अक्षरश: थैमान घातले आहे. त्यातच बहुतांशी रस्त्यांचा दर्जा निकृष्ठ असल्याने आणि त्यासाठी ठेकेदार फारसे कष्ट घेत नसल्याने तुरळक पावसातही नव्याने करण्यात आलेले रस्ते वाहून जाण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी प्रशासनाच्या वतीने अशा ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई सुध्दा करण्यात आली आहे, परंतु बहुतांशी ठेकेदारांच्या वर्तनात आणि कामकाजात अपेक्षित सुधारणा झालेली नाही. त्यामुळे बहुतांशी रस्त्यांचा दर्जा ढासळत चालला आहे; त्याला पायबंद घालण्यासाठी प्रशासनाच्या वतीने हे अ‍ॅप सुरु करण्यात आले आहे.

नागरिकांच्या सहकार्याने राबवला जाणारा 'खड्डेमुक्त पुणे' उपक्रम शहराच्या सुधारित नागरी व्यवस्थापनासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## 'ई-लर्निंग' ठप्प; पालिकेचा प्रकल्प उपेक्षीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधिष्ठित आणि दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी महापालिकेने सुमारे २० कोटी रुपये खर्चून उभारलेली ई-लर्निंग यंत्रणा सध्या पूर्णपणे बंद अवस्थेत आहे. मागील तीन वर्षांपासून या यंत्रणेकडे दुर्लक्ष झाले असून, यामुळे हजारो विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ मिळू शकलेला नाही.



शहरातील २६५ हून अधिक शाळांमध्ये गरीब व गरजू कुटुंबातील सुमारे एक लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी टीव्ही स्क्रीन, संगणक, अभ्यासक्रमानुसार सॉफ्टवेअर, तसेच काही ठिकाणी स्टुडिओही उभारण्यात आले होते. तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन एका केंद्रातून सर्व शाळांमध्ये पोहोचवण्याची व्यवस्था या यंत्रणेद्वारे करण्यात आली होती.

मात्र, सातत्यपूर्ण देखभाल आणि तांत्रिक बाबींवरील दुर्लक्षामुळे ही ई-लर्निंग सुविधा पूर्णतः कोलमडली आहे. सध्या प्रशासकीय राजवट असतानाही यंत्रणा सुरू करण्यासाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत. सत्ताधारी प्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे देखील हा प्रकल्प थांबलेला आहे.

यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी सुमारे १० ते १२ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मात्र, महापालिकेने या खर्चाला अद्याप मंजुरी दिलेली नाही. दरम्यान, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप चंद्रन यांनी सांगितले की, "ई-लर्निंग पुन्हा सुरू करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. बीएसएनएल व जिओ या कंपन्यांशी इंटरनेट सुविधा पुरवण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. प्रथम टप्प्यात ज्या शाळांमध्ये यंत्रणा कार्यान्वित होऊ शकते, तिथे ती सुरू केली जाणार आहे."

महापालिका आयुक्तांनी स्थापलेली वॉररूम आता या प्रकल्पावर लक्ष ठेवून आहे. मात्र, यंत्रणेचा खऱ्या अर्थाने पुनरुज्जीवन होईल का, याकडे शिक्षण क्षेत्रातील जाणकार आणि पालकांचे लक्ष लागले आहे.

## 'जनक शोधांचे' हे पुस्तक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डॉ. जयंत खंदारे करत असलेले संशोधन अतिशय मोलाचे आहे, त्यांना कर्करोगावरील संशोधनसाठी जागतिक पातळीवर नावाजले जाईल यात शंका नाही. डॉ. खंदारे यांचे कार्य पाथब्रेकींग आहे, त्यांनी लिहिलेले ' जनक शोधांचे' हे पुस्तक अत्यंत महत्वाचे आहे, हे पुस्तक जास्तीतजास्त शाळा, कॉलेज पर्यंत पोहोचले पाहिजे असे मत राज्यच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागा अतिरिक्त सचिव वेणूगोपाल रेड्डी यांनी व्यक्त केले.

डॉ. जयंत खंदारे लिखित 'जनक शोधांचे' या पुस्तकाच्या प्रकाशन वेळी ते बोलत होते. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. विश्वनाथ कराड (संस्थापक एमआयटी विश्वशांती विद्यापीठ ) होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. हर्षदीप कांबळे (प्रधान सचिव, सामानिक न्याय व विशेष सहाय्य मंत्रालय), डॉ. हिरवानी, डॉ. सुरेश गोसावी (कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), गणेश शिंदे, विद्यापीठाच्या संरक्षण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. विजय खरे, शशिकांत कांबळे (स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशन)उपस्थित होते. डॉ. हर्षदिप कांबळे म्हणाले, उद्योग जगत आणि शिक्षण यांचा ताळमेळ नसल्याचे आपल्याला अनेकदा जाणवते.



पुणे — डॉ. जयंत खंदारे लिखित 'जनक शोधांचे' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी (डावीकडून) शशिकांत कांबळे, डॉ. हिरवानी, डॉ. जयंत खंदारे, डॉ. सुरेश गोसावी, डॉ. विश्वनाथ कराड, वेणूगोपाळ रेड्डी, डॉ. हर्षदीप कांबळे,,गणेश शिंदे, डॉ. विजय खरे

# अध्यात्म व विज्ञानाच्या विचारांचा समन्वय म्हणजे 'नवा भारत'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विज्ञान व अध्यात्माच्या एकत्रीकरणातून नव्या विचारांचा समन्वय होईल, आणि या दोन्हीच्या विचारांचा समन्वय म्हणजे नवा भारत असेल. पंतप्रधान सतत म्हणतात की भारत एक महान व चांगले राष्ट्र होणार आहे. याची सुरूवात 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे'तून झाली आहे. भारतीय राजकारणाला बदलावयाचे असेल तर अध्यात्मिक विचार मांडले गेले पाहिजे. येथून निघालेले मंथन हे भारतीय संस्कृतीला नवी दिशा देण्यासाठी सज्ज आहे." असे विचार जागतिक कीर्तीचे संगणक तज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले.




'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे' व 'एमआयटी-राष्ट्रीय सरपंच संसद' यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित दोन दिवसीय 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे' च्या समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या प्रसंगी पंढरपूर येथील श्रीगुरू साखरे महाराज परंपरा पाईकचे हभप रामकृष्ण महाराज वीर, आळंदी येथील साधकाश्रमचे प्रमुख हभप यशोधन महाराज साखरे, बदलापूर येथील ज्येष्ठ कीर्तनकार हभप विश्वनाथ महाराज वारिंगे, देहूचे हभप पांडुरंग महाराज घुले, पंडित उद्धवबापू आपेगावकर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड होते. तसेच पद्मश्री पोपटराव पवार व परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील उपस्थित होते.



> ऐतिहासिक परिषदेतून असे सरपंच आणि महाराज तयार व्हावे जेणे करून देशात परिवर्तनाची लाट आली पाहिजे. जिथे अध्यात्माचा बेस असतो तेथे विकास असतोच. त्याच प्रकारे राजकारणात चारित्र्यवान लोक निर्माण करण्यासाठी भारतातील पहिली एसओजी संस्थेची निर्मिती केली आहे.
>
> **-डॉ. राहुल विश्वनाथ कराड;** कार्याध्यक्ष, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी

# अथर्वशीर्ष पठणातून मुख्यमंत्र्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना

## सारसबाग गणपती मंदिरात भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : २२१ ब्रह्मवृंदांचा सहभाग; ५५ हजार अथर्वशीर्ष पठण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त आमदार हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून पुण्यातील सारसबाग गणपती मंदिरात एक विशेष धार्मिक उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात २२१ ब्रह्मवृंदांच्या सहभागातून ५५ हजार वेळा श्री गणपती अथर्वशीर्ष पठण करण्यात आले.

सकाळी ७ ते १० या वेळेत पार पडलेल्या या भक्तिपूर्ण कार्यक्रमात पुणेकर भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. कार्यक्रमाचे आयोजन कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य व यशस्वी वाटचालीसाठी श्री गणरायाच्या चरणी सामूहिक प्रार्थना करण्याचा हेतू या कार्यक्रमामागे होता.या वेळी आमदार हेमंत रासने म्हणाले," देवेंद्र फडणवीस हे विकासाभिमुख दृष्टिकोन असलेले, जनतेच्या हितासाठी सातत्याने कार्य करणारे नेतृत्व आहेत. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पुणेकरांच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला."

संकटाच्या काळात खंबीरपणे निर्णय घेणारे, सर्वसामान्य जनतेचा विश्वास जिंकणारे हे व्यक्तिमत्त्व आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांचं आरोग्य चांगलं राहावं, त्यांना दीर्घायुष्य लाभावं आणि ते अशीच यशस्वी वाटचाल करत राहावीत, यासाठी श्री गणरायाच्या चरणी सामूहिक प्रार्थना करण्याचा हा एक छोटासा, पण मनापासून केलेला प्रयत्न होता. असे रासने यांनी म्हटले आहे.

या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, भाजपचे प्रमुख पदाधिकारी, स्थानिक नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. साधेपणा, भक्तिभाव आणि सकारात्मक ऊर्जेने परिपूर्ण असा हा सोहळा सर्व सहभागींसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला.






“ संकटाच्या काळात खंबीरपणे निर्णय घेणारे, सर्वसामान्य जनतेचा विश्वास जिंकणारे हे व्यक्तिमत्त्व आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांचं आरोग्य चांगलं राहावं, त्यांना दीर्घायुष्य लाभावं आणि ते अशीच यशस्वी वाटचाल करत राहावीत, यासाठी श्री गणरायाच्या चरणी सामूहिक प्रार्थना करण्याचा हा एक छोटासा, पण मनापासून केलेला प्रयत्न होता.

**-आमदार हेमंत रासने,** कसबा विधानसभा मतदारसंघ

### देवाभाऊंचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांमधून..!

लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त “महासंकल्प” रक्तदान शिबिर तसेच वैद्यकीय सहाय्यता हेल्प डेस्क यांचा शुभारंभ आजकरण्यात आला. याशिवाय तीन ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले . या शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून १०७ रक्तपिशव्यांचे संकलन यातून करण्यात आले.

याशिवाय आयुष्मान भारत योजना, पंतप्रधान व मुख्यमंत्री सहायता निधी, पुणे महानगरपालिका वैद्यकीय योजना इ. सरकारी आरोग्य योजनांसाठी हेल्प डेस्कचे उदघाटन देखील करण्यात आले. उदघाटन डॉ. ओमप्रकाशजी शेटे (अध्यक्ष, आयुष्मान भारत मिशन, महाराष्ट्र राज्य) यांच्या शुभहस्ते पार पडले. या उपक्रमांचा उद्देश गरजू रुग्णांना वैद्यकीय मदतीचे योग्य मार्गदर्शन मिळवून देणे आणि सामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे. या शिवाय २२ क्रोनिक्स स्पॉटचे देखील सुशोभीकरण करून लोकार्पण करण्यात आले आहे.



### पत्नीने दुसरे लग्न केल्याने पतीची आत्महत्या

**पुणे :** पत्नीच्या विश्वासघाताने मानसिकदृष्ट्या खचलेल्या एका तरुणाने गळफास घेऊन जीवन संपविल्याची घटना वडगाव शेरी परिसरात घडली. पत्नीने दुसरा विवाह करून फसवणूक केल्याने आणि धमकी दिल्यामुळे हा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे.

सिडनी लॉरेन्स दोरायराज (वय-३९, रा. शिलानंद हाऊसिंग सोसायटी, सोमनाथनगर, वडगाव शेरी) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत त्यांचा मोठा भाऊ स्टॅन्ली लॉरेन्स दोरायराज (वय ४१) यांनी चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या फिर्यादीनुसार, पोलिसांनी स्वाती सिडनी दोरायराज (वय-३२) आणि तिचा प्रियकर चेतन मोरे (वय-३५, रा. श्रीनिवास टेनेमंट, बडोदा, गुजरात) यांच्याविरुद्ध फसवणूक आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अवयवदात्या सत्तर कुटुबिंयांचा सन्मान

**पुणे :** अवयवांचे दान करून दुसऱ्यांच्या आयुष्याची दोरी बळकट करणाऱ्या कुटुंबीयांच्या प्रती कृतज्ञता म्हणून पुण्याच्या विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीतर्फे (झेडटीसीसी) बारावा ‘नमन दिवस’ भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. हा विशेष दिवस अवयवदान करणाऱ्या आत्म्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि त्यांच्या अमूल्य योगदानाचे स्मरण करण्यासाठी आयोजित केला जातो.

यावर्षी ७० अवयवदात्यांच्या कुटुंबीयांना कर्नल भूषण ओक आणि रेडिओ जॉकी शोनाली यांनी सन्मानित केले. या कार्यक्रमात ‘झेडटीसीसी’चे सर्व अधिकारी, वैद्यकीय तज्ज्ञ, प्रत्यारोपण समन्वयक आणि अनेक अवयव प्रत्यारोपित झालेले लाभार्थी उपस्थित होते. एकत्र येऊन त्यांनी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आणि एक सशक्त समाज घडवण्यासाठी एकजुटीचा संदेश दिला. ‘झेडटीसीसी’ दरवर्षी हा ‘नमन दिवस’ साजरा करत समाजात अवयवदानाविषयी जागरूकता वाढवण्याचा आणि दात्यांच्या योगदानाचे स्मरण ठेवण्याचा प्रयत्न करते.

### ‘आप’च्या महाराष्ट्र राज्य समन्वयकपदी अमित म्हस्के

**पुणे :** आम आदमी पार्टीने आपल्या संघटनेच्या विस्तारासाठी आणि महाराष्ट्रात प्रामाणिक राजकारणाच्या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी पुण्यातील युवक नेते अमित उद्धवराव म्हस्के यांची महाराष्ट्र राज्य समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे.



ही नियुक्ती पक्षाचे राष्ट्रीय संयोजक व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, महाराष्ट्र प्रभारी प्रकाश जरवाल, तसेच महाराष्ट्र कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील यांच्या आदेशाने जाहीर करण्यात आली.

नियुक्तीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना अमित म्हस्के म्हणाले, “ही केवळ एक पद नाही, तर पक्षाच्या विचारधारेचा आणि प्रामाणिक राजकारणाचा महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात विस्तार करण्याची मोठी जबाबदारी आहे. महाराष्ट्रात प्रामाणिक व पारदर्शक सरकार स्थापन करण्यासाठी मी माझी पूर्ण निष्ठा, ताकद व जिद्द पणाला लावून काम करणार आहे.”

याआधी त्यांनी पुणे शहर अध्यक्ष — युवा आघाडी म्हणून जबाबदारी सांभाळताना शेकडो युवकांना संघटित केले असून, शहरातील अनेक ठिकाणी आंदोलने व लोकशाही मार्गाने प्रश्न मांडून ते तडीस नेले आहेत.

# ‘इंडिगो’ प्रवासाचा खर्डेकरांना विदारक अनुभव

## विमान वाहतूक मंत्री मोहोळ यांच्याकडे तक्रार

अहमदाबाद येथे दीड महिन्यांपूर्वी अहमदाबाद येथे घडलेल्या थरारक विमान अपघाताने देशच नव्हे तर संपूर्ण जग हादरले होते; त्यामुळे विमान प्रवास करताना आजही अनेक विमान प्रवाशांच्या अंगावर रोमांच उभे राहात आहेत. या अपघातातून विमान कंपन्या ‘धडा’ घेतील अशी अपेक्षा होती, परंतु या विमान कंपन्यांचा अजुनही प्रवाशांच्या जीवाशी ‘जीवघेणा’ खेळ सुरु असल्याचा विदारक अनुभव भाजपाचे प्रवक्ते संदीप खर्डेकर यांनाही आला आहे. खर्डेकर हे कुटुंब आणि नातेवाईकांसह नैरोबीला जात असताना त्यांना थरारक अनुभवाला सामोरे जावे लागले; धक्कादायक बाब म्हणजे खर्डेकर यांनी काही समस्यांच्या संदर्भात तक्रार केल्यानंतर ‘तुम्हाला कुठे तक्रार करायची तेथे तक्रार करा’ असे उद्धट उत्तरेही त्यांना ऐकायला मिळाली.

### बॅगेतील सोन्याचे नेकलेसच गायब

- या प्रवासाच्या दरम्यान खर्डेकर यांच्या नातेवाईकांना आलेला अनुभव तर अतिशय क्लेशकार असाच आहे; या नातेवाईकाची बॅग पावसात भिजल्याने ही बॅग खराब झाली होती. ही बॅग खराब झाली असतानाच त्यांच्या नातेवाईकांच्या बॅगमधील सोन्याचे नेकलेस चक्क गायब झाले आहे; यासंदर्भात तक्रार केल्यानंतर नेकलेसच्या बाबतीत हात झटकले आणि बॅगच्या नुकसान भरपाईपोटी त्यांना दोन हजार रुपये देण्यात आले.




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विमान प्रवासात प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी विमान कंपन्यांनी दक्षता घ्यावी असे स्पष्ट संकेत आहेत. परंतु या कंपन्या त्याबाबत उदासीन असल्याचे पुन्हा एकदा उघडकीस आले आहे. भाजपाचे प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर हे कुटुंबासह नैरोबीला गेले होते; यावेळी जाताना आणि परतीच्या प्रवासातही त्यांना थरारक अशा प्रसंगाना सामोरे जावे लागले.

‘ इंडिगो’च्या विमानाने नैरोबीसाठी उड्डाण केल्यानंतर खर्डेकर यांचे आसन मागे जात नव्हते; त्यासंदर्भात त्यांनी तक्रार केल्यानंतर ‘हवाई सुंदरी’ने त्यांना हे आसन रिलॅक्स अवस्थेत करुन दिले. ही बाब एखाद्या आसनापुरती मर्यादित आहे असे वाटत असतानाच खर्डेकर यांनाच परतीच्या म्हणजेच नैरोबी ते मुंबई या प्रवासातही पुन्हा तोच अनुभव आला. अथक प्रयत्न करुनही त्यांना हे आसन रिलॅक्स मोडमध्ये घेणे शक्य झाले नाही.

विमानतळावर उतरल्यानंतर सर्व प्रवासी ‘बगॅज बेल्ट’ वर बॅग घेण्यास गेले होते; त्यावेळी खर्डेकर यांना एका वेगळयाच अनुभवाला सामोरे जावे लागले. खर्डेकर यांच्या बॅगसह बहुतांशी सर्वच प्रवाशांच्या बॅगा पावसात चिंब भिजल्या होत्या; वास्तविक या बॅगा भिजू नयेत याची दक्षता घेण्याची आवश्यकता असतानाही विमान कंपन्यांनी त्यामध्ये हलगर्जीपणा केला असा आरोप खर्डेकर यांनी केला आहे. त्याशिवाय प्रवासाच्या दरम्यान एकही कर्मचारी मराठीत बोलत नव्हता, तसेच उदघोषणाही मराठीत केली जात नव्हती. प्रवासाच्या दरम्यान सर्वच प्रवाशांना अशा विदारक प्रसगांना सामोरे जावे लागत आहे; त्यामुळे या प्रकाराची गंभीर दखल घ्यावी आणि ‘इंडिगो’च्या प्रमुखांची तातडीने बैठक घेऊन त्यांना योग्य ती समज द्यावी अशी मागणी खर्डेकर यांनी ना. मोहोळ यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

### असे आहेत विमान प्रवासातील थरारक अनुभव

- *लॅन्डिंगच्या वेळी प्रवाशांचे डोके आपटू नये याबाबत अक्षम्य दुर्लक्ष
- * पसंतीच्या आसनासाठी जादा पैशांची मागणी
- * लांबच्या प्रवासातही पती, पत्नीसाठी वेगवेगळे आसन
- * प्रवाशांशी कर्मचार्यांचे उद्धट वर्तन
- * मराठीत बोलण्याचे सर्वच कर्मचार्यांना वावडे
- * कर्मचारी झटकतात जबाबदारी

# विद्यार्थीनींना मोफत शिक्षणाचा हक्कच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थिनींसाठी शासनाच्या मोफत शिक्षण योजनेंतर्गत शिक्षण घेणाऱ्या मुलींना शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आले असूनही, काही महाविद्यालयांकडून त्यांच्याकडून शुल्क वसूल करण्यात येत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना कठोर इशारा दिला आहे. अशा प्रकारे फी वसूल करणाऱ्या संस्थांवर थेट कारवाई केली जाईल, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या निर्णयानुसार, व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग मधील विद्यार्थिनींना शिक्षण व परीक्षा शुल्कात १०० टक्के सवलत देण्यात येते. यापूर्वी ही सवलत ५० टक्क्यांपर्यंत मर्यादित होती.

तसेच, राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गतही विद्यार्थिनींसाठी संपूर्ण फी माफ करण्यात येते. योजनेच्या अटींनुसार, पात्र विद्यार्थिनींकडून कोणत्याही प्रकारचे शिक्षण शुल्क आकारू नये, असे स्पष्टपणे निर्देशित करण्यात आले आहे.




मात्र, काही महाविद्यालयांनी या निर्देशांकडे दुर्लक्ष करत विद्यार्थिनींकडून शैक्षणिक शुल्काची मागणी केल्याच्या तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्या. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयांची चौकशी सुरू केली असून, दोषी आढळलेल्या संस्थांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात प्रत्येक महाविद्यालयाने आपला अहवाल उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालकांना सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी योग्य ती दक्षता घेऊन शासकीय निर्णयांचे पालन करावे, असे आवाहनही विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

# विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवावा -डॉ.गोऱ्हे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रसंत आचार्य सम्राट आनंदऋषिजी यांच्या १२५ व्या जन्मजयंती महोत्सवानिमित्त आयोजित जैन विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यात विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आणि सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. हा सोहळा महावीर प्रतिष्ठान, सॅलेसबरी पार्क, पुणे येथे जिनशासन प्रभाविका प.पू. चैतन्यश्रीजी म.सा. यांच्या पावन सान्निध्यात पार पडला.

या कार्यक्रमात विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार चेनसुखजी संचेती, माजी आयएएस अधिकारी विशाल सोळंकी, उद्योगपती राजेंद्र मुनोत, अध्यक्ष साधना सदन विजयकांत कोठारी, अचल जैन, शिवसेना शहरसंघटक आनंद गोयल, एकनाथ ढोले, वैभव वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती. हा सन्मान सोहळा वीतराग सेवा संघ यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, "विद्यार्थ्यांनी पालकांच्या ताणतणावापासून स्वतःला दूर ठेवत अभ्यासात सातत्य राखावे. कमी मार्क मिळाल्यास मुलांवर मानसिक ताण येऊ नये याची काळजी पालकांनी घ्यावी.




पुणे राष्ट्रसंत आचार्य सम्राट आनंदऋषिजी यांच्या १२५ व्या जन्मजयंती महोत्सवानिमित्त आयोजित जैन विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यात विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

# ग्रामीण मुलींना सक्षम बनविण्याचे कार्य कौतुकास्पद : पूनावाला




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुलींना चांगल्या शिक्षणाची संधी मिळाली, तर त्या स्वतःबरोबर समाजाची प्रगती करतात. ग्रामीण भागातून पुण्यात शिकण्यासाठी येणाऱ्या मुलींना निवास-भोजनाची सोय करतानाच त्यांना व्यक्तिमत्व विकासाचे शिक्षण देऊन सक्षम बनवण्याचे कार्य कौतुकास्पद आहे. महिला सेवा मंडळ आणि विद्यार्थी साहाय्यक समितीच्या संयुक्त प्रयत्नांतून सुरु झालेले मुलींचे वसतिगृह अनेकींचे आयुष्य घडवेल," असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजिका व समाजसेविका पद्मश्री लीला पूनावाला यांनी केले.

महिला सेवा मंडळ आणि विद्यार्थी साहाय्यक समितीच्या संयुक्त विद्यमाने उभारलेल्या मुलींच्या वसतिगृहाचे उद्घाटन पूनावाला यांच्या हस्ते झाले. या वसतिगृहात नव्याने ८० मुलींची व्यवस्था होणार आहे. एरंडवणे येथील महिला सेवा मंडळाच्या प्रांगणात झालेल्या सोहळ्यात मराठवाडा मित्र मंडळ संस्थेचे कार्याध्यक्ष व समितीचे कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव, तुकाराम गायकवाड, महिला सेवा मंडळाच्या पुष्पा हेगडे, प्रतिभा घोरपडे, राखी शेट्टी, तनुजा पुसाळकर, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, खजिनदार संजय अमृते, प्रकल्प समन्वयक प्रभाकर पाटील यांच्यासह दोन्ही संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. पुष्पा हेगडे म्हणाल्या, "गरजू विद्यार्थ्यांना पुण्यात शिकताना हातभार लागावा, सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी या दोन्ही संस्था काम करणार आहेत. महिला सेवा मंडळ गेली अनेक वर्षे मुलींच्या शिक्षणासाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. मुलींच्या शिक्षणासाठी समर्पित भावनेने कार्यरत असलेल्या पूनावाला यांच्या हस्ते या वसतिगृहाचे उद्घाटन होणे, हा आनंदाचा क्षण आहे."

“ स्वच्छता, समता, स्वावलंबन या त्रिसूत्रीवर समितीचे कार्य सुरु आहे. ग्रामीण भागातील मुलांना घडवणारे हे मॉडेल पुण्यासह बाहेरही विस्तारण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. दोन चांगल्या संस्था एकत्रित येऊन चांगले काम होतेय, याचा आनंद आहे. संस्कार, मूल्यांचे शिक्षण येथे मिळते. या कार्यरत माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग ही अभिमानाची गोष्ट आहे.

**-तुषार रंजनकर;** कार्यकारी विश्वस्त; विद्यार्थी साहा. समिती

# हडपसर रेल्वेस्थानकाला ‘हायटेक साज’...!

## सिग्नल यंत्रणा ‘डिजिटल’: प्रवाशांचा प्रवास होणार अधिक सुरक्षित आणि गतीमानही




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हडपसर स्थानकावरची सिग्नल यंत्रणा ही आता आधुनिक झाली आहे.१८ तासांचा ब्लॉक घेऊन संगणकीकृत सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. शिवाय ‘लूप लाइन’ला मुख्य लाइनशीदेखील जोडण्यात आले.

रेल्वे प्रशासनाने हडपसर स्थानकावर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग यंत्रणा सुरू केल्याने रेल्वे गाड्यांचे परिचालन सुरक्षित व गतिमान होण्यास मदत मिळणार आहे. येत्या काही दिवसांत हडपसर टर्मिनलहून नवीन रेल्वे गाड्याची सेवा सुरू होईल. हे काम झाल्याने नवीन रेल्वे गाड्यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

हडपसर टर्मिनल विकसित करण्यासाठी रेल्वे बोर्डाने सुमारे ९३ कोटींचा निधी पूर्वीच दिला. त्याचे काम गेल्या काही महिन्यापासून सुरू होते. यातील महत्त्वाचा टप्पा मार्गी लागला. रविवारी घेण्यात आलेल्या ब्लॉकमध्ये पूर्वीची ‘रूट रिले इंटरलॉकिंग’ ही प्रणाली काढून टाकण्यात आली आहे.

नवी प्रणाली संगणकीकृत असल्याने एका क्लिकवर गाड्यांना सिग्नल व पॉइंट बदलले जाईल. ही प्रक्रिया अवघ्या १५ ते २० सेकंदात पूर्ण होते. पूर्वीच्या ‘रूट रिले इंटरलॉकिंग’मध्ये या प्रक्रियेसाठी २ ते ३ मिनिटे लागत होते. रेल्वे स्थानकांवर ‘इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग’ ही एक आधुनिक, संगणकीकृत सुरक्षा यंत्रणा आहे. रेल्वे गाड्यांचे परिचालन व सिग्नलिंग यंत्रणा सुरक्षितरीत्या चालविण्यासाठी वापरली जाते. ही यंत्रणा पूर्वीच्या मॅन्युअल आणि रिले-आधारित सिग्नलिंग यंत्रणेचे अपग्रेड आहे.

> हडपसर स्थानकावर ‘इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग’ यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. तसेच, प्रवाशांच्या दृष्टीने आवश्यक सुविधादेखील उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.
> **- पद्मसिंह जाधव,** अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक, पुणे.

### ही यंत्रणा कशी कार्य करते?

- रेल्वे कोणत्या रुळावर जाईल, त्यासाठी आवश्यक सिग्नल्स, पॉइंट्स (जिथे ट्रॅक बदलतो) व अन्य यंत्रणा स्वयंचलित पद्धतीने नियंत्रित केल्या जातात.
- सर्व सिग्नल आणि पॉइंट्स संगणकाद्वारे इंटरलॉक म्हणजेच एकमेकांशी जोडलेले असतात. त्यामुळे चुकीचा सिग्नल अथवा चुकीचा मार्ग मिळणार नाही.
- एकाच मार्गावर एकाच वेळी दोन गाड्या येण्याची शक्यता खूपच कमी असते.

### फायदे काय?

- ही यंत्रणा अधिक सुरक्षित
- सिग्नल आणि पॉइंट्स जलद व अचूक बदलले जातात
- अपघाताचा धोका कमी
- एकाच ठिकाणाहून संपूर्ण स्थानकाची वाहतूक नियंत्रित केली जाते
- वेळेची बचत, रेल्वे गाड्यांना उशीर होण्याचे प्रमाण कमी

# ‘उदंड’ शाळांना ‘लगाम’...!

## खासगी पूर्व प्राथमिक शाळांची नोंदणी सक्तीची

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत राज्याच्या सर्वच भागात गल्लोगल्ली अंगणवाड्यांसह विविध शाळांचा अक्षरश: सुळसुळाट झाला आहे; विद्येचे माहेरघर असे बिरुद मिरवत असलेल्या पुण्यनगरीत आणि उपनगरांसह जिल्ह्याच्या भागातही अशा शाळांची संख्या काही पटींनी जास्त आहे. विशेष म्हणजे या शाळा भरमसाठ फी आकारत असल्याने पालकांना त्याचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे; हे वास्तव असतानाच या शाळांच्या माध्यमातून शासनाच्या कोणत्याही नियमांचे पालन होत नाही. धक्कादायक बाब म्हणजे या शाळांची संबधित पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक असतानाही त्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत, परिणामी या शाळा अधिकृत आहेत अथवा अनधिकृत याची माहितीच खुद्द शासनाला मिळत नाही.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील खासगी पूर्व प्राथमिक शाळांची माहिती शिक्षण विभागाकडे एकत्र उपलब्ध व्हावी, यासाठी शालेय शिक्षण विभागाने नोंदणी प्रक्रिया सक्तीची केली आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील विविध भागांत कार्यरत असलेल्या प्री-स्कूल, नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनिअर केजी अशा स्वरूपातील शाळांना आता शासनाच्या अधिकृत पोर्टलवर आपली नोंद करणे बंधनकारक झाले आहे.

या पोर्टलवर आतापर्यंत १७,५४२ खासगी पूर्व प्राथमिक शाळांनी नोंदणी केली असून, यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. यापैकी ११,०५४ शाळांनी संपूर्ण माहितीची नोंद केली असून, ६,४८८ शाळांची माहिती अपूर्ण आहे. नोंदणी करताना शाळेच्या व्यवस्थापनाची माहिती, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी संख्या, शाळेतील भौतिक सुविधा यांचा तपशील देणे आवश्यक आहे.

राज्यातील अनेक गल्ल्यांमध्ये खासगी बालवाड्या, पूर्व प्राथमिक वर्ग कार्यरत आहेत. मात्र, यापूर्वी शिक्षण विभागाकडे त्यांची कोणतीही अधिकृत नोंद नव्हती. त्यामुळे तीन ते सहा वयोगटातील बालकांना शिक्षण देणाऱ्या या संस्थांची माहिती एकत्र करून जिल्हा, राज्य आणि पालक पातळीवर पारदर्शकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार बालकांना गुणवत्तापूर्ण, सुरक्षित आणि सर्वसमावेशक शिक्षण देण्यासाठी सुरुवातीच्या टप्प्यातील संगोपन आणि शिक्षण महत्त्वाचे मानले गेले आहे. त्याच अनुषंगाने राज्य सरकारकडून नोंदणी प्रक्रियेला गती देण्यात येत आहे.इतर जिल्ह्यांमध्येही नोंदणी सुरू असून, शासनाच्या निर्देशानुसार लवकरच ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने सर्व संबंधित शाळांना नोंदणी पूर्ण करून आवश्यक माहिती वेळेत भरण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे लवकरच राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षण व्यवस्थेला अधिकृत रूप, नियंत्रण आणि पारदर्शकता प्राप्त होण्याची शक्यता आहे.राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये नोंदणीचा प्रतिसाद उत्साहवर्धक असून, पुणे जिल्हा २६१७ शाळांसह आघाडीवर आहे. तर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात केवळ ६० शाळांची नोंदणी झाली आहे.

### जिल्ह्यानिहाय नोंदणीचा आढावा :

- ठाणे – १६६८
- नाशिक – ८८७
- छत्रपती संभाजीनगर – १०५७
- नागपूर – १००४
- मुंबई (BMC) – ५९३
- कोल्हापूर – ५७१
- जळगाव – ५२२
- सोलापूर – ५९९
- लातूर – ४७०
- नांदेड – ७२६
- रायगड – ४१६
- बीड – ३८१
- अमरावती – ३८०

# दस्त नोंदणी घोटाळ्यांचे सत्र थांबण्याचे नाव नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहर आणि जिल्ह्यातील झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणामुळे प्रचंड प्रमाणात मालमत्ता खरेदी-विक्री होत आहे. मात्र, यामध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर दस्त नोंदणीचे प्रकार घडत असल्याचे समोर आले आहे. अपूर्ण कागदपत्रांवर आणि नियम डावलून दस्त नोंदणी केली जात असल्याच्या अनेक तक्रारी असून, संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्यात येत असल्याचा आरोप आहे.

पुरंदर तालुक्यातील बोगस दस्त नोंदणीचा मुद्दा नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात चर्चेत आला होता. या प्रकरणात २०२३ मध्ये कार्यालयीन चौकशी झाली होती. मात्र, अहवाल वरिष्ठांकडे गेल्यानंतरही संबंधित अधिकाऱ्यांवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. दुय्यम निबंधक हडपसर क्रमांक ९ या कार्यालयात ऑगस्ट २०२३ मध्ये दाखल झालेल्या ८२५ दस्तांची तपासणी करण्यात आली. यातील तब्बल १२५ दस्त नियमबाह्य व संशयास्पद आढळले. हा तपशीलवार अहवाल सह जिल्हा निबंधक (वर्ग १) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी संतोष हिंगाणे यांनी ७ नोव्हेंबर २०२३ रोजी नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक निबंधक यांना सादर केला होता. मात्र, यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१च्या कलम ४४(१) अंतर्गत तपासणी झाली. ७७६ दस्तांमध्ये फक्त एक कलम उल्लंघन, उर्वरित दस्तांत २ ते ४ नियमभंग. फ्लॅट विक्री असूनही रेरा क्रमांकाचा उल्लेख नाही. विकसकाकडे मंजुरीचे कागदपत्रे नाहीत, काही ठिकाणी नगरविकास विभागाच्या आदेशांचे उल्लंघन. १२ दस्तांमध्ये पूर्व भूसंपादन व नकाशांची जोड नाही. तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन करत तुकडे जोडीच्या नोंदणीचे प्रकार.

### हनमंत चव्हाण वर ‘वरिष्ठांचे प्रेम’?

- राज्यात अनेक दुय्यम निबंधक कार्यालय मध्ये बेकायदा दस्त नोंदणीसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर राज्य सरकारने सर्व दस्तांची तपासणीसाठी विशेष पथके नियुक्त केली होती. त्याच पथकाने हवेली क्र.९ कार्यालयाची तपासणी केली. यामध्ये सह दुय्यम निबंधक हनमंत चव्हाण यांच्यावर स्पष्ट दोष ठेवण्यात आला असतानाही त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विशेष ‘प्रेम’ असल्याची चर्चा सुरू आहे.

# प्रा.मुळे व डॉ.सेलमोकर लिखित पुस्तकाचे प्रकाशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ येथे “लाईफ स्किल्स (जीवन कौशल्ये) 2.0 – भाग पहिला” या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. हे पुस्तक प्रा. जीवन मुळे (माजी प्राचार्य, पॉलिटेक्निक कॉलेज)आणि डॉ. सौ.प्रीतम हेमंत सेलमोकर सहाय्यक प्राध्यापक,मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग,सीओईपी टेक यांनी संयुक्तपणे लिहिले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. डॉ नितीन करमळकर,माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या हस्ते सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या सभागृहात संपन्न झाले.या प्रसंगी प्रा. डॉ सुनील भिरुड, कुलगुरू सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ,डॉ. डी. एन.सोनवणे,कुलसचिव, प्रा.पराग सदगीर,अधिष्ठाता,स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी,डॉ चेतन पाटील,अधिष्ठाता डॉ. प्रशांत बारटक्के,सहयोगी अधिष्ठाता,डॉ प्रदीप देशमुख विभाग प्रमुख संगणक शास्त्र यांची मुख्य उपस्थिती होती.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला,(NEP -२०२०) अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC ) पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी लाईफ स्किल्स-२.० हा विषय विशेषत्वाने निर्धारित केला आहे.हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा उद्देश तरुण पिढीचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास व्हावा.



**पुणे** सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ येथे “लाईफ स्किल्स (जीवन कौशल्ये) 2.0 – भाग पहिला” या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.या प्रसंगी प्रा.डॉ सुनील भिरुड, कुलगुरू सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ,डॉ. डी. एन.सोनवणे,कुलसचिव, प्रा.पराग सदगीर,अधिष्ठाता,स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी,डॉ चेतन पाटील,अधिष्ठाता डॉ. प्रशांत बारटक्के,सहयोगी अधिष्ठाता,डॉ प्रदीप देशमुख विभाग प्रमुख संगणक शास्त्र यांची मुख्य उपस्थिती होती.

# म्हसोबाराया श्रीकृष्णाच्या वृंदावनातील पुष्पप्रतिकृतीमध्ये




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शुक्रवार पेठेतील अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्टचा म्हसोबा उत्सव महात्मा फुले मंडई, बुरुड आळी येथे आयोजित करण्यात आला आहे. उत्सवाच्या निमित्ताने म्हसोबा मंदिरात विविधरंगी फुलांनी साकारलेल्या २५ फूट उंचीच्या भगवान श्रीकृष्णाच्या वृंदावनातील आकर्षक पुष्पसजावटीमध्ये म्हसोबाराया विराजमान झाले आहेत. प्रारंभी श्रीं चा रुद्राभिषेक व रुद्रयाग, महाआरती आदी धार्मिक कार्यक्रमांनी उत्सवाला थाटात प्रारंभ झाला.

उत्सवाच्या पहिल्या दिवशी सकाळी सलोनी व अमर सोनावणे, नीता व विनायक गायकवाड यांच्या हस्ते श्रीं चा रुद्राभिषेक व रुद्रयाग पार पडले. तर, दुपारी भिंताडे उद्योग समूहाच्या शालन भिंताडे, पृथ्वी भिंताडे यांच्या हस्ते श्रीं ची महाआरती झाली. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त अध्यक्ष राहुल सूर्यवंशी, विश्वस्त उपाध्यक्ष निवृत्ती जाधव, पूजा जाधव यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मंडई म्हसोबा मंदिराच्या परिसरात पुष्पसजावटीसोबतच विविधरंगी विद्युतरोषणाई देखील करण्यात आली असून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिर परिसरात साकारण्यात आलेल्या २५ फूट उंचीच्या भगवान श्रीकृष्णाच्या वृंदावनातील पुष्पप्रतिकृतीसोबतच बासरीची भव्य पुष्पप्रतिकृती देखील साकारण्यात आली आहे. याकरिता शेवंती, झेंडू, गुलाब यांसह अनेक फुले वापरण्यात आली आहेत. सुभाष सरपाले यांच्या मार्गदर्शनाखाली कारागिरांनी ही आरास साकारली आहे. वेंकीज उद्योग समूहाचे संचालक बालाजी राव आणि माणिकचंद उद्योग समूहाचे चेअरमन प्रकाश धारीवाल यांचे या उत्सवाला विशेष मार्गदर्शन मिळाले आहे.

### दीपोत्सव होणार अनोख्या पद्धतीने

धार्मिक उत्सवासोबतच विधायक उपक्रम हे उत्सवाचे वैशिष्ट्य आहे. त्यामध्ये वंचित विशेष मुलांना आर्थिक निधी प्रदान, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य प्रदान करण्याचा उपक्रम तसेच समाजातील विविध संस्थांना आर्थिक मदत देखील देण्यात येणार आहे. दीप अमावस्येनिमित्त दीप पूजन व दीपोत्सव करुन आगळ्यावेगळ्या पद्धतीने होणार आहे.



## जाधवर 'नर्सिंग इन्स्टिट्यूट' च्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**पुणे :** कै. उद्धवराव तुळशीराम जाधवर फाउंडेशनच्या इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग मध्ये परिमल आणि प्रमोद चौधरी फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने २.५ लाखांहून अधिक रकमेच्या फेलोशिप्स पात्र आणि गुणवंत विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आल्या. फेलोशिप प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये तृतीय वर्षातील पायल निकम व मोहिनी वाळुंज यांना प्रत्येकी ५२ हजार ५०० रुपये इतकी रक्कम देण्यात आली. तसेच द्वितीय वर्षातील साक्षी काकडे, विद्या चवरे आणि स्नेहल दळवी या तिघींना प्रत्येकी ५६ हजार रुपयांची फेलोशिप प्रदान करण्यात आली. ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने व गुणवत्तेने ही शिष्यवृत्ती मिळवली आहे. ही मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील आत्मविश्वासाला आणि प्रेरणेला दिलेला हात आहे. ही फेलोशिप विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रवासाला गती देणार असून, आरोग्यसेवेत काम करण्याची त्यांची जिद्द व निर्धार अधिक बळकट करणारी ठरणार आहे.



## 'डेटा सायन्स सेंटर ऑफ एक्सलन्स' ची स्थापना

**पुणे :** कीस्टोन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग, उद्योगाच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन, DOMO Incorporation च्या सहकार्याने डेटा सायन्स सेंटर ऑफ एक्सलन्स ची स्थापना केली आहे. या केंद्राचे उद्घाटन आज उत्साहात संपन्न झाले.

DOMO ही संस्था जगातील टॉप ५ डेटा सायन्स कंपन्यांपैकी एक असून, या केंद्रासाठी DOMO हा अधिकृत उद्योग भागीदार आहे. या उपक्रमांतर्गत कीस्टोनच्या विद्यार्थ्यांना डेटा सायन्सचे कौशल्य प्रशिक्षण, इंटर्नशिप, तसेच उद्योग आधारित प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळणार आहे, जे त्यांना उद्योगाच्या गरजेनुसार तयार करण्यात मदत करेल.

उद्घाटनप्रसंगी अश्फाक शेख, डायरेक्टर DOMO इंडिया आणि कृष्णात पवार, DOMO चे प्रॉडक्ट एक्स्पर्ट उपस्थित होते. त्यांनी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी डेटा सायन्समधील करिअरच्या संधींबाबत माहिती दिली आणि DOMO ची कार्यपद्धती समजावून सांगितली.

या कार्यक्रमास प्रा. यशोधन सोमण, संस्थापक संचालक, डॉ. संदीप कदम, प्राचार्य, अंकित लुनावत, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. कदम यांनी कीस्टोनच्या उद्योगसिद्ध अभियंते घडवण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आणि DOMO सोबतची ही भागीदारी अभ्यासक्रम आणि उद्योगातील गरजांमधील अंतर कमी करण्यात उपयुक्त ठरेल असे सांगितले.



## व्यासंगी संशोधक-साहित्यिकाच्या कार्याचे स्मरण

**पुणे :** लोकमानसातील विठ्ठल, श्रीविठ्ठलाच्या मूर्तीमागील कहाणी, विठ्ठलाचे वैदिकीकरण, संत साहित्य व लोकसाहित्याचा अनुबंध, अशा प्रकरणांमधून श्रीविठ्ठलाचे रुप उलगडत गेले. राजस सुकुमार मदनाचा पुतळा, कृष्णें वेधली विरहिणी बोले, ‘कोण तो सोवळा, कोण तो ओवळा’, ‘झाला प्रेतरूप शरीराचा भाव’, अशा अवीट गोडीच्या संतरचनांमध्ये रसिक तल्लीन झाले होते. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून झालेल्या या कार्यक्रमात प्रतिभावंत अन् व्यासंगी संशोधक-साहित्यिकाच्या कार्याचे स्मरण झाले.

निमित्त होते, ‘विठो पालवीत आहे’ या सांगीतिक अभिवाचनाचे व पुस्तक प्रकाशनाचे. डॉ. रा. चिं. ढेरे संस्कृती संशोधन केंद्रातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या पूर्वार्धात डॉ. अरुणा ढेरे संपादित व पद्मगंधा प्रकाशनातर्फे प्रकाशित बहुरूपी रामकथा’ या पुस्तकाचे प्रकाशन झाले. तसेच डॉ. रा. चिं. ढेरे लिखित ‘श्रीविठ्ठल ः एक महासमन्वय’ या ग्रंथाच्या इंग्रजी अनुवादाचे आणि ‘भारतीय रंगभूमीच्या शोधात’ व ‘बोरकरांची प्रेमकविता’ या दोन पुस्तकांच्या पुनर्मुद्रित आवृत्तीचेही प्रकाशन झाले.

## हरणांच्या मृत्युची चौकशीची मागणी

**पुणे :** कात्रज येथील राजीव गांधी प्राणिसंग्रहालयामध्ये मृत्युमुखी पडलेल्या १५ हरणांच्या प्रकरणाची चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी प्रयोगशाळेचा आणि पशुवैद्यकीय चौकशी अहवाल जाहीर करावा, अशी मागणी हाय लाइट फोरमने केली आहे.

हाय लाइट फोरमचे अध्यक्ष उमेश नाईक, उपाध्यक्ष राम तोरस्कर, महिला सदस्य संगीता गवसकर, माहिती अधिकार कार्यकर्त्या वर्षा नाईक, भारती बोरगडे आणि साहिल नाईक यांनी ही मागणी केली आहे. यामध्ये महापालिका आयुक्तांनी संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यांवर पोलिस तक्रार दाखल करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.



## ‘वेलकम टू दि रेनी सीजन’ ने भारावले विद्यार्थी...!

**पिंपरी :** शाहूनगर येथील अभिषेक विद्यालयम् मध्ये विद्यार्थ्यांना पावसाचा आनंद व पावसाळा ऋतूची माहिती देण्यासाठी ‘वेलकम टू दि रेनी सीजन’ हा उपक्रम साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांना पावसाळ्यामध्ये होणारे निसर्गातील बदल व या ऋतूत आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याबद्दल माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी छत्री व रेनकोट याचा वापर करून पावसाचा आनंद घेत पावसामध्ये मनसोक्त खेळण्याचा आनंद लुटला. त्याचबरोबर पावसाळी वातावरणाचे हुबेहूब चित्र डोळ्यापुढे आणण्यासाठी वर्गखोली पावसाळा ऋतूप्रमाणे सजवण्यात आली होती. त्याअंतर्गत वर्गामध्ये धबधबा, होडी, बेडूक, झाडे-वेली, ढग, पावसाचे थेंब यांचा वापर करण्यात आला. संस्थेचे व्यवस्थापकीय सुरेश कसबे, मनीषा कसबे, ऋतुजा कसबे, वैभव कसबे, मुख्याध्यापिका पूर्व प्राथमिक मेघा इंगोले, प्राथमिक विभाग शिल्पा क्षीरसागर, माध्यमिक विभाग कविता भोसले, कनिष्ठ विद्यालय प्राचार्या प्रेमा जोशी आदी उपस्थित होते.



## डॉ. तेलंग हॉटेलमध्ये विद्यार्थी स्वागत समारंभ

**चिंचवड :** संभाजी नगर येथील कॅम्प एज्यूकेशन सोसायटीचे डॉ. अरविंद बी. तेलंग इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी कॅम्प एज्यू सोसायटीचे अध्यक्ष वालचंद डी. संचेती, कॅनरोड हॉटेलचे महा व्यवस्थापक अभिषेक सहाय, मारिओट हॉटेलचे मनुष्यबळ विकास व्यवस्थापक पौर्णिमा कुमारी ग्रँड एक्सोटीकाचे आम्रपाली देसाई , प्राचार्य (डॉ.) अजयकुमार राय आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून राष्ट्रगीताने झाली. प्राचार्य डॉ.अजय कुमार राय यांनी अतिथींचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला.

यावेळी अभिषेक सहाय म्हणाले कि, विद्यार्थ्यांनी स्वतःसाठी नाही तर जगासाठी तयार व्हा असा मोलाचा सल्ला दिला. चांगले समृद्ध जीवन जगायचे असेल तर चौकटी बाहेर पडून खूप मेहनत करा. या हॉटेल उद्योगामध्ये अनेक मोठं मोठे कलाकार , उद्योजक येत असतात, त्यामुळे त्यांना चांगली सेवा द्यायची आपल्याला एक संधी मिळते. आणि त्यांच्याकडून आपल्याला खूप चांगल्या गोष्टी शिकायला देखील मिळतात. यासाठी विद्यार्थ्यांनी आपले इंग्रजी संभाषण कौशल्य, व्यक्तिमत्व विकास आणि विशेष हॉस्पिटॅलिटी कौशल्य वाढवावे, असा सल्ला दिला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन द्वितीय वर्षातील विद्यार्थी कु. मृणाल सोनकुसरे आणि विद्यार्थिनी कु. आदिती भालेराव यांनी केले तर प्रा.शेखर खैरनार यांनी आभार प्रदर्शन केले.

## बहारदार कवितांनी रंगले काव्यसंमेलन

**पिंपरी :** विसावे राज्यस्तरीय समरसता साहित्य संमेलन नांदेड येथे होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर ‘कवितेकडून कवितेकडे..’ हे काव्यसंमेलन नुकतेच निगडी येथे पार पडले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पिंपरी-चिंचवड शाखाध्यक्ष राजन लाखे कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी होते. स्वरा देशमुख हिने ईशस्तवन केले. सुहास घुमरे यांनी प्रास्ताविकातून ‘नव्वदोत्तरी कविता’ विषयावर संमेलन केंद्रित असल्याचे सांगितले.

डॉ. वैशाली मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली ‘नव्वदोत्तरी कवितेतील स्थित्यंतरे’ परिसंवादात अरुण बोऱ्हाडे (नव्वदोत्तरी कामगार कविता), अभिजित काळे (नव्वदोत्तरी गझल), मानसी चिटणीस (नव्वदोत्तरी ग्रामीण कविता) यांनी ऊहापोह केला. त्यानंतर ‘करम बहावा’ या सत्रात चिन्मयी चिटणीस, भालचंद्र कुलकर्णी, डॉ. मंदार खरे, निरुपमा महाजन, प्राजक्ता वेदपाठक, मिलिंद छत्रे, वैशाली माळी यांनी वैविध्यपूर्ण कवितांचे सादरीकरण केले. अंतिम सत्रात प्रा. सुरेखा कटारिया यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विनायक कुलकर्णी आणि आनंद हरी यांच्या प्रमुख उपस्थितीत वीस कवींनी बहारदार कवितांचे सादरीकरण केले.

पद्मश्री गिरीश प्रभुणे, विधान परिषद आमदार उमा खापरे, महाराष्ट्र समरसता साहित्य परिषद कोषाध्यक्ष सुनील ढेंगळे, प्रांत संयोजक प्रा. डॉ. धनंजय भिसे, वन्यजीव अभ्यासक डॉ. सुधीर हसमनीस, समरसता साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड शाखाध्यक्ष मानसी चिटणीस यांची यावेळी उपस्थिती होती.

## भरधाव ट्रकच्या धडकेत तरुण गंभीर जखमी

**पिंपरी :** सिमेंट मिक्सर ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना तळवडेतील त्रिवेणीनगर चौक येथे घडली. सोहम श्रीराम नाईक असे या अपघातात जखमी झालेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी त्याचे वडील श्रीराम वसंत नाईक (रा. कृष्णानगर, चिंचवड) यांनी चिखली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी ट्रकवरील अज्ञात चालकावर गुन्हा दाखल केला आहे. सोहम नाईक हा दुचाकीवरून जात होता. तो त्रिवेणीनगर चौकाजवळ आला असता एका सिमेंट मिक्सर ट्रकने त्यास डाव्या बाजूने जोरात धडक दिली. या धडकेत सोहमच्या डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली. ट्रक चालक अपघातानंतर घटनास्थळावरून पसार झाला.



# शाहू महाराज विद्यालयात ‘एक पेड माँ के नाम’

**पिंपरी :** चिखली शरद नगर येथील बोधिसत्व प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचालित राजर्षी शाहू महाराज विद्यालयामध्ये संस्थेचे सचिव एल.एस.कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थी मारुती जाधव, धनंजय जाधव, विकास मस्के,सुधाकर ओव्हाळ, मुख्याध्यपक बाबाजी शिंदे आणि पालक आदी उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थी, अनेक विद्यार्थ्यांच्या आई यांच्याही हस्ते विद्यालयामध्ये व विद्यालयाच्या शेजारी असणाऱ्या गार्डनमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष घरडे, सुजाता जोगदंड, पूनम तारख, संदीप बोर्गे, कोमल गायकवाड, जितेंद्र सूर्यवंशी, किशोर बडे, योगिता होनमाने, जयश्री महानवर, आनंद गोंदील, प्रमोद रायकर, अमोल सूर्यवंशी, धुडकू कुवर, स्वप्निल पठारे यांनी परिश्रम घेतले.

# ‘आयटी’ पार्क घेणार मोकळा ‘श्वास’...!

### वाहतूक कोंडीवर ‘रामबाण उतारा’: दहा ठिकाणे कोंडीचे ‘हॉटस्पॉट’ निश्चित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** हिंजवडीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आणि आयटी कर्मचाऱ्यांनी कोंडी होणाऱ्या ठिकाणांची संयुक्त पाहणी केली. यामध्ये हिंजवडी, माण, वाकड भागातील १० ठिकाणे वाहतूक कोंडीचे हॉटस्पॉट निश्चित केलेत. त्यावर पुढील दोन-तीन आठवड्यात उपाययोजना राबवल्या जाण्याची अपेक्षा आयटी कर्मचाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

हिंजवडी आयटी पार्कमधील विविध समस्यांसदर्भात १० जुलैला मुख्यमंत्र्यांनी विविध प्रशासकीय विभाग, अनक्लॉग हिंजवडी मोहिमेतील सदस्य व आयटी कर्मचारी संघटना यांची बैठक बोलावली होती. त्यानंतर पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिलेल्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त सारंग आव्हाड यांच्यासह वाहतूक पोलिस व अनक्लॉग हिंजवडी मोहिमेच्या सदस्यांनी पाहणी केली.



“ आयटी कर्मचारी व स्थानिक यांच्यासोबत अतिरिक्त आयुक्तांनी संपूर्ण आयटी पार्कचे सर्वेक्षण केले. कोंडीच्या मुख्य जागांची आम्ही माहिती देऊन कोंडी कशी टाळता येईल याबाबत सूचना दिल्या. आयटी पार्कमध्ये सुरळीत प्रवास होणे हीच माफक अपेक्षा आहे. येत्या महिन्याभरात आयटी पार्कमधील प्रवास किमान कोंडीमुक्त व्हावा ही अपेक्षा आहे.

**- सचिन लोंढे,** अनक्लॉग हिंजवडी

**कोंडीवर अपेक्षित उपाययोजना**

- पोर्टेबल सिग्नल उभारणे
- वाहतूक पोलिस, वॉर्डन नियुक्त करणे
- दुभाजक उभारणे
- काही चौकांत प्रवेश बंद करणे
- विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांवर कारवाई करणे
- डावीकडे वळण्यासाठी मुक्त मार्ग ठेवणे
- वाहतूक कोंडीचे महॉटस्पॉट
- मधुबन हॉटेल चौक
- शेल पेट्रोल पंप चौक (छत्रपती शिवाजी महाराज चौकापूर्वी)
- छत्रपती शिवाजी महाराज चौक
- पांडवनगर चौक
- मानदेवी मंदिर रोड (फेज ३ )
- एसईझेड भवन सर्कल (फेज ३)
- विप्रो सर्कल, फेज २
- क्रोमा चौक/ॲमस्टरडॅम हॉटेल चौक
- माइंडट्री कन्सल्टिंग चौकाजवळील जंक्शन
- भुजबळ चौकातील सेवा रस्ते

## सेंट्रल चौकात ‘विकएंड’ ला कोंडी...!

### स्थानिक नागरिक हवालदिल: वाहनचालकांचीही तारेवरची कसरत

**देहूरोड :** मावळ, पिंपरी-चिंचवड, हिंजवडी आयटी पार्क आणि पुण्याला जाण्याच्या दृष्टीने देहूरोड सेंट्रल चौक महत्त्वाचा आहे. मात्र, चौकात वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. जुना पुणे-मुंबई महामार्गावर शनिवार आणि रविवारी तीन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात.

सेंट्रल चौकात सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. काही पावलांवर पोलिस ठाणे असूनही चौकात वाहतूक पोलिसांची कमतरता असते. त्यात बेशिस्त वाहतुकीमुळे कोंडी होते. परिणामी, वाहनचालकांना इच्छित स्थळी पोहोचण्यास उशीर होतो. बहुतांश वेळा रुग्णवाहिकांनाही याचा फटका बसतो.



**उपाययोजना**

- रस्ता रुंदीकरण होणे गरजेचे
- पुरेशा वाहतूक पोलिसांची आवश्यकता
- वाहनचालकांनी लेनची शिस्त पाळावी
- उड्डाणपूल झाल्यास कोंडीचा प्रश्न मिटेल
- सिग्नलवर कॅमेरे बसविणे गरजेचे

## निवडणुकीच्या तोंडावर मेट्रो बिहारला पळवली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बिहारची निवडणूक तोंडावर असल्याने मतदारांना खुश करण्यासाठी पुण्याची मेट्रो बिहारला पळवण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. निवडणुकीपूर्वी पाटणा मेट्रो सेवा सुरु करण्यासाठी महामेट्रो रेल कॉर्पोरेशनने राजकीय दबावाला बळी पडत पुण्यासाठी राखीव असलेली मेट्रो गाडी तीन वर्षांच्या भाडेकरारावर बिहारला दिल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस प्रथमेश आबनावे यांनी केला आहे. ही मेट्रो गाडी तात्काळ पुण्यात परत आणली नाही, तर महामेट्रो कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही आबनावे यांनी दिला.

आबनावे म्हणाले, "शहराच्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून पुणे मेट्रो अधिक सक्षम व विस्तारित करण्याची गरज आहे. आजघडीला दररोज सरासरी १.८० लाख प्रवासी मेट्रोचा वापर करीत आहेत. गाड्यांची वारंवारिता वाढवण्यासह प्लॅटफॉर्मवरील गर्दी आणि नव्याने सुरु होणाऱ्या मेट्रो मार्गिका यांसाठी राखीव गाड्यांची उपलब्धता असणे गरजेचे आहे. मात्र, पाटणा मेट्रोला ट्रायलसाठी सध्या स्वतःची मेट्रो ट्रेन नसल्याने पुण्याची ट्रेन तिकडे पाठवण्यात आली. हा निर्णय घेताना पुण्याचे खासदार, आमदार, पालकमंत्री किंवा नागरी प्रतिनिधीना विश्वासात घेतले का? हा प्रश्न आहे. तसेच भाडेकराराच्या अटी नेमक्या काय आहेत?, पुण्यासाठी नवीन ट्रेन संच कधी येणार आहे आणि बिहारला दिलेली मेट्रो ट्रेन परत येणार आहे का? याबाबत आम्हाला शंका आहे."

"पुणे मेट्रोसाठी आवश्यक असलेल्या ३४ मेट्रो ट्रेन संचांपैकी एक राखीव संच (तीन डब्यांची मेट्रो ट्रेन) महामेट्रो रेल कॉर्पोरेशनने पाटणा मेट्रो प्रकल्पासाठी भाडेतत्वावर पाठवला आहे. सदर ट्रेन आता बिहारमधील गीतागड येथील डेपोत आहे. त्यामुळे आता फक्त ३३ संच पुणे महामेट्रोकडे उपलब्ध आहेत. इथे मेट्रो ट्रेनची गरज असताना बिहारला मेट्रो ट्रेन पाठवणे अयोग्य आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून पुण्याच्या विकासावर घाला घालण्याचा हा प्रकार आहे.

“ पुण्याची मेट्रो सेवा अजून अपूर्ण आहे. नवीन मार्ग सुरू होणार आहेत. अशावेळी ही मेट्रो बिहारला पाठवणे म्हणजे पुण्याच्या विकासाला मागे टाकणे आणि बिहारसारख्या राज्याच्या राजकीय अजेंड्यासाठी महाराष्ट्राच्या लोकसेवेला दुय्यम स्थान देण्यासारखे आहे.

**- प्रथमेश आबनावे,** सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस



# पिंपरीच्या पीसीईटीच्या मुकुटात आणखी एक मानाचा तुरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या अंतर्गत २००९ मध्ये स्थापन झालेल्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) या संस्थेने व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रात एक प्रतिष्ठित आणि विद्यार्थी प्रिय एमबीए संस्था म्हणून नाव कमावले आहे. येथून महाराष्ट्रासह देशभरातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या २५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी एमबीएची पदवी प्राप्त केली आहे. यूजीसी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे याचा पीसीईटी च्या विश्वस्त मंडळाला सार्थ अभिमान आहे असे ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न पीएचडी संशोधन केंद्रातून आजपर्यंत ३८ विद्यार्थ्यांनी पीएचडी पदवी प्राप्त केली आहे तर ५५ विद्यार्थी हे पीएचडीचे संशोधन करत आहेत हे देखील गौरवास्पद आहे असे लांडगे म्हणाले.



पीसीईटीच्या स्थापनेला ३३ वर्षे पूर्ण होत असताना यावर्षी एसबीपीआयएम ला स्वायत्तता मिळाली. महाविद्यालयाच्या नियामक मंडळाच्या प्रथम बैठकीत ज्ञानेश्वर लांडगे बोलत होते. यावेळी पीसीटीच्या उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, एसबीपीआयएम च्या संचालक डॉ. किर्ती धारवाडकर, विद्यापीठ नामनिर्देश सदस्य डॉ. राजेश पहुरकर, उद्योजक सागर बाबर, उद्योग तज्ञ राजेश माल्ल्या, डॉ. रूपाली कुदरे, डॉ. काजल माहेश्वरी, डॉ. भूषण परदेशी, डॉ. अनिषकुमार कारिया आदी उपस्थित होते.

डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले की, देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये व्यवस्थापन क्षेत्रात कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने प्रेरित झालेल्या या संस्थेमध्ये जबाबदार तसेच सुसंस्कृत नागरिक घडवण्याचे काम प्राध्यापक वर्ग करीत आहे. एसबीपीआयएम मध्ये ८० टक्के प्राध्यापक पीएचडी धारक आहेत.

ही संस्था मूल्यांवर आधारित उत्तम शिक्षण देणारे केंद्र आहे. आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना केवळ पदवी नाही तर उद्योग जगतात टिकणारे कौशल्य, आचारसंहिता आणि सामाजिक भान देतो. या संस्थेचे अनेक माजी विद्यार्थी देश, विदेशात विविध क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. संस्थेला "नॅक ए प्लस" दर्जा आणि "एनबीए" मान्यता प्राप्त एमबीए प्रोग्राम आहे. तसेच आता पुढील पिढीला उद्योगसज्ज आणि जागतिक नागरिक घडविण्यासाठी अधिक सक्षमपणे काम करू असा विश्वास डॉ. धारवाडकर यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक डॉ. रूपाली कुदरे, आभार डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी मानले.

# ऊर्जा क्षेत्रातील संशोधन व सहकार्यासंदर्भात सामंजस्य करार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बर्कले येथील जागतिक किर्तीच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाशी महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संशोधन आणि धोरण विकास क्षेत्रातील सहकार्यासंबंधी सामंजस्य करार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाला कॅलिफोर्निया विद्यापीठाचे प्रतिनिधी तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्ण बी, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीव कुमार उपस्थित होते. श्रीमती शुक्ला आणि कॅलिफोर्निया विद्यापीठाचे वरिष्ठ सल्लागार मोहित भार्गव यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

या करारामुळे महाराष्ट्रातील उर्जा क्षेत्रात संशोधन, तांत्रिक नवकल्पना आणि धोरणात्मक सहकार्याला गती मिळणार आहे. ऊर्जेचा स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणारा पुरवठा, ऊर्जा साठवणूक उपाय, वीज बाजार रचना, ग्रीड प्रसारण प्रणालीतील सुधारणा, हवामानाशी जुळवून घेणारी धोरणे आणि प्रशिक्षण कार्यक्रम या क्षेत्रांमध्ये संयुक्त काम होणार आहे.

“कॅलिफोर्निया विद्यापीठासारख्या संस्थेच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात उर्जा क्षेत्रात जागतिक दर्जाचे संशोधन आणि नवसंशोधनाला चालना मिळेल. या सामंजस्य करारामार्फत उर्जा साठवणूक, वीज बाजार, प्रसारण व्यवस्था आणि हवामान बदलाशी जुळवून घेणे यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण आणि क्षमता वृद्धी यांना चालना मिळणार आहे.

**ज्ञानसंपादन, संशोधन आणि प्रशिक्षणाची संधी मिळणार**

- स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या विजेचा विकास
- ऊर्जा साठवण तंत्रज्ञानावर संयुक्त शोधन
- वीज मार्केटची रचना आणि धोरण निर्मिती
- ग्रीड प्रसारण क्षेत्रातील नवोन्मेष
- हवामान अनुकूलता (climate resilience) उपाययोजना
- कौशल्यविकास आणि प्रशिक्षण उपक्रम

संपादकीय विशेष

# मग बॉंबस्फोट केले कुणी?

दहशतवाद्यांनी मुंबईतील सात लोकल ट्रेन्समध्ये घडवून आणलेल्या बॉम्बस्फोटांवर अनेक वर्षे चाललेल्या खटल्याचा हायकोर्टात धक्कादायक निकाल लागला. या दहशतवादी हल्ल्याला 19 वर्षे आणि सत्र न्यायालयातील निकालाला दहा वर्षे झाल्यानंतर आता मुंबई उच्च न्यायालयाने बारा आरोपींची शिक्षा रद्द केली. 11 जुलै 2006 रोजी झालेल्या भीषण हल्ल्यात 189 लोकांचा मृत्यू झाला होता आणि 824 जण जखमी झाले होते. हा मुंबईवरील सर्वात मोठ्या दहशतवादी हल्ल्यांपैकी एक ठरला. या निकालानंतर अनेक प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत. या स्फोटांप्रकरणी 2015 मध्ये एका विशेष सत्र न्यायालयाने पाचजणांना फाशीची शिक्षा सुनावली तर इतर सातजणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. तेरावा आरोपी अब्दुल वाहिद यांची सुटका केली होती. शिक्षा झालेल्या 12 पैकी एक आरोपी, कमाल अहमद मोहम्मद वकील अन्सारी याचा 2021 मध्ये मृत्यू झाला होता. 2015 मध्येच राज्य सरकारने ट्रायल कोर्टाने दिलेल्या फाशीच्या शिक्षेची पुष्टी करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यानंतर 2019 ते 2023 दरम्यान दोषींनी शिक्षेला आव्हान देत अपील दाखल केले. तथापि, मोठ्या प्रमाणात पुरावे आणि प्रकरणाची गुंतागुंत यामुळे हे अपील बराच काळ सुनावणीसाठी प्रलंबित राहिले. मुंबई उच्च न्यायालयाने या बारा जणांची निर्दोष मुक्तता करून शिक्षा रद्द ठरवली. पीडितांच्या नातेवाईकांच्या आणि सरकारच्या दृष्टीने हा निकाल धक्कादायक आहे. निकाल देताना खंडपीठाने 'या सर्वांवरचे आरोप सिद्ध करण्यात फिर्यादी पक्षाला पूर्णतः अपयश आले आहे', या शब्दांमध्ये फटकारले. याचाच अर्थ ज्या पुराव्यांवर सत्र न्यायालयाने शिक्षा दिली, तो मुंबई उच्च न्यायालयाने ग्राह्य मानला नाही.



मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाचे मूल्यमापन करून सरकारने आता या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात जावे, असे मत ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम यांनी मांडले. हा निकाल फार धक्कादायक आणि हताश करणारा आहे. 19 वर्षांनंतर सगळे निर्दोष सुटत असतील तर अनेक प्रश्न निर्माण होतात, अशी प्रतिक्रिया बॉम्बस्फोटात मृत्यू झालेल्यांच्या नातेवाईकांनी दिली आहे. त्याचबरोबर सर्वसामान्यांनाही काही प्रश्न पडले. हे सर्वजण निर्दोष आहेत, तर मग तपासात नेमके काय चुकले, या स्फोटांमागचे खरे सूत्रधार कोण आहेत, त्यांचा शोध इतक्या वर्षांमध्ये का लागला नाही या प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत का असा सवाल उपस्थित होत आहे. याशिवाय आताही खऱ्या आरोपींना पकडले तर खटला आणखी 19 वर्ष चालेल का, असे उद्विग्न मनोगत व्यक्त केले जात आहे. या निर्णयाने 12 आरोपींच्या कुटुंबियांसोबतच अब्दुल वाहिद शेख दिन शेख यांनाही दिलासा दिला आहे. सत्र न्यायालयाने अब्दुल यांची 2015 मध्येच मुक्तता केली होती. ते म्हणाले, "हे खूप दिलासादायक आहे. मी खूप आनंदात आहे. मी एवढी वर्ष हेच सांगत आलो आहे की फक्त मीच नाही तर बाकीचेही निर्दोष आहेत.' पण दुसरीकडे बॉम्बस्फोटात बळी पडलेल्यांचे नातेवाईक आणि जखमी झालेल्यांसाठी मात्र न्याय अजून दूरच आहे.

मार्च 1993 मध्ये ज्या पद्धतीने मुंबईत साखळी बॉम्बस्फोट घडवण्यात आले, तशाच पद्धतीने आरडीएक्स वापरून 2006 मध्ये लोकलमध्ये बॉम्बस्फोट घडवण्यात आले. परिणामी, 200 ते 250 निरपराध प्रवासी या रेल्वे बॉम्बस्फोटात ठार झाले. त्या वेळेस टाडा कायदा अस्तित्वात नव्हता. त्यामुळे दहशतवाद प्रतिबंधक कायद्याखाली हा खटला चालवण्यात आला होता. तपास यंत्रणेने महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा आणि बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला होता. नोव्हेंबर 2006 मध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर, 2015 मध्ये ट्रायल कोर्टाने बारा आरोपींना दोषी ठरवले. यापैकी पाचजणांना फाशीची तर सातजणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांची आता निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. या कायद्याखाली सक्षम पोलीस अधिकाऱ्यांनी काही आरोपींचे कबुलीजबाबही घेतले होते. कायदा आणि न्यायदेवतेच्या दृष्टीनेही हा अत्यंत धक्कादायक निकाल आहे. असे असले तरी सकृतदर्शनी ही बाब स्पष्ट होते की, मुंबईच्या सत्र न्यायालयाने दिलेला निकाल उच्च न्यायालयाने फिरवला. याचाच अर्थ असा की, ज्या पुराव्यांवर सत्र न्यायालयाने शिक्षा दिली होती, तो पुरावा मुंबईच्या उच्च न्यायालयाने अग्राह्य मानला. यातील काही आरोपींना फाशीची शिक्षाही झाली होती. मुंबई उच्च न्यायालयाने त्या सर्व दोषींचीही निर्दोष मुक्तता केली आहे.

मुंबई उच्च न्यायालायने दिलेल्या निर्णयामुळे राज्य सरकारला दणका बसला. या प्रकरणी सातजणांना जन्मठेप, तर पाचजणांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. या पाचजणांनी फाशीच्या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. बारा दोषींपैकी एकाचा आधीच मृत्यू झाला आहे. 19 वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर दोषींची निर्दोष मुक्तता झाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर उद्विग्न प्रतिक्रिया उमटल्या. उच्च न्यायालयाला जवळजवळ सर्वच सरकारी वकिलांचे युक्तिवाद अपूर्ण वाटले. तसेच दोषींविरोधात केवळ शंकेपलिकडे कोणतेही सबळ पुरावे तपास यंत्रणा सादर करू शकली नाही, असे महत्त्वाचे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले. जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आलेल्या सात आरोपींमध्ये तनवीर अहमद अन्सारी, मोहम्मद माजिद शफी, शेख मोहम्मद अली आलम, मोहम्मद साजिद मार्गुब अन्सारी, मुझम्मिल अतौर रहमान शेख, सुहेल मेहमूद शेख आणि जमीर अहमद लतीफुर रहमान शेख यांचा समावेश आहे. या सातही जणांना न्यायालयाने निर्दोष ठरवले आहे.

सरकारला आता या निकालाची पुन्हा एकदा चाचपणी करून सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करावे लागेल. सरकारला या निकालाबाबत अंतर्मुख होऊन विचार करावा लागेल. तसेच निर्दोष मुक्ततेविरुद्ध अपील आणि शिक्षेविरुद्ध अपील हे तातडीने चालवले गेले पाहिजे. काही खटल्यांमध्ये आरोपी सत्र न्यायालयात निर्दोष सुटतात, त्याविरोधात सरकार अपील करते. परंतु, त्याची सुनावणी बरेच वर्ष होत नाही आणि तो निर्णय फिरल्यानंतर धक्का बसू शकतो. ज्या गुन्ह्यात आरोपींना शिक्षा झाली आहे, त्याचे अपील तातडीने लागले पाहिजे. परिणामतः सरकारला तातडीने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करावे लागेल आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाचे मूल्यमापन करावे लागेल, असे उज्ज्वल निकम यांनी स्पष्टपणे सांगितले.

# हवामानबदल आणि गावसमस्यांचा सामना

**देशातील सुमारे 65 टक्के लोकसंख्या खेड्यांमध्ये राहते. अशा परिस्थितीत, पंचायत स्तरावर बनवलेल्या हवामान कृती योजना हवामान बदलापासून संरक्षण, शाश्वत विकास आणि हवामानाशी सामना करण्याची तयारी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. पंचायत कृती योजनेच्या मदतीने, पंचायती क्षेत्राच्या गरजा समजून घेऊन, तेथील संसाधने लक्षात घेऊन एकत्रितपणे उपाय शोधू शकतात.**

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे
पर्यावरण अभ्यासक

मे महिन्याच्या सुरुवातीला बिहारमधील छपरा येथे अचानक झालेल्या मुसळधार पावसाने गव्हाचे पीक उद्ध्वस्त केले. त्याचप्रमाणे झारखंडमधील गुमला येथील सिल्वेस्टर तिर्की म्हणाले की मुसळधार पाऊस आणि वादळामुळे त्यांच्या गावातील महुआ पिकाचेही नुकसान झाले. या दोन्ही ठिकाणच्या लोकांना उष्णतेपासून काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी पावसाची वेळ चुकीची होती. मे महिन्यातच, मणिपूर, आसाम आणि मिझोरामसारख्या ईशान्येकडील राज्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि पुरामुळे जीवितहानी झाली. वित्तहानीही मोठ्या प्रमाणात झाली. अवकाळी पाऊस किंवा कमी कालावधीत जास्त पाऊस हा बहुतेकदा हवामानबदलाचा परिणाम मानला जातो; परंतु बिहार, झारखंड आणि ईशान्य भारतात अलिकडेच आलेले पूर हे इतर काही कारणांमुळे झाले असे गृहीत धरले, तरी या आपत्तींमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई करण्याचा कोणताही प्रभावी मार्ग आपल्याकडे अजूनही नाही. म्हणूनच हवामान लक्षात घेऊन सरकारी हवामान योजनेत 'तोटा आणि नुकसान' आणि हवामान अनुकूलन आणि शमन यासारख्या पायऱ्यांना सर्वोच्च प्राधान्य देणे महत्वाचे आहे. भारतीय संविधानाच्या 73 व्या दुरुस्ती अंतर्गत, पंचायतींना 29 बाबींवर काम करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्यात पाणी, वन, शेती आणि ऊर्जा यासारख्या विषयांचा समावेश आहे. हे सर्व मुद्दे थेट हवामानाशी संबंधित आहेत. पंचायत कृती योजनेच्या मदतीने, गाव सरकारे म्हणजेच पंचायती त्यांच्या क्षेत्राच्या गरजा समजून घेऊ शकतात, तेथील संसाधने ओळखू शकतात आणि एकत्रितपणे उपाय शोधू शकतात. या योजनांद्वारे, दुष्काळ, पाण्याची कमतरता, पूर, मातीची खराब स्थिती, जंगलतोड आणि कचरा विल्हेवाट यासारख्या अनेक प्रमुख समस्यांवर उपाय शोधता येतात.

या कृती आराखड्यामुळे भारताला 2070 पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जनाचे उद्दिष्ट गाठण्यास मदत होईल. तसेच, हे पॅरिस करारातील भारताच्या घोषित 'राष्ट्रीयरित्या निर्धारित योगदान' उद्दिष्टांशी सुसंगत आहे. त्या अंतर्गत भारताला 2005 च्या तुलनेत 2030 पर्यंत हरितगृह वायू उत्सर्जनाची तीव्रता 45 टक्के कमी करायची आहे आणि एकूण वीजनिर्मिती क्षमतेच्या 50 टक्के क्षमता जीवाश्म नसलेल्या स्रोतांमधून मिळवायची आहे. 2008 मध्ये सुरू झालेल्या 'नॅशनल अ‍ॅक्शन प्लॅन ऑन क्लायमेट चेंज' (एनएपीसीसी) मध्ये शाश्वत शेती आणि अक्षय ऊर्जा हे सर्वात महत्त्वाचे घटक मानले जातात, तसेच या दोन्ही कामांमध्ये गावांची भूमिका सर्वात महत्त्वाची आहे. हवामान संकट हे केवळ हवामानाशी संबंधित नाही, तर आपल्या उपजीविकेशी, आरोग्य, अन्नसुरक्षा आणि सामाजिक समानतेशीदेखील संबंधित आहे. म्हणूनच हे समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे की पंचायत स्तरावर हवामानाशी संबंधित प्रत्येक लहान उपक्रमाचा मोठा आणि दीर्घकालीन परिणाम होतो. सर्वप्रथम गावांमधील पाण्याच्या स्रोतांची काळजी घेणे आणि त्यांची स्वच्छता करणे खूप महत्त्वाचे आहे. गावांमधील जुने तलाव, नद्या आणि नाले हे केवळ पाण्याचे स्रोत नाहीत, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे जीवनदायित्व आहे. ते सुकतात किंवा प्रदूषित होतात तेव्हा शेतांवर, पिण्याच्या पाण्यावर आणि भूजलावरही परिणाम होतो. म्हणूनच त्यांची स्वच्छता आणि दुरुस्ती करणे खूप महत्त्वाचे आहे; जेणेकरून पाणी वाचवता येईल, सिंचन सुधारता येईल, पूर रोखता येईल आणि जैवविविधताही राखता येईल.

कचऱ्याची योग्य विल्हेवाट ही आज गावांमध्ये आणि शहरांमध्येही एक मोठी समस्या आहे. कचरा जाळल्याने मिथेनसारखे हानिकारक वायू वाढतात. ते हवा, माती आणि पाणी प्रदूषित करतात. कचऱ्याचे व्यवस्थापन वर्तुळाकार अर्थव्यवस्थेअंतर्गत केले पाहिजे. त्यात कचऱ्यापासून नवी उत्पादने बनवता येतील आणि लोकांना रोजगारदेखील मिळू शकेल. भारतातील शेतीवर हवामान आणि सरकारी दुर्लक्षाचा परिणाम स्पष्टपणे दिसून येतो. कधी दुष्काळ, कधी पूर, कधी गारपीट, कधी अति उष्णता, कधी टोळधाडीचा हल्ला होतो. या सर्वांमध्ये शेतकरी नेहमीच अडचणीत असतात. याशिवाय त्यांच्या पिकांना योग्य किंमत मिळत नाही, कधी कधी त्यांना पीकविमा मिळत नाही, बाजारपेठ मिळत नाही किंवा कर्जाचा भार वाढतो. अशा आव्हानात्मक व्यवस्थेत, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानासह नैसर्गिक आणि पारंपारिक पद्धतींचा मेळ घालून शेती चांगली आणि शाश्वत बनवता येते. स्वदेशी बियाण्यांचे संवर्धन, भात आणि गहूऐवजी पर्यायी धान्ये (रागी, बाजरी इत्यादींचा) प्रचार, पावसाचे पाणी गोळा करणे (पावसाच्या पाण्याची साठवणूक), एकत्रितपणे वेगवेगळी पिके घेणे, सेंद्रिय खतांचा वापर करणे आणि संवेदनशील बाजारपेठ विकसित करणे असे पर्याय प्रत्यक्षात आणले पाहिजेत. हिरवे क्षेत्र आणि जैवविविधता वाढवणे हे केवळ झाडे लावून साध्य होणार नाही, तर गावे आणि शहरांमध्ये सामूहिक जंगलांचे संरक्षण करणे, कुरणांचे संरक्षण करणे आणि तेथे आढळणाऱ्या स्थानिक प्रजातींचे संरक्षण केल्याने केवळ हवामान संतुलित होईल असे नाही, तर गावातील लोकांचा सहभागदेखील वाढेल.

गावांना स्वच्छ, शाश्वत, स्वस्त आणि विश्वासार्ह ऊर्जा प्रदान करणेदेखील खूप महत्वाचे आहे. सौर ऊर्जा (जसे की छतावरील सौर आणि शेतांवर स्थापित कृषी-फोटोव्होल्टेइक तंत्रज्ञान), बायोगॅस आणि पवन ऊर्जा यासारखे पर्याय गावांमध्ये लाकूड आणि डिझेलसारख्या प्रदूषणकारी इंधनांची गरज कमी करतील. यामुळे गावांच्या अर्थव्यवस्थेलाही फायदा होईल. कर्नाटक राज्याची विकेंद्रित अक्षय ऊर्जा योजना हे याचे एक उदाहरण आहे. तेथील गावांमध्ये लहान सौर ऊर्जा केंद्रे (सौर मायक्रोग्रिड) बसवली जात आहेत. यातून लवकरच कर्नाटकमधील पाचशेहून अधिक गावे सौर ऊर्जेने प्रकाशित होतील. त्यामुळे सुमारे 12 हजार टन कार्बन उत्सर्जन कमी होईल. गावे आणि लहान शहरांमध्ये स्वच्छ आणि स्मार्ट वाहतूक व्यवस्था सुरू करावी लागेल. ई-रिक्षा, सार्वजनिक बस आणि सायकल ट्रॅक यासारख्या सुविधा वाढवून प्रदूषण आणि वाहतूक समस्या कमी करता येतील. गावांमध्ये हिरवे (पर्यावरण-अनुकूल) उद्योग आणि रोजगार वाढवणे हे हवामान न्यायाच्या दिशेने एक मोठे पाऊल असेल. सौर उपकरणे दुरुस्त करणे, सेंद्रिय शेती, कचरा व्यवस्थापन किंवा पाणी वाचवणे यासारख्या कामांमध्ये प्रशिक्षण आणि नोकऱ्या मिळाल्यास गावातील तरुण स्वावलंबी होतील आणि त्यांच्या गावांमध्ये हवामानाशी संबंधित बदलांचे नेतृत्वदेखील करू शकतील. या सर्व प्रयत्नांमुळे भारत 'सामान्य परंतु भिन्न जबाबदाऱ्या' हे तत्व जगासमोर ठामपणे मांडू शकेल, याची खात्री होईल.

गावांमध्ये हवामानबदलाचा सामना करण्यासाठी करावयाचे प्रयत्न सहसा स्थानिक लोकांच्या ज्ञान आणि अनुभवावर अवलंबून असतात. ही कामे बहुतेक गावातील लोकांच्या सहभागाने पूर्ण केली जातात. ती दीर्घकाळ चालवण्यासाठी देशांतर्गत आणि परदेशी निधीची आवश्यकता असते. सरकारी मदतीबरोबरच खासगी संस्थांकडून मिळणारा निधी आणि कंपन्यांचा 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' निधीदेखील गावांपर्यंत थेट पोहोचला पाहिजे; जेणेकरून हवामानाशी संबंधित योजनांना बळकटी देता येईल. 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर एन्व्हायर्नमेंट अँड डेव्हलपमेंट' (आआयईडी) च्या अहवालातून दिसून आले आहे की गावकऱ्यांकडून चालवले जाणारे हवामान प्रकल्प वरून लादलेल्या योजनांपेक्षा 30 ते 50 टक्के अधिक प्रभावी आणि स्वस्त आहेत, कारण त्यामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग आणि जबाबदारी जास्त आहे. न्याय्य बदलासाठी, असमानता दूर करणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, गावकऱ्यांना तांत्रिक प्रशिक्षण मिळाले पाहिजे, हरित तंत्रज्ञान सहज उपलब्ध असले पाहिजे आणि हवामान योजनांमधून सर्वांना समान लाभ मिळाले पाहिजेत. या गोष्टी हवामानबदल रोखण्याच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील पॅरिस कराराच्या वचनाशीदेखील संबंधित आहेत. गावांमधील गुंतवणुकीकडे पर्याय म्हणून किंवा दयेने पाहणे अन्याय्य ठरेल. त्यांच्याकडे भारताच्या हवामान धोरणाचा एक आवश्यक भाग म्हणून पाहिले गेले पाहिजे, जेणेकरून हवामान योजना देशाच्या बहुसंख्य ग्रामीण लोकांसाठी समान, समावेशक आणि शाश्वत असतील.

2030 आणि 2070 ची हवामानविषयक उद्दिष्टे साध्य करायची असतील, तर भारताने गावे, पंचायती, नागरिक आणि स्थानिक प्रशासन यांना सर्वात महत्त्वाची भूमिका दिली पाहिजे. हवामानविषयक उपाय खरे आणि प्रभावी असतील, तरच गावांच्या वास्तविकतेत रुजलेले असतील. हे प्रयत्न केवळ धोरणात्मक बाब नाहीत तर राष्ट्रीय जबाबदारीदेखील आहेत. याची जाणीव ठेवली, तर भारत समावेशक विकासाकडे वाटचाल करू शकेल आणि जगभरातील हवामानविषयक निर्णयांमध्ये प्रमुख भूमिका बजावू शकेल.

खेचाखेची

## गुळण्या करा

कोमट पाण्यात थोडी हळद आणि मीठ घालून गुळण्या केल्या तर.....

वर लटकत असलेली कोळ्याची जळमटं दिसतात.

.
.
.

म्हटलं, सणवार जवळ आले आहेत तर सांगून टाकावं. नाही तर मान सदा न कदा मोबाईल मधे खालीच असते.

वेगळं काही


एका अभ्यासानुसार जेव्हा आपण एखादी छोटी वस्तू हातात धरतो तेव्हा आपल्या हातांना अस्वस्थता जाणवू लागते. आपण तणावाखाली असलो तर ही अस्वस्थता जरा जास्तच वाढते. अशावेळी त्या छोट्या वस्तूला हातात धरल्यावर खूप चांगलं वाटतं. समाधान वाटतं. त्यातच बबल रॅपचे फुगे फोडल्यानंतर जरा जास्तच समाधान वाटतं. त्यामुळे बबल रॅप हाती आल्यावर आपल्याला आनंद होतो. मग आपण ते फुगे फोडायला लागतो. अशावेळी फुगे फोडताना आपलं लक्ष फक्त तिकडे लागून राहिलेलं असतं. त्यामुळे आपण काही काळ ताणतणाव विसरून जातो. बबल रॅपमधले फुगे फोडल्याने आपल्यावरचा ताण कमी होतो, असं विज्ञान सांगतं.

सौंदर्यसाधना

## पावसाळ्यात मुरुमांचा त्रास?

पावसाळी वातावरणात कधी संततधार पाऊस तर कधी रिपरिप अनुभवायला मिळते. या कुंद हवेमुळे त्वचेवरही परिणाम होतो. याचाच परिणाम म्हणून त्वचेवर पिंपल्स येतात. टुथपेस्ट लावल्याने मुरुमं निघून जातात असं काहींना वाटतं. पण हा समज तितकासा खरा नाही. पिंपल्सवर टूथपेस्ट लावल्याने काही काळासाठी त्यांची तीव्रता कमी झाल्यासारखी वाटत असली तरी वारंवार टूथपेस्टचा वापर त्वचेच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. यामुळे त्वचा कोरडी पडतेच शिवाय रॅशेस उठण्याचीही शक्यता असते. त्यामुळे पिंपल्सवर टूथपेस्ट लावणं टाळा. तज्ज्ञांकडून तपासणी करुन त्यांनी सांगितलेलं क्रीम लावणं हाच पिंपल्स घालवण्याचा खात्रीशीर उपाय आहे. त्वचा निस्तेज दिसत असेल तर मात्र काही घरगुती उपाय योजता येतील. उदाहरणार्थ पावसाळ्यात त्वचेची रोमछिद्रं उघडतात आणि त्यात घाण आणि धूळ साठते. या समस्येवर उपाय म्हणून चेहऱ्यावर लिंबू आणि अंड्याच्या पांढऱ्या भागाचं मिश्रण लावावं. टोमॅटोचा रसही फायदेशीर ठरतो. हा लेप कोमट पाण्याने धुवून टाकावा. त्यामुळे चेहऱ्यावर तकाकी येते.






राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या घडामोडी घडतील. विवाहाच्या प्रयत्नांना गती येईल. व्यवसायात प्रतिकूलता राहणार आहे.
- **वृषभ** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. वरिष्ठांची मर्जी राखावी. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी.
- **मिथुन** : स्नेही, आप्तेष्टांच्या भेटीगाठी होतील. वाढत्या खर्चाचा ताण राहील. विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल.
- **कर्क** : महत्त्वाचे करार रखडतील. कार्याच्या विस्ताराला चालना मिळेल. यांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **सिंह** : बोलण्यातून गैरसमज संभवतात. कार्यकारणभाव जाणून घ्या. प्रवासाचे बेत सफल ठरणार आहेत.
- **कन्या** : सातत्य, चिकाटी कामी येईल. रखडलेली कामं मार्गी लागतील. प्रियजनांच्या भेटीगाठी होतील.
- **तूळ** : स्वकर्तृत्त्वावर विश्वास ठेवावा. नोकरी-व्यवसायात उत्तम संधी लाभतील. गुणीजनांचा गौरव होईल.
- **वृश्चिक** : अनावश्यक खर्चाचा ताण राहील. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा. मानसिक अस्वास्थ्य राहील.
- **धनु** : कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. मुलांच्या गुणांना वाव मिळेल. स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील.
- **मकर** : आजचा दिवस खास आहे. सर्व काही मनाप्रमाणे घडेल. मोठी खरेदी करणं तुर्तास टाळायला हवं.
- **कुंभ** : अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल. नव्या योजना मार्गी लागतील. मुलांची मनाजोगी प्रगती होईल.
- **मीन** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. उपजत कला-गुणांना वाव मिळेल. उत्कर्षाच्या संधी लाभतील.

संगोपन

## रडण्यामागील कारणं ओळखा

✼ डायपर बदलणं, बाळाला मोठं भावंडं असेल आणि तेही एकाच खोलीत झोपत असेल तर त्याच्या हालचालींमुळेही बाळ रात्री अपरात्री उठू शकतं. पंखा, एसीचा आवाज किंवा गाडीचा हॉर्न अशा आवाजांमुळे दचकून बाळ उठू शकतं. ✼ आई बाळाला जास्त काळ दूध पाजत असेल तर रात्री भूक लागल्याने ते जागं होऊ शकतं. भुकेची जाणीव त्याची झोपमोड करते आणि दूध प्यायला मिळेल या अपेक्षेने बाळ रडतं. ✼ वैद्यकीय कारणांमुळेही बाळ रडू शकतं.

आधी नमूद केलेल्या तिन्ही शक्यता पडताळून पाहिल्यानंतरही रात्री बाळ रडत असेल तर त्यामागे काही वैद्यकीय कारणं असू शकतात. खोकल्यामुळे त्याला जाग येत असेल तर याचा संबंध अस्थमाशी असू शकतो. निद्रानाश हे सुद्धा यामागचं कारण असू शकतं. पोटात आम्लाची निर्मिती झाल्यामुळे पोटदुखी आणि उलट्या अशा समस्या निर्माण होतात आणि बाळ रडू लागतं. अशी लक्षणं दिसली तर तातडीने डॉक्टरांकडे जायला हवं.

## २३ जुलै

दिनविशेष

१९९९ : ए.एन.ए. फ्लाइट ६१ या विमानाचं टोकियो येथून अपहरण.
२०१३ : सर्वोच्च न्यायालयानं संजय दत्तची दया याचिका फेटाळली.
२०१७ : लॉर्डसवर इंग्लडच्या महिला क्रिकेट संघाची विश्वविजयी पताका, भारत उपविजेता.
२०१८ : मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्लाप्रकरणी दोषी ठरवण्यात आलेल्या डेव्हिड कोलमन हेडली याला शिकागो येथील तुरुंगात दोन कैद्यांकडून जबर मारहाण. हेडलीची प्रकृती चिंताजनक.

कोण होणार

## रोबोटिक्समध्ये आहेत संधी

तंत्रज्ञानात बरीच प्रगती होत आहे. तुम्हालाही तंत्रज्ञानाची आवड असेल तर रोबोटिक्सची निवड करता येईल. रोबोटिक्स हे वेगाने वाढणारं क्षेत्र आहे. इथे करीअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. बांधकाम, उत्पादन तसंच आरोग्य या क्षेत्रांमध्ये रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. तसंच या क्षेत्रांमध्ये रोबोटिक्सचा वापर करण्याची खूप मोठी संधीही आहे. शस्त्रक्रियेच्या क्षेत्रातही रोबोटिक्सची मागणी खूप वाढणार आहे. २०१७ ते २०२५ या काळात देशात सर्जिकल रोबोटिक्सच्या बाजारपेठेत २० टक्के वाढ अपेक्षित आहे. 'मेक इन इंडिया' तसंच 'डिजिटल इंडिया'सारख्या मोहिमांमुळेही बांधकाम क्षेत्रात रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा वापर वाढताना दिसत आहे. त्यामुळे भविष्यात रोबोटिक्सची निवड करून तुम्हाला खूप मोठी भरारी घेता येईल. मे २०१५ ते २०१८ या काळात रोबोटिक्समधल्या नोकऱ्यांमध्ये १९१ टक्के वाढ नोंदवण्यात आली. तसंच या क्षेत्रात नोकरी शोधणाऱ्यांच्या संख्येत १८६ टक्के वाढ झाली आहे. या सगळ्याचा विचार केला तर रोबोटिक्समधलं भवितव्य उज्ज्वल आहे असं म्हणता येईल.

पंचांग

**बुधवार, २३ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
आषाढ कृ. १४, नक्षत्र : आर्द्रा
चंद्रराशी : मिथुन, योग : व्याघात
सूर्योदय : ६.१५, सूर्यास्त : ७.१६

फॉरवर्ड्स

**ज़िन्दग़ी इतना तो सिखा रहीं हैं साहब, क़ी...**

**रिश्ता सबसें रखों लेक़िन उम्मीद क़िसी सें नहीं...!**

आरोग्यमंत्र

## आहारात ताक हवं

रोजच्या आहारात ताकाचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपल्या पोटात अनेक प्रकारचे सूक्ष्म जीव संचार करत असतात. त्यातले काही लाभदायी असतात तर काही नुकसान पोहोचवणारे असतात. नुकसानदायक जीव सक्रिय झाल्यास विविध प्रकारचे आजार होण्याची शक्यता असते. मळमळणं, अजीर्ण, ताप, थकवा, उलटी, पोटदुखी अशी लक्षणं जाणवू लागल्यास पोटातील आरोग्यास घातक असे सूक्ष्म जीव सक्रिय झाले आहेत असं समजावं. भूक न लागणं, पोटात वारंवार कळ येणं आदी लक्षणंही या जंतूंचं प्रमाण वाढल्यामुळेच जाणवतात. गोड आणि आम्ल पदार्थांचं जास्त सेवन करणं, भूक लागली नसताना जेवणं, शारीरिक श्रम न करणं यामुळेही पोटाचे विकार वाढत असतात. पोटाच्या अशा विविध व्याधींपासून आराम मिळावा म्हणून आपण लगेच मेडिकलमधून औषधं आणतो. औषधांमुळे तात्पुरता आराम पडतो. परंतु काही वेळानंतर स्थिती जैसे थे होते. म्हणूनच आयुर्वेदात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या ताकाच्या नियमित सेवनाने या तक्रारींचं निराकरण करणं शक्य आहे हे समजून घ्यावं. भाजलेलं जिरं, मीठ आणि बारीक केलेले मिरे टाकून तयार केलेलं ताक प्यायल्याने पोटविकारांपासून आराम मिळतो. अर्थात पोटाचे विकार असताना पचनक्रियेत अडथळा निर्माण होईल, असा कुठलाच पदार्थ खाऊ नये. अपचन आणि अजीर्ण झाल्यावर ताक हेच उत्तम औषध आहे. तसंच नियमीत ताक घेतल्याने पोट साफ रहातं.



वेगळ्या वाटा

✼ टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च(टीआरएफआर) ही देशातल्या नामवंत संस्थांपैकी एक आहे. मुंबईसोबत पुणे, बंगळूरू आणि हैदराबादमध्ये या संस्थेच्या शाखा आहेत. इथून फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी, गणित, कॉम्प्युटर सायन्स या विषयांमध्ये पदवी मिळवता येईल. ✼ इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च ही सुद्धा देशातल्या सर्वोत्तम संस्थांपैकी एक आहे. इथे पाच वर्षांचा बीएस-एमएस अभ्यासक्रम चालवला जातो. यात गणित, पीसीबीशिवाय अर्थ अ‍ॅण्ड एन्व्हायर्नमेंटल सायन्ससारखे विषय आहेत. पीएचडी अभ्यासक्रमही इथे उपलब्ध आहेत.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### हिंगोलीत ढगफुटीसदृश पावसाने हाहाकार

**हिंगोली :** हिंगोली जिल्ह्यातील मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर असलेल्या सेनगाव तालुक्यातील बरडा, पिंपरी, वझर खुर्द या गावांमध्ये सोमवारी रात्री ढगफुटीसदृश पावसाने हाहाकार माजवला. यामुळे सरस्वती आणि पूर्णा नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला असून, नदीकाठच्या शेतीवर पाण्याचा लोंढा धडकल्याने सुमारे १०० हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाली आहेत. वझर खुर्द येथील सरपंच भास्कर राघोजी चोरमारे यांनी ही माहिती दिली.

जिल्ह्यात रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने कापडसिंगी, वझर खुर्द, बन, बरडा यासह अनेक गावांच्या शिवारात पूरस्थिती निर्माण झाली आहे. कापडसिंगी गावाजवळील महामार्गावर सुरू असलेल्या पुलाच्या कामामुळे तयार करण्यात आलेला पर्यायी रस्ता पुराच्या पाण्यात वाहून गेला.

ओढ्यातील पाणी थेट रस्त्यावरून वाहत असल्याने कापडसिंगी-लोणार महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. यामुळे परिसरातील १७ गावांचा संपर्क तुटला असून, स्थानिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, प्रशासनाकडून नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे आणि मदतीबाबत तातडीने पावले उचलण्याची मागणी होत आहे.

# जगदीप धनखड यांच्यानंतर पुढचा राजीनामा मुख्यमंत्र्यांचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी प्रकृतीच्या कारणास्तव पदाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर बिहारच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. नितीश कुमार यांना उपराष्ट्रपती करण्यासाठी धनखड यांचा राजीनामा घेण्यात आल्याचा दावा राष्ट्रीय जनता दलाचे आमदार मुकेश रोशन यांनी केला आहे. तर जदयू नेते मदन सहनी यांनी हा दावा खोटा असल्याचे म्हटले आहे. भाजप आमदार हरिभूषण ठाकूर बचौल यांनी मात्र, नितीश कुमार उपराष्ट्रपती झाल्यास ते बिहारसाठी चांगलेच होईल, असे म्हटले आहे. धनखड यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिला असून, त्यांच्या राजीनाम्यानंतर अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत.


जगदीप धनखड यांचा कार्यकाळ २०२७ पर्यंत होता. पण त्यांनी २ वर्षांपूर्वीच राजीनामा दिला. भाजप नितीश कुमारांच्या जेडीयूला संपवू पाहात असल्याचा दावा आरजेडीचे आमदार मुकेश रोशन यांनी केला. आता पुढचा राजीनामा मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा असेल. भाजपला बिहारमध्ये निवडणुकीपर्यंत त्यांचा मुख्यमंत्री करायचा आहे,' असे रोशन म्हणाले.

जगदीप धनखड यांच्या राजीनाम्याचा विषय बिहारमधील विरोधी पक्षांनी नितीश कुमार यांच्याशी जोडायला सुरुवात केली आहे. भाजप त्यांना बाजूला करण्याची रणनीती आखत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. राजकीय चर्चांदरम्यान भाजप आमदार हरिभूषण ठाकूर बचौल म्हणाले, हे आमच्या हातात नाही. पण ते झाले तर बिहारसाठी खूप चांगले होईल.

नितीश कुमार खरोखरच राजीनामा देणार आहेत का, अशा चर्चा सुरू झाल्या. या चर्चांदरम्यान जदयू नेते मदन सहनी यांनी आरजेडीचा दावा खोटा असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, "एनडीएमध्ये कोणावरही जबरदस्ती केली जात नाही. धनखड यांनी प्रकृतीच्या कारणांमुळे राजीनामा दिला आहे आणि त्याला नितीश कुमार यांच्याशी जोडणे चुकीचे आहे." जगदीप धनखड यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे राष्ट्रपतींना आपला राजीनामा पाठवला होता.

## चंद्रपूर जिल्हा बँकेवर फुललं कमळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर भाजपचा झेंडा फडकला आहे. या बँकेची १३ वर्षानंतर निवडणूक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय जिल्ह्यातील चिमुरचे आमदार बंटी भांगडिया यांच्या पुढाकाराने या बँकेवर पहिल्यांदाच भाजपने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून जिल्हाप्रमुख पदावरील राजीनामा देत थेट भाजपमध्ये प्रवेश केलेल्या संचालक रवींद्र शिंदे यांची अध्यक्षपदी तर संजय डोंगरे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. एकूण २१ संचालक असलेल्या या बँकेत भाजपच्या बाजूने १७ संचालक असल्याचे स्पष्ट झाले.

नऊ संचालक पदांसाठी १० जुलै रोजी निवडणूक पार पडली होती, तर १२ संचालक बिनविरोध निवडून आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवशी २२ जुलैला आपण बँक भाजपच्या वर्चस्वाखाली आणत त्यांना गिफ्ट देऊ अशी घोषणा फडणवीस यांचे निकटवर्तीय आमदार बंटी भांगडिया यांनी आधीच केली होती. त्यानुसार किंगमेकर भूमिका बजावत त्यांनी ही बँक खेचून आणली. सर्वांच्या सहकार्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण बँक आणि बँक योजना राबवू, अशी ग्वाही सत्तापक्षाने दिली आहे.

# दिल्ली विमानतळावर विमानाला अपघात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** दिल्ली विमानतळावर एक अपघात झाला आहे. एअर इंडियाच्या विमानाला उतरताच आग लागल्याचं बोललं जातआहे. विमानतळ प्राधिकरणाने जारी केलेल्या निवेदनानुसार, हाँगकाँगहून दिल्ली विमानतळावर उतरताच एअर इंडियाच्या विमानाच्या सहाय्यक पॉवर युनिटला आग लागली. दिलासादायक बाब म्हणजे या दुर्घटनेत सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुखरूप असल्याचे सांगण्यात येत आहे.

दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरल्यानंतर काही वेळातच एअर इंडियाच्या विमानाला आग लागली. एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, या घटनेनंतर प्रवासी आणि क्रू सुखरूप खाली उतरले. मात्र, आगीमुळे विमानाचे काही प्रमाणात नुकसान झाले.

हाँगकाँगहून दिल्लीला जाणाऱ्या एआय ३१५ क्रमांकाच्या विमानाच्या युनिटला लँडिंगनंतर लगेचच आग लागली. विमानाच्या सहाय्यक पॉवर युनिटमधून (एपीयू) प्रवासी उतरत असताना ही घटना घडली. मात्र, उतरल्यानंतर एपीयू आपोआप बंद झाला. पुढील तपासासाठी हे विमान विमानतळावर थांबवण्यात आले आहे. नियामकालाही या घटनेची माहिती देण्यात आली आहे. संघ आपलं काम करत आहेत. विशेष म्हणजे बोईंग ७८७ आणि ७३७ विमानांच्या ताफ्यातील इंधन नियंत्रण च्या लॉकिंग सिस्टिमची खबरदारीची तपासणी पूर्ण करण्यात आल्याचे एअरलाइन्सने मंगळवारी एका निवेदनाद्वारे सांगितले.

## हिमाचल प्रदेशावर नैसर्गिक आपत्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मान्सूनच्या कहराने हिमाचल प्रदेशातील लोकांवर पुन्हा एकदा नैसर्गिक संकट ओढवले आहे. दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसाने राज्यातील जनजीवन विस्कळीत केले आहे. भूस्खलनामुळे शेकडो रस्ते बंद झाले आहेत, नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत आहेत आणि अनेक धरणांमधून पाणी सोडण्यात आल्यामुळे धोका आणखी वाढला आहे.

शिमला, मंडी, कांगडा, चंबा, सिरमौर, सोलन, उना, बिलासपूर आणि हमीरपूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला आहे. कोल्डम, लार्जी धरण आणि नाथपा धरणातून पाणी सोडण्यात आल्यामुळे नद्या आणि ओढ्यांच्या पाण्याची पातळी वाढली आहे. मुसळधार पावसामुळे सोमवारी मंडी, शिमला, कुल्लू आणि सिरमौर या अनेक उपविभागांमध्ये शाळा आणि अंगणवाडी केंद्रे बंद ठेवण्यात आली. किन्नौरमधील किन्नर कैलास यात्रा देखील एका दिवसासाठी थांबवण्यात आली आहे.

राज्य आपत्कालीन ऑपरेशन्स सेंटरच्या मते, राज्यात ३ राष्ट्रीय महामार्गांसह ३९८ रस्ते बंद करण्यात आले आहेत. याशिवाय, ६८२ वीज ट्रान्सफॉर्मर आणि १५१ पिण्याच्या पाण्याच्या योजना बंद आहेत. मंडी जिल्ह्यात सर्वाधिक २४२ रस्ते बंद आहेत. मंडीमधील दोन आणि सिरमौरमधील एक राष्ट्रीय महामार्गही बंद आहे. मंडीमध्ये २९४, कुल्लूमध्ये १८६, हमीरपूरमध्ये ११७ ट्रान्सफॉर्मर बिघाडामुळे वीजपुरवठा प्रभावित झाला आहे.

पान १ वरून

### विश्वासाचा हात असू दे...

मित्र आणि सहकारी, जनतेचा आवाज बुलंद करणारे नेते, महाराष्ट्राच्या समृद्धीयात्रेत दमदार पावले टाकत सदैव पुढे असणारे मुख्यमंत्री, उत्तम प्रशासक, अर्थशास्त्र आणि कायद्याची जाण असलेले बुद्धिमान तसेच 'व्हिजनरी' नेतृत्व. अनेक गुणांचा समुच्चय असलेल्या आणि सकारात्मकतेचे मूर्तिमंत उदाहरण ठरलेल्या मित्रवर्य देवेंद्रजी यांना दीर्घ आणि आरोग्यपूर्ण आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!" वक्तशीर नेता म्हणजे आमचे अजितदादा

एका वेगळ्या पोस्टमध्ये एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांनाही वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. ते म्हणाले, महायुतीला भक्कमपणे साथसंगत करणा-या उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जन्मदिनाच्या अनेक शुभेच्छा! अर्थशास्त्रावर विलक्षण पकड असलेले उत्तम प्रशासक, डोळस विकासाचा निरंतर साथीदार, महाराष्ट्राच्या विकासाची आस असलेला संवेदनशील आणि वक्तशीर नेता म्हणजे आमचे अजितदादा. महाराष्ट्राच्या विकासापुढे काहीही नाही, याची ठाम खूणगाठ बांधून वाटचाल करणा-या या आमच्या मित्रास दीर्घ आणि आरोग्यपूर्ण आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!"

### गदिमांप्रमाणे ...

स्मारकांमध्ये जाणे सोयीचे होईल. महाराष्ट्रातील आणि विदेशातील सुद्धा लक्षावधी रसिकांकडून पुणे महानगरपालिकेच्या या सांस्कृतिक कामाची नोंद घेतली जाईल. त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या वतीने सुधीरजी फडके यांचे उचित स्मारक कोथरुडमध्ये उभे करण्याबाबत आवश्यक तो प्रस्ताव तयार करण्यात यावा, अशी सूचना ना. पाटील यांनी मनपा आयुक्तांना केली आहे.

### काँग्रेसला मोठा धक्का

म्हटले आहे की, करदात्याने २ फेब्रुवारी २०१९ रोजी भरलेले विवरणपत्र त्याला वादग्रस्त सवलतीसाठी पात्र ठरत नाही कारण दावा निर्धारित तारखेच्या आत केला गेला नाही. काँग्रेसने २ फेब्रुवारी २०१९ रोजी प्राप्तिकर विवरणपत्र दाखल केले होते, जे ३१ डिसेंबर २०१८ च्या अंतिम तारखेपेक्षा खूप उशीर झाले होते. या विवरणपत्रात काँग्रेसने शून्य उत्पन्न जाहीर केले आणि १९९.१५ कोटी रुपयांच्या उत्पन्नावर करसवलत ीचा दावा केला, परंतु सप्टेंबर २०१९ मध्ये मूल्यांकन अधिकाऱ्याला चौकशीदरम्यान असे आढळले की पक्षाने १४.४९ लाख रुपयांची रोख देणगी स्वीकारली आहे - त्यापैकी बर्याच देणगी कायद्यानुसार प्रति दाता २,००० रुपयांच्या मर्यादेपेक्षा जास्त आहेत.

नियमाप्रमाणे दोन हजार रुपयांपेक्षा जास्त देणगी धनादेश किंवा बँक हस्तांतरणासारख्या बँकिंग माध्यमातून द्यावी लागते. त्यानुसार संपूर्ण रकमेवर कर आकारण्यात आला. काँग्रेसने सूट मागितली तेव्हा आयकर विभागाने २०२१ मध्ये त्यांचा दावा फेटाळून लावला. मार्च २०२३ मध्ये प्राप्तिकर आयुक्तांनी (अपील) हा निर्णय कायम ठेवला. या निर्णयाविरोधात काँग्रेसने गेल्या वर्षी न्यायाधिकरणात अपील केले होते.

### राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेला पाऊस आता पुन्हा परतला आहे. शनिवारपासून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. तर मुंबईतही रविवारपासून पावसाने जोर धरला असून अधूनमधून पावसाची रिपरिप सुरूच आहे. राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळणार असल्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. राज्यातील काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट तर काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# रुग्णालयातील तरुणीला नशेखोर तरुणाकडून मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**ठाणे :** कल्याणमधील नांदिवली परिसरात धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, एका खासगी रुग्णालयामधील रिसेप्शनिस्ट तरुणीला बेदम मारहाण करण्यात आली आहे. गोपाल झा असं मारहाण करणाऱ्या परप्रांतीय तरुणाचे नाव आहे. डॉक्टरकडे एमआर बसले आहेत, तुम्ही जरा थांबा इतकंच ही तरुणी बोलली होती. त्यावरुन तरुणीला मारहाण करण्यात आल्याचं पीडितेनं म्हटलं आहे. याप्रकरणी मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद आहे. त्याआधारे, मानपाडा पोलीस आरोपीच्या शोधात आहेत. मात्र, या धक्कादायक प्रकाराने पीडित मुलीच्या मनात भीती बसली आहे.

कल्याण पूर्वमधील पिसवाली गाव येथील रहिवासी असलेल्या सोनाली प्रदीप कळासारे हिच्यासोबत हा धक्कादायक प्रकार घडल्यानंतर सोशल मीडियातून व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामुळे, आरोपीविरुद्ध तीव्र संताप व्यक्त होत आहे. सोनाली ही कल्याण पूर्वमधील श्री बाल चिकस्तालय (लिनिक) नांदिवली गाव येथे रिसेप्शनिस्ट म्हणून कार्यरत आहे. आपल्या कर्तव्यानुसार ती काम होती.

डॉक्टरांच्या आदेशानुसार आतमध्ये म्हणजेच डॉक्टरांच्या कॅबिनमध्ये एमआर बसले असताना कोणालाही आतमध्ये पाठवू नये, अशा सूचना आहेत. डॉक्टरांच्या याच नियमाचं पालन करत असताना एक नशेखोर तरुण कोणालाही न जुमानता सरळ डॉक्टरांच्या कॅबिनमध्ये घुसला. त्यावेळी त्याला थांबा,आत जाऊ नका असं म्हटल्यामुळे त्याने मला सरळ पळत येऊन तोंडावर लाथ मारून खाली पाडलं. तसेच, माझे कपडे फाडून मला लाथा बुक्क्यानी मारहाण केल्याचं फिर्यादी तरुणीने म्हटलं आहे. घडलेला प्रकार हा काल म्हणजेच २१ जुलै सायंकाळी ६.४५ वाजत घडला आहे. त्यानंतर, फिर्यादी तरुणीने काल मानपाडा पोलीस स्टेशन येथे जाऊन तक्रार नोंदवली आहे.

दरम्यान, पोलिसांत तक्रार नोंदवल्यानंतर देखील तो नशेखोर तरुण अजूनही माझ्या राहत्या घराच्या अवती भोवती दिसून येत आहे, असे सोनाली कळासारे हिने म्हटलं आहे. दरम्यान, आरोपीला पोलिसांनी लवकरात लवकर अटक करावी आणि पीडितेला न्याय द्यावा, अशी मागणी सहकारी व पीडितेच्या नातेवाईकांनी केली आहे.

### उद्धव ठाकरेंची मुख्यमंत्र्यांवर...

पहिल्या कार्यकाळात म्हणजे २०१४ ते २०१९ दरम्यान आम्ही त्यांच्या सोबत होतो. त्यामुळे त्यांची विषय समजून घेण्याची जिद्द, प्रश्न सोडवण्याची तळमळ आणि राज्याला न्याय देण्याचा प्रयत्न जवळून पाहता आला. नंतरच्या काळात त्यांची विरोधी पक्षनेता म्हणून काम करण्याची धडपडही जवळून पाहता आली. देवेंद्रजी एक हुशार आणि प्रामाणिक राजकारणी आहेत.

फडणवीस यांनी वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी नागपूर महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून प्रवेश केला आणि वयाच्या २७ व्या वर्षी ते नागपूरचे सर्वात तरुण महापौर बनले. ही उपलब्धी त्यांच्याप्रारंभिक काळातील धडाडी आणि नेतृत्वक्षमतेची साक्ष देते. त्यांचा अभ्यासू स्वभाव आणि कायदेशीर, आर्थिक तसेच प्रशासकीय विषयांवरील सखोल ज्ञान त्यांना भाजपातील इतर सदस्यांपासून वेगळे ठरवते. त्यांनी कायद्याची पदवी, व्यवसाय व्यवस्थापनात पदव्युत्तर पदवी आणि बर्लिनमधून प्रकल्प व्यवस्थापनात डिप्लोमा मिळवला आहे.

त्यांचे पुस्तक 'अर्थसंकल्प सोप्या भाषेत' हे त्यांच्या जटिल विषयांना साध्या भाषेत मांडण्याच्या क्षमतेचे द्योतक आहे. फडणवीस यांनी नेहमीच सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून काम केले. नझूल जमिनीच्या नूतनीकरणासारख्या प्रश्नांवर त्यांनी तीव्र लढा दिला आणि कामगार, झोपडपट्टीवासीय यांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. २०१४ मध्ये वयाच्या ४४ व्या वर्षी ते महाराष्ट्राचे दुसरे सर्वात तरुण मुख्यमंत्री बनले. फडणवीस यांनी राजकीय कारकीर्दीला सांस्कृतिक आणि सामाजिक जोड दिली, असेही ते म्हणाले.

### रोहित पवारांकडून कोकाटेंचा...

करत व्हिडीओ शेअर केला होता. त्यानंतर कोकाटेंवर चहूबाजूंनी टीका करण्यात येत आहे. आरोपांचे खंडन जरी कोकाटेंनी केले असले तरी राजीनमा देण्यासारख एवढं काय घडलं होतं? असे त्यांनी दिलेल्या उत्तरावर पुन्हा एकदा विरोधकांनी टीकेची तोफ डागली आहे.

रोहित पवार यांनी पुन्हा एकदा कोकाटेंचा रमी खेळतानाचा व्हिडीओ शेअर करत अनेक सवाल त्यांना केले आहेत. सभागृहाचं कामकाज संपलं होतं हे कृषिमंत्री महोदयांचं विधान धडधडीत खोटं असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. ओसाड गावच्या पाटलांना या चर्चेत रस नसावा... आणि मला सांगा पत्त्याची कोणती जाहिरात स्किप करण्यासाठी ४२ सेकंद लागतात हो? असा सवाल त्यांनी केला आहे.

### वाल्मिक कराडचा...

वेळेचा अपव्यय करण्याची एक पद्धत आहे." "यावेळी आरोपी वाल्मिक कराडनं जामिनासाठी अर्ज केला असून त्यालाही विरोध करण्यात आला आहे. तसंच वाल्मिक कराड व त्याच्या सहकाऱ्यांविरोधात १२ ते १३ आरोप निश्चित करावेत, असा ड्राफ्ट न्यायालयात सादर केला असून, त्यावरील सुनावणी पुढे होणार आहे, " असं विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी सांगितलं. "देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींनी सादर केलेले दोषमुक्तीचे अर्ज हे विलंबाने दाखल करण्यात आले आहेत," अशी महत्त्वपूर्ण माहितीदेखील विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी दिली. तसंच, त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, "आरोपपत्र दाखल झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत दोषमुक्तीचा अर्ज सादर करणं कायद्यानुसार अपेक्षित असते. मात्र, संबंधित आरोपींनी हे अर्ज उशिरानं दाखल केले. त्यामुळं, दोषमुक्ती अर्ज न्यायालयानं फेटाळावेत. आता या अर्जांवर ४ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे."


## सूचना

**नवीन १००% पाण्यात विरघळणाऱ्या खतांचे उत्पादन, आयात, साठवणूक आणि विक्री संदर्भात माहिती**
**कंपनीचे नाव : प्लुमेरिया एग्रो**

ऑफिस पत्ता: सर्व्हे नं १३३/१, गुरुद्वारा चौक,चिंचवड,ता. हवेली, जि. पुणे, महाराष्ट्र, ४११०३३
गोडाऊन पत्ता : गट नंबर ४४२, नागापूर, ता. आंबेगाव, जि. पुणे, महाराष्ट्र ४१०५०४.

२४.१०.२०१५ च्या आदेश २९०० (अ) नुसार खालील १००% पाण्यात विरघळणारे मिश्रण खते तुमच्यासाठी घेऊन येत आहे. [भारत सरकारच्या अधिसूचनेनुसार, एफ. क्र.२-१/२०१४ फर्ट. कायदा, आदेश क्रमांक एस ओ १९०९ (ई) दिनांक २८-०७-२०१४] हा भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी जारी केला आहे.

| SR NO | Name of Fertilizers [Grade] | Moisture % by weight maximum | Total Nitrogen % by weight, minimum | Water Soluble Phosphate (as P2O5) % by weight minimum | Water Soluble Potash (as K2O)% by weight, minimum | Total chloride as (as Cl) % by weight, ,maximum | Matter insoluble in water ,% by weight, maximum |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NPK 19:19:19 | 0.5 | 19 | 19 | 19 | 1.5 | 0.5 |
| 2 | NPK 13:40:13 | 0.5 | 13 | 40 | 13 | 1.5 | 0.5 |
| 3 | NPK 20:20:20 | 0.5 | 20 | 20 | 20 | 1.5 | 0.5 |
| 4 | NPK 17:44:00 | 0.5 | 17 | 44 | 0 | 1.5 | 0.5 |
| 5 | NPK 00:34:10 | 0.5 | 0 | 34 | 10 | 1.5 | 0.5 |
| 6 | NPK 00:48:47 | 0.5 | 0 | 48 | 47 | 1.5 | 0.5 |
| 7 | NPK 15:08:35 + TE | 0.5 | 15 | 8 | 35 | 1.5 | 0.5 |
| 8 | NPK 00:37:37 | 0.5 | 0 | 37 | 37 | 1.5 | 0.5 |
| 9 | NPK 10:40:10 | 0.5 | 10 | 40 | 10 | 1.5 | 0.5 |
| 10 | NPK 14:48:00 | 0.5 | 14 | 48 | 0 | 1.5 | 0.5 |
| 11 | NPK 16:08:24 | 0.5 | 16 | 8 | 24 | 1.5 | 0.5 |
| 12 | NPK 00:38:39 | 0.5 | 0 | 38 | 39 | 1.5 | 0.5 |
| 13 | NPK 00:42:47 | 0.5 | 0 | 42 | 47 | 1.5 | 0.5 |
| 14 | NPK 05:55:17 + TE | 0.5 | 5 | 55 | 17 | 1.5 | 0.5 |
| 15 | NPK 07:50:07 | 0.5 | 7 | 50 | 7 | 1.5 | 0.5 |
| 16 | NPK 00:09:46 | 0.5 | 0 | 9 | 46 | 1.5 | 0.5 |
| 17 | NPK 10:54:10 | 0.5 | 10 | 54 | 10 | 1.5 | 0.5 |
| 18 | NPK 11:42:11 | 0.5 | 11 | 42 | 11 | 1.5 | 0.5 |
| 19 | NPK 28:28:00 | 0.5 | 28 | 28 | 0 | 1.5 | 0.5 |


**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
**(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५**
दुरध्वनी : ०२० - २६१२५७७९ email : ddrpunegramin@gmail.com

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.२२८/२०२५/१७५०

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
नेचर्स ब्लेसिंग बिल्डींग बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः गट नं. १५२/१/खुली जागा, व गट नं. १५२/४ / शिल्लक क्षेत्र गोऱ्हे बु., ता. हवेली, जि. पुणे तर्फे अध्यक्षः शशिकांत भगवान कुऱ्हाडे,
सचिव : श्री. सुधाकर माणिक हजारे, खजिनदारः श्री. विनोद रमेशराव वानखेडे.
**विरुध्द**
**गैरअर्जदार/जमिनमालक**
मे. नगरकर डेव्हलपर्स तर्फे भागीदार,
पत्ता.४०४ आयडियल स्केअर पौड रोड कोथरूड पुणे- ४११०३८.
ए) श्री. शर्मिन्द्र विलास नगरकर, १५/६, कर्वे रोड, एरंडवणे पुणे- ४११००४.
बी) श्री.रूपेश भगवान मनोरे, अ-२विंग११०५, सारथी शिल्प एकलव्य कॉलेज जवळ कोथरूड, पुणे ३८. सी) श्री. तन्मय दिलीप आहेरे,रा.४०३,आरती टॉवर्स, सप्तर्शी पार्क एलबीएस मार्ग, स्वप्ननगरी मुलूंड वेस्ट मुंबई-८०,
श्री.शर्मिन्द्र विलास नगरकर रा.१५/६, कर्वे रोड, एरंडवणे, पुणे- ४११००४.
श्री.रूपेश भगवान मनोर, रा. अ-२ विंग ११०५, सारथीशिल्प, एकलव्य कॉलेज जवळ, कोथरूड, पुणे ३८ श्री.तन्मय दिलीप आहेर, रा.४०३, आरती टॉवर्स, सप्तर्शी पार्क, एलबीएस मार्ग स्वप्ननगरी, मुलूंड वेस्ट मुंबई- ८०.
इतर इमारत / जाब देणार नं. ३
३) ओ, सी, व डी इमारत, पत्ताः गट नं. १५२ गो-हे बु, ता. हवेली, जि. पुणे

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या नेचर्स ब्लेसिंग बिल्डींग बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः गट नं. १५२/१/खुली जागा, व गट नं. १५२/४/शिल्लक क्षेत्र गोऱ्हे बु., ता. हवेली, जि. पुणे. या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामी अर्ज क्र. २२८/२०२५ दाखल केले आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक १०/०७/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. भार्गवी हिवाळे तर्फे जयश्री गोरे हजर.

गैरअर्जदार/ जमिन मालक क्र. १ (अे,बी,सी), २(अे, बी, सी) व ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ (अे, बी, सी), २(अे, बी, सी) व ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ०५/०८/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/ जमिन मालक क्र. १ (अे, बी, सी), २(अे, बी, सी) व ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक १७/०७/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
**(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५**
दुरध्वनी : ०२० - २६१२५७७९ email : ddrpunegramin@gmail.com

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.५६८/२०२४/१७५६

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
अॅक्सीसा विंग बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं. ८८/१बी/२/३, स.नं.८८/६ (पैकी) व स.नं.८८/७/२, साळुंके वस्ती, किवळे पब्लिक शाळे जवळ, किवळे, ता. हवेली, जि. पुणे- ४१२१०१.
तर्फे अध्यक्षः श्री. संतोष रघुनाथ अलगुले, सचिव : श्री. संदिप साहेबराव ओव्हाळ.
**विरुध्द**
**गैरअर्जदार/जमिनमालक**
विकसक / प्रवर्तक/ जाब देणार नं. १
१. मे. माहेश्वरी डेव्हलपर्स, तर्फे भागीदार,
अ. श्री. सचिन वसंत जरे, रा. मनिषा हौसिंग सोसायटी, चिखली, ता. हवेली जि. पुणे - ४१२११४.
ब. श्री. राजकुमार जयरामशर्मा, रा. सेक्टर नं. २८, प्राधिकरण, निगडी, ता. हवेली जि. पुणे- ४११०२७. जागा मालक / जाब देणार नं. २
२. ए. बेबीताई किसन साळुंके, बी. श्री. दामु नथु साळुंके, सी. श्री. महेंद्र किसन साळुंके डी. श्री. रामचंद्र नथु साळुंके, ई. श्री. बळीराम सिताराम तरस
जा. देणार नं. 2 ए ते ई रा.स.नं. ८८/१बी / २ / ३, स.नं. ८८/६ (पैकी) व स.नं.८८/७/२, साळुंके वस्ती, किवळे पब्लिक शाळे जवळ, किवळे, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१.
एफ. मे. माहेश्वरी डेव्हलपर्स, तर्फे भागीदार,
१. श्री. सचिन वसंत जरे, रा. मनिषा हौसिंग सोसायटी, चिखली, ता. हवेली जि. पुणे - ४१२११४.
२. श्री. राजकुमार जयरामशर्मा, रा. सेक्टर नं. २८, प्राधिकरण, निगडी, ता. हवेली जि. पुणे - ४११०२७. इतर इमारत/ इतर संस्था/ जाब देणार नं. ३
३. ए. अॅक्सीसा विंग ए सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
बी. इमारत सी, सी. इमारत डी,
पत्ताःस.नं.८८/१बी/२/३,स.नं.८८/६(पैकी) वस.नं.८८/७/२, साळुंके वस्ती, किवळे पब्लिक शाळे जवळ, किवळे, ता. हवेली, जि. पुणे- ४१२१०१.

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या अॅक्सीसा विंग बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित स.नं. ८८/१बी /२/३, स.नं.८८/६ (पैकी) व स.नं.८८/७/२, साळुंके वस्ती, किवळे पब्लिक शाळे जवळ, किवळे, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१. या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.५६८/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक ०३/०७/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. भार्गवी हिवाळे हजर.

गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ३१/०७/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक १७/०७/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

## ब्रिटीश लढाऊ विमान माघारी परतले



**तिरुवनंतपुरम :** महिनाभरापूर्वी आंतरराष्ट्रीय विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग केलेले ब्रिटनचे लढाऊ विमान एफ-३५ बी देखभाल पूर्ण करून मंगळवारी परत गेले. सकाळी १० वाजून ५० मिनिटांनी उड्डाण केलेले हे विमान ऑस्ट्रेलियातील डार्विनकडे रवाना झाले. सोमवारी हे विमान हँगरमधून बाहेर आणून त्या विमानतळाच्या खाडीत ठेवण्यात आले होते.

## पावसामुळे दिल्लीत वाहतूक कोंडी



**नवी दिल्ली :** राष्ट्रीय राजधानी दिल्लीत मंगळवारी सकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक रस्ते पाण्याखाली गेले आणि अनेक रस्त्यांवर खड्डे पडले. आयटीओ ते जुना रोहतक रोड, दिल्ली-जयपूर महामार्ग (एनएच-८), महरौली-बदरपूर रोड, महरौली-गुरुग्राम रोड, पीरागढी ते आयएसबीटी, मधुबन चौक, दिल्ली-गाझियाबाद आणि राष्ट्रीय महामार्ग-९ पर्यंत अनेक तास प्रचंड वाहतूक कोंडी झाली. शहराला अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्यासाठी संघर्ष करावा लागत होता.

## उत्तर प्रदेशात फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट



**उन्नाव (उत्तर प्रदेश) :** येथील पारा गावातील फटाके निर्मिती कारखान्यात झालेल्या स्फोटात एका ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. शिवचरण असे मृताचे नाव आहे, अशी माहिती स्टेशन हाऊस ऑफिसर कुंवर बहादूर सिंह यांनी दिली. स्फोटाचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

## सायबराबाद पोलिसांचे वर्क फ्रॉम होमचे आवाहन

**हैदराबाद :** मुसळधार पावसाचा अंदाज लक्षात घेता सायबराबाद पोलिसांनी आयटी आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील इतर कंपन्यांना कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची परवानगी देण्याचा सल्ला दिला आहे. सायबराबाद परिसरात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सुरक्षितता, उत्पादकता, वाहतूक कोंडी आणि अखंडित सेवा सुनिश्चित करण्यासाठी कंपन्या मंगळवारी वर्क फ्रॉम होम पद्धतीचा अवलंब करण्याचा विचार करू शकतात. सायबराबाद पोलिसांच्या अधिकृत 'एक्स' हँडलवर पोस्ट करण्यात आलेल्या हवामान अपडेटनुसार, शहराच्या अनेक भागात वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## नाबार्डकडून आंध्रला ४३ हजार कोटींचे वाटप

**नवी दिल्ली :** नाबार्डचे मुख्य महाव्यवस्थापक एम. आर. गोपाल यांनी सोमवारी सांगितले की, नाबार्डने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये आंध्र प्रदेशला सुमारे ४३,००० कोटी रुपयांचे कर्ज आणि सुमारे ३२ कोटी रुपयांचे अनुदान वितरित केले. विजयवाडा येथे राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या ४४ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना गोपाल म्हणाले की, बँकेने राज्यभरात ग्रामीण पायाभूत सुविधा, संस्थात्मक विकास आणि पतविस्तारासाठी महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये नाबार्डने ४२,८४२ कोटी रुपयांचे कर्ज आणि ३१.८३ कोटी रुपयांचे अनुदान वितरित केले आणि तीन जिल्ह्यांमध्ये जिल्हा विकास व्यवस्थापक कार्यालयांचे उद्‍घाटन केले.

## दक्षिण बंगालच्या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता

**कोलकाता :** बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याने २४ ते २८ जुलै दरम्यान दक्षिण बंगालच्या काही भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. उत्तर बंगालच्या उपसागरात बुधवारपर्यंत चक्रीवादळ निर्माण होण्याची शक्यता असून त्याच्या प्रभावामुळे पुढील दोन दिवसांत याच भागात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कमी दाबाचा पट्टा आणि बंगालच्या उपसागरातून आलेल्या तीव्र आर्द्रतेमुळे दक्षिण बंगालमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

# कुलपतींच्या घरात २०.२८ कोटींची मालमत्ता

### शिलाँगसह नवी दिल्ली येथे कुटुंबियांच्या नावे स्थावर तसेच बँकेत ठेवी; ईडीकडून कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पैशांसाठी बनावट प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शिलाँगमधील एका विद्यापीठाचे कुलपती आणि त्यांच्या कुटुंबियांची सुमारे २०.२८ कोटी रुपयांची मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे. या मालमत्तांमध्ये नवी दिल्लीतील १९.२८ कोटी रुपयांच्या चार स्थावर मालमत्ता आणि बँक बॅलन्सच्या स्वरूपात एक कोटी रुपयांच्या जंगम मालमत्तेचा समावेश आहे, जे मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए), २००२ च्या तरतुदींनुसार जप्त करण्यात आले आहेत, असे ईडीच्या एका अधिकाऱ्याने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

यापूर्वी शिलाँगमधील ईडीच्या उपप्रादेशिक कार्यालयाने पीएमएलए, २००२ च्या तरतुदींनुसार सीएमजे विद्यापीठाचे कुलपती चंद्र मोहन झा आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची २०.२८ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्याचा तात्पुरता आदेश ३ जुलै रोजी जारी केला होता. ईडीने निवेदनात म्हटले आहे की, ही स्थावर मालमत्ता २०१३ ते २०२२ दरम्यान खरेदी करण्यात आली होती आणि बँक बॅलन्स लपविण्याच्या प्रयत्नात १६ डिसेंबर २०२४ रोजी त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला फसवणुकीने हस्तांतरित करण्यात आली होती.

मेघालयातील पूर्व खासी हिल्स शिलाँग जिल्ह्यातील गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी) पोलिस ठाण्यात सीएमजे विद्यापीठाविरोधात दाखल एफआयआरच्या आधारे ईडीने तपास सुरू केला होता. सीएमजे विद्यापीठाचे पाहुणे असलेले राज्याचे तत्कालीन राज्यपाल आर. एस. मुशहरी यांच्या सूचनेनुसार भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी एमएस राव यांनी ही तक्रार दाखल केली होती. सीआयडीने या प्रकरणाच्या तपासात पदवी विक्रीसह विद्यापीठाशी संबंधित अनेक अनियमितता उघडकीस आणल्या आहेत, असे ईडीने म्हटले आहे. परंतु हे प्रकरण केवळ विद्यापीठाच्या भागधारकांनी अंदाजे ८३ कोटी रुपयांचे गुन्हेगारी उत्पन्न मिळवले होते असे नाही.

यापूर्वी ३१ मार्च २०१७, ३० नोव्हेंबर २०२१ आणि ११ जुलै २०२४ रोजी तात्पुरते जप्तीचे आदेश देण्यात आले होते आणि कुलपती झा आणि त्यांच्या कुटुंबियांच्या ताब्यात अनुक्रमे २७.६६ कोटी, १३.५४ कोटी आणि ७.५६ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली होती. डिसेंबर २०२४ मध्ये चान्सलर झा यांच्या विविध ठिकाणी बेकायदा उत्पन्नाचे स्त्रोत शोधण्यासाठी तीन दिवस छापे टाकल्यानंतर १ कोटी १५ लाख रुपयांचा बँक बॅलन्स जप्त करण्यात आला होता.

या वर्षी फेब्रुवारी महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने सीएमजे विद्यापीठाचा गैरकारभार, गैरकारभार, बेशिस्तपणा आणि फसवणुकीच्या हेतूने विद्यापीठ बरखास्त करण्याचे आदेश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मेघालय सरकारने शिक्षण सहसचिव डी. लिंगदोह यांची सीएमजे विद्यापीठाचे प्रशासक म्हणून नियुक्ती केली. सीएमजे विद्यापीठाने २०१० ते २०१३ या कालावधीत सुमारे २०,५७० बनावट पदवी दिल्या होत्या.

# उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा मंजूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

### गृह मंत्रालयाकडून अधिसूचना जारी



**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. धनखड यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र पाठवून आपल्या पदाचा राजीनामा देण्याबाबत कळवले होते. त्यांनी राजीनाम्यामागे प्रकृती अस्वास्थ्याचे कारण दिले आहे. मंगळवारी राज्यसभेला कळवण्यात आले की उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा राष्ट्रपती मुर्मू यांनी स्वीकारला आहे. तसेच गृह मंत्रालयाने एक अधिसूचना जारी केली आहे, ज्यामध्ये राजीनामा तात्काळ लागू होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वर पोस्ट करून धनखड यांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. 'जगदीप धनखड यांना भारताचे उपराष्ट्रपती म्हणून तसेच इतर अनेक भूमिकांमधून देशाची सेवा करण्याची संधी मिळाली. मी त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतो.'

उपराष्ट्रपतींनी राजीनामा दिल्याने राज्यसभेचे सभापतीपदही आपोआप रिक्त झाले आहे. उपराष्ट्रपती हे वरिष्ठ सभागृहाचे पदसिद्ध सभापती असतात. त्यामुळे आता राजीनामा मंजूर झाल्याने, पावसाळी अधिवेशनात राज्यसभेचे संपूर्ण कामकाज उपसभापती हरिवंश पाहतील. याशिवाय, राष्ट्रपतींनी अधिकृत केलेल्या सदस्यालाही ही जबाबदारी दिली जाऊ शकते.

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक सहा महिन्यांच्या आत घेणे बंधनकारक आहे. संविधानानुसार, मृत्यू, राजीनामा, पदावरून दूर करणे किंवा इतर कोणत्याही कारणास्तव उपराष्ट्रपती पद रिक्त झाल्यास, ते भरण्यासाठी निवडणूक लवकरात लवकर घेण्याची तरतूद आहे.

यापूर्वी सोमवारी धनखड दिवसभर राज्यसभेत सक्रिय होते. सकाळी त्यांनी विरोधकांना संसदेला संवाद आणि चर्चेचे सकारात्मक व्यासपीठ बनवण्याचा सल्ला दिला आणि दुपारनंतर न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरील महाभियोग प्रस्तावाची नोटीस स्वीकारून संपूर्ण प्रक्रिया स्पष्ट केली. तसेच, न्यायमूर्ती शेखर यादव यांच्याविरोधात सादर झालेल्या महाभियोग नोटिशीमधील एका खासदाराच्या दुहेरी सहीच्या प्रकरणाची चौकशी करण्याचेही त्यांनी जाहीर केले होते.

**राजीनामा देणारे तिसरे उपराष्ट्रपती**

● कार्यकाळ सुरू असताना राजीनामा देणारे धनखड हे तिसरे उपराष्ट्रपती आहेत. यापूर्वी व्ही. व्ही. गिरी यांनी २० जुलै १९६९ रोजी आणि आर. वेंकटरामन यांनी २४ जुलै १९८७ रोजी पदाचा राजीनामा दिला होता. या दोघांनीही राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवण्यासाठी हे पाऊल उचलले होते. तर, माजी उपराष्ट्रपती कृष्णकांत यांचे कार्यकाळातच निधन झाले होते.

# सर्व आरोपींच्या सुटकेच्या निर्णयाला आव्हान

### महाराष्ट्र सरकारची सर्वोच्च न्यायालयात धाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** ७/११ मुंबई लोकल बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्दोष सुटका करण्याच्या निर्णयाविरुद्ध महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यावर सर्वोच्च न्यायालय २४ जुलै रोजी सुनावणी करणार आहे.

मुंबईतील उपनगरीय रेल्वेमध्ये २००६ मध्ये घडवलेल्या साखळी बॉम्बस्फोट खटल्यातील सर्व १२ आरोपींची सबळ पुराव्यांअभावी सोमवारी उच्च न्यायालयाने निर्दोष सुटका केली. या स्फोटात १८९ जणांचा मृत्यू झाला होता. तर ८०० हून अधिक लोक जखमी झाले होते. दरम्यान, खंडपीठाच्या या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली जाईल, असे राज्य सरकारकडून सांगण्यात आले होते. त्यानुसार खंडपीठाच्या या निर्णयाविरुद्ध स्पेशल लिव्ह पिटीशन (SLP) सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी दाखल केले. त्यांनी सरन्यायाधीश भूषण गवई, न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि एन व्ही अंजारिया यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण सुनावणीसाठी तातडीने सूचीबद्ध करण्याची मागणी केली. "ही एक गंभीर बाब आहे. त्यावर तातडीने सुनावणीची आवश्यकता आहे," असे मेहता म्हणाले. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध राज्य सरकारने आधीच अपील दाखल केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

माध्यमातील वृत्तानुसार, निर्दोष सुटका झालेल्या १२ आरोपींपैकी ८ जणांना आधीच तुरुंगातून सोडण्यात आले आहे, असे खंडपीठाने निर्दशनास आणून दिले. यावर उत्तर देताना मेहता म्हणाले, "हो, त्यांची सुटका करण्यात आली आहे. तरीही, या प्रकरणाची तातडीने सुनावणी होणे आवश्यक आहे." अशी विनंती त्यांनी केली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर आश्चर्य व्यक्त केले होते. मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय खूपच धक्कादायक आहे. आम्ही या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देऊ, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले होते.

# मुरलीधरन यांच्या टीकेला शशी थरूर यांचे उत्तर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि खासदार शशी थरूर यांच्यात वाद सुरू आहे. काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे माजी खासदार के. मुरलीधरन यांनी थरूर यांच्यावर जोरदार टीका केली होती. थरूर यांनी मंगळवारी सडेतोड उत्तर दिले. असे वक्तव्य करणाऱ्यांनी आधी आपल्या पक्षात काय स्थिती आहे हे पाहावे, असे ते म्हणाले.

केरळ काँग्रेसचे ज्येष्ठ नेते के. मुरलीधरन यांनी रविवारी एका वादग्रस्त विधानात म्हटले होते की, थरूर राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर आपली भूमिका बदलल्याशिवाय त्यांना तिरुवनंतपुरममधील पक्षाच्या कोणत्याही कार्यक्रमात आमंत्रित केले जाणार नाही. थरूर यांना आता आमच्यापैकीच मानले जात नाही, असेही मुरलीधरन म्हणाले होते.

या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना थरूर म्हणाले की, "सर्वप्रथम मी सांगू इच्छितो की, जे असे म्हणत आहेत त्यांच्याकडे असे म्हणण्याला काही तरी आधार असावा. ते कोण आहेत? पक्षात त्यांची भूमिका काय आहे? मला जाणून घ्यायचे आहे। विशेषत: केरळमधील काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणासंदर्भात पक्षांतर्गत मतभेद आता उघडपणे समोर येत असल्याचे स्पष्ट संकेत थरूर यांचे हे विधान आहे.

शशी थरूर हे केरळ काँग्रेसमध्ये बऱ्याच काळापासून दोन गटात विभागले गेले आहेत, एक त्यांना पाठिंबा देतो तर दुसरा त्यांच्या "स्पष्टवक्ते आणि स्वतंत्र मतामुळे" अस्वस्थ वाटतो. अलीकडच्या काळात थरूर यांनी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर पक्षातून वेगळे मत मांडल्याने पक्षनेत्यांमध्ये त्यांच्याविषयी चीड वाढली आहे.



चीन

**झुहाई :** चीनमधील ग्वांगडोंग प्रांतात चक्रीवादळ धडकले, तेव्हा झुहाई शहराजवळ काळे ढग येत असल्याचे दृश्य दिसून आले.

# पावसाच्या विश्रांतीने दुबार पेरणीचे संकट; शेतकऱ्यांची चिंता वाढली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**छत्रपती संभाजीनगर :** पावसानं दडी दिल्यानं शेतकरी हवालदिल झालाय. मात्र सोमवारी रात्रीपासून काही भागात रिमझिम पावसानं हजेरी लावल्यानं थोडाफार दिलासा मिळालाय. असं असलं तरी दुबार पेरणीचं संकट अद्याप टळलेलं नाही. मराठवाड्यात खरीप हंगामात जवळपास ४९ लाख हेक्टर पेरणी होत असते. मात्र, ४७ हजार हेक्टर पेरणी झाल्याची माहिती कृषी विभागानं दिलीय. त्यातील काही प्रमाणातील पिकं कमी पावसामुळं अडचणीत सापडली असल्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. निसर्गाची अवकृपा कधी दूर होणार अशी चिंता आता त्यांना पडली आहे.

"पावसाळा सुरू होऊन दोन महिन्याचा कालावधी पूर्ण होत आहे. मात्र अद्याप मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये म्हणावं तसं पर्जन्यमान झालं नाही. विशेषतः छत्रपती संभाजीनगर, बीड आणि जालना जिल्ह्यातील ८ ते १० तालुक्यात परिस्थिती खराब असल्यानं पिके अडचणीत सापडली आहेत. मोठा पाऊस झाला नाही तर दुबार पेरणीचं संकट येण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही," असं मत विभागीय कृषी संचालक जे. पी. शिंदे यांनी व्यक्त केलं. दरम्यान, पुढील चार दिवस अधिक महत्वाचे मानले जात आहेत. या काळात चांगले पर्जन्यमान होण्याची आवश्यकता पिकांच्या दृष्टीनं गरजेची आहे. मराठवाड्यात खरीप हंगामात ४९ लाख ७२ हजार ७२८ हेक्टर शेतीवर पेरणी होत असते. मात्र यंदा जवळपास ४७ लाख हेक्टरवर पेरणी झालीय. ९५ टक्के पेरणीचे क्षेत्र असूनही पावसामुळं ते अडचणीत सापडण्याची शक्यता नाकारता येणार नाही, अशी माहिती कृषी अभ्यासकांनी दिलीय.

"पावसाची प्रतीक्षा बळीराजाला पडलेली असताना सोमवारी सायंकाळी काही ठिकाणी पावसानं हजेरी लावली असल्यानं थोड्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. मंगळवारी सकाळी रिमझिम असलेल्या पाऊस काही ठिकाणी सुरू राहिल्यानं पिकांना जीवनदान मिळालं, अशी अपेक्षा व्यक्त केली जातेय. मात्र पुढील चार दिवसांमध्ये मोठ्या पावसाची गरज आहे. अन्यथा दुबार पेरणीचा नामुष्की येऊ शकते अशी भीती शेतकऱ्यांना पडली आहे.

कमी पावसामुळं आलेल्या पिकांवर रोगराई पडत आहे. सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरातील शेतकरी हुमणी अळीमुळं संकटात सापडला आहे. हुमणी अळीचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत असून दीड ते दोन महिन्याची झालेली पन्नास एकरवरील सोयाबीन, मका, कपाशीसह इतर पिकं बाधित झाली आहेत. शेतकऱ्यांना त्यावर रोटाव्हेटर फिरविण्याची वेळ आली असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचं संकट ओढवलं आहे. झालेल्या नुकसानीची अजूनही महसूल विभागानं पाहणी केलेली नसून कृषिविभाग पण डोळे झाकून असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केलाय.

## लक्ष्मीबाई गिरमे यांचे निधन



**नीरा :** सानीरा (ता.पुरंदर ) येथील लक्ष्मीबाई हणमंतराव गिरमे ( वय - ९१) यांचे वृद्धापकाळाने दुखःद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. ॲड. अशोक गिरमे व ॲड. आदेश गिरमे यांच्या त्या मातोश्री होत.

## ॲड. प्रदीप दत्तात्रय उमाप पाटील अध्यक्षपदी



**खेड :** महाराष्ट्र आणि गोवा नोटरीज असोसिएशनच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी ॲड. प्रदीप दत्तात्रय उमाप पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. सय्यद सिकंदर अली यांच्या हस्ते पुण्यातील पदाधिकारी सोहळ्यात त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. प्रदेश कार्याध्यक्ष ॲड. यशवंतराव खराडे, प्रदेश सचिव ॲड. प्रविण नलावडे, पुणे जिल्हा अध्यक्ष ॲड. कल्याण शिंदे व पुणे शहर अध्यक्ष ॲड. आशिष ताम्हाणे सह सर्व पुणे जिल्ह्यातील नोटरी वकिल सभासद यावेळी उपस्थित होते.ॲड. प्रदीप दत्तात्रय उमाप पाटील यांच्या नियुक्तीचे पुणे जिल्ह्यातील वकिलांकडून स्वागत केले जात आहे.

## एसटी कंडक्टरला बेदम मारहाण

**शिरूर :** पुणे जिल्ह्यातील शिरूर येथील एस.टी. आगारात २० जुलै रोजी सकाळी सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास एक धक्कादायक घटना घडली. माजलगाव डेपोची स्लीपर कोच बस पुण्याहून माजलगावला जात असताना शिरूर बसस्थानकात थांबली होती. यावेळी बस पूर्ण क्षमतेने भरलेली असताना एका प्रवाशाला सामानासह बसण्यासाठी जागा नसल्याचे वाहकाने सांगितले. यावरून संतापलेल्या प्रवाशाने वाहकाला शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने आणि लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. या झटापटीत वाहकाचे २१ हजार रुपये गहाळ झाले असून, शिरूर पोलिसांनी या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी लक्ष्मण शिवलाल बैनाडे व चंदुलाल लक्ष्मण बैनाडे (रा. शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे) यांच्या विरोधात शिरूर पोलीस ठाण्यात सुरेश किसनलाल बिजूले (वय ३५, व्यवसाय- नोकरी, रा. उमरा, ता. पाथरी, जि. परभणी) या एस.टी.महामंडळाच्या वाहकाने शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## भिगवणमध्ये नवीन आयटीआय कॉलेजला मान्यता

**भिगवण :** भिगवण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,लोकनेते राजेंद्रकुमारजी घोलप औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस (आय.टी.आय.) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाची नुकतीच मान्यता मिळाली असून चालू शैक्षणिक वर्षे २०२५-२६ पासून विद्यार्थी प्रवेश सुरू होणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अजित क्षीरसागर यांनी दिली. यामध्ये प्रामुख्याने पुढील ट्रेड साठी परवानगी मिळाली असून विद्यार्थी प्रवेशित होणार आहेत. इलेक्ट्रिशियन - २ वर्षे (२० विद्यार्थी), फिटर - २ वर्षे (२० विद्यार्थी), कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रॅमिंग असिस्टंट - १ वर्ष (४८ विद्यार्थी), जिओ इन्फॉर्मेटीक्स असिस्टंट - १ वर्ष (४८ विद्यार्थी). फेब्रुवारी महिन्यात दिल्ली व मुंबई येथील तज्ज्ञांच्या समितीने या संस्थेस भेट देऊन इमारत व परिसर, अत्याधुनिक वर्कशॉप, संगणक लॅब, यंत्रसामुग्री, सर्व भौतिक सोयीसुविधा यांची पाहणी करून परवानगी दिली आहे. ग्रामीण भागात कौशल्य शिक्षणाची खूप गरज आहे. कारण त्यामुळे लोकांना चांगले रोजगार मिळण्यास मदत होते, ही गरज ओळखून संस्थेने आयटीआय कॉलेजचा प्रस्ताव सादर केला असल्याचे प्रा. तुषार क्षीरसागर यांनी सांगितले. ग्रामीण भागात कौशल्याधिष्ठित शिक्षणाची सोय उपलब्ध झाल्याने विद्यार्थी व पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## शिरुर तालुक्यातील पेट्रोल पंपावर चोरी

**शिरुर :** शिरुर तालुक्यातील निमोणे-गुनाट रोडवरील



परफेक्ट एच.पी. पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या चार कामगारांनी मिळून ९४ हजार ५२० रुपयांची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी राजेश्री अनिल काळे (वय ४३, रा. निमोणे, ता. शिरुर, जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. ही घटना दि. २१ जुलै रोजी रात्री १ वाजण्याच्या सुमारास घडली. चोरीस गेलेली रक्कम ही पेट्रोल पंपावरील दैनंदिन कलेक्शन आणि उचल म्हणून ठेवलेली रोख रक्कम होती. आरोपींनी ही रक्कम चोरून पळ काढला. या प्रकरणी रामेश्वर हरिशचंद्र गर्गोंड (रा. खबरा, थाना देवरी, जि. रामसेन, मध्यप्रदेश), रमन सिताराम ठाकूर (रा. मदनपुर बरेली, नरसिंगपूर, मध्यप्रदेश), आकाश विक्रम ठाकूर (रा. सहजपुर ऊटकटा, जि. सागर, मध्यप्रदेश) आणि सोनू ठाकूर (पूर्ण नाव अज्ञात, रा. हाथीडोल, नमाखेडा, थाना देवरी, जि. रामसेन, मध्यप्रदेश) या चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रताप टेंगले करत असून, आरोपींचा शोध सुरू आहे.

# कुंडमळा पुलाची मालकी कोणाची?

## जिल्हा परिषदेने हस्तांतरण करून घेतलेलेच नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मावळ येथील कुंडमळा येथील दुर्घटनाग्रस्त पूल सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधला असून, तो जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करायला हवा होता; मात्र तो केला गेला नाही. तसेच, जिल्हा परिषदेने हा पूल हस्तांतरित करून घेतला नसल्याचे जिल्हा प्रशासनाकडून नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालातून समोर आले आहे. यामुळे या पुलाची मालकी कोणाची, हा प्रश्न अजूनही अधांतरी राहिला आहे.

इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील पूल १५ जून रोजी कोसळून ४ पर्यटकांचा मृत्यू झाला, तर सुमारे ३८ जण जखमी झाले. याची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी अप्पर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची समिती नियुक्त केली होती. या समितीमध्ये जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग यांच्यासह अन्य विभागांचे अधिकारी यांचा समावेश होता.

जिल्हा प्रशासनाने हा अहवाल राज्य सरकारकडे सादर केला असून, त्या अहवालात अनेक धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा लोखंडी पूल १९९२ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात आला. या पुलाच्या एका बाजूस लष्कराची, तर दुसरी बाजूस जिल्हा परिषदेची जागा आहे. २००४ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याकडून या पुलाचे विस्तारीकरण करण्यात आले. त्यानंतरही या पुलाचे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण झालेले नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद या दोन्ही विभागांच्या मालमत्ता पत्रकात त्याचा कुठेही उल्लेख नसल्याचे या समितीने सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे. त्यानंतर २०१७ च्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत हा पूल धोकादायक असल्याने तो जिल्हा परिषदेने दुरुस्त करावा असा निर्णय झाला. त्यावर पूल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेनेही तीन कोटी रुपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली होती. जिल्हा प्रशासनाने एवढा निधी देऊ शकत नाही असे सांगत तो प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम खात्याकडे पाठवून दिला.

> कुंडमळा येथील पुलासंदर्भातील अहवाल समितीने सादर केला आहे. तो अहवाल राज्य शासनाकडे पाठविण्यात आला आहे."
> — **जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी, पुणे

### कारवाईकडे लक्ष

● या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने सार्वजनिक बांधकाम खात्याचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती नेमली आहे. जिल्हा प्रशासनाने सादर केलेला अहवाल या समितीपुढे जाणार आहे. त्यावर समिती काय निर्णय घेणार, यावर या पुलाचा मालक आणि दुर्घटनेस जबाबदार असलेल्यांवर काय कारवाई होणार आहे, हे अवलंबून आहे. त्यामुळे सर्वांचे लक्ष आता सचिवांच्या समितीकडे लागून राहिले आहे.

# ओतुरमध्ये महाराजस्व अभियान शिबीराचा उदासीनतेमुळे फज्जा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**ओतूर :** जुन्नर महसूल विभागाच्या वतीने ओतूर ता. जुन्नर येथे सोमवार दि. २१ रोजी, महाराजस्व अभियान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, ओतूरचे मंडल अधिकारी व तलाठी यांनी या महाराजस्व अभियान शिबिराबाबत प्रत्यक्ष नागरिकांपर्यंत याची माहिती न दिल्यामुळे या शिबिराचा फज्जा उडाल्याचे पाहावयास मिळाले.

सर्वसामान्य जनता, शेतकरी व शेतमजूर यांचा त्यांच्या दैनंदिन कामकाज व विविध प्रश्नांच्या संदर्भात महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांशी नियमित संबंध येतो. महाराष्ट्रातील तळागाळातील जनतेस पारदर्शक व तंत्रस्नेही सेवा विहित कालमर्यादेत पोचवण्याच्या उद्देशाने राज्यात "महाराजस्व अभियान" दरवर्षी महसुल विभागामार्फत सर्वत्र राबविले जाते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास'च्या संकल्पनेस अनुसरून हे अभियान प्रत्येक जिल्हा, तालुका व गावपातळीवर राबवून शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न त्वरित निकाली काढण्याच्या अनुषंगाने "महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करण्याच्या अनुषंगाने यावर्षीही "महाराजस्व अभियान" राबविण्यात येते. ओतूर येथे सोमवार हे अभियान राबविताना ओतूरचे मंडल अधिकारी व तलाठी हे उदासीन असल्याचे दिसून आले. या महाराजस्व अभियान शिबिराबाबत त्यांनी ओतूर गाव वाड्यावस्त्यांवरील सर्वसामान्य नागरिकांना शिबिराबाबत काहीच माहिती कळवली नसल्याच्या तक्रारी येथील नागरिकांनी केली आहे.

वास्तविक शासन कुठले शिबिर अभियान राबविताना, त्याबाबतची जनजागृती करणे त्या - त्या विभागाने आवश्यक आहे. ग्रामीण भागातील शासकीय अधिकाऱ्यांसाठी त्यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी राहणे बंधनकारक आहे. याचा उद्देश, ग्रामीण भागातील जनतेला शासकीय योजनांचा आणि सेवांचा लाभ वेळेवर आणि प्रभावीपणे मिळावा हा आहे. मात्र, ओतूर येथील मंडळ अधिकारी व तलाठी हे कार्यालयाच्या ठिकाणी राहत नसल्याच्या तक्रारी येथील नागरिक करत आहेत शासकीय कामकाजात असणारी त्यांच्यातील उदासीनता सर्व सामान्य जनतेसमोर आलेली असून सदर अधिकारी व कर्मचारी यांनी शासन नियमानुसार आपल्या कक्षेत वास्तव्यास असावे, अशी आग्रही मागणी जनतेतून होत आहे.तर फज्जा उडालेल्या कॅम्प मध्ये नागरिकांची झालेली गैरसोय शासनाकडून दूर करून संबंधितांचे कान टोचले जावेत आणि नागरिकांसाठी पुन्हा नियोजित कॅम्प घेण्यात यावा अशी मागणी होत आहे.

# बेकरीतील पावामध्ये आढळली घुशीची लेंडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** पुरामलिंग रोड, ता. शिरुर येथील प्रसिद्ध सिरवी बंधू मिठाईवाले या बेकरीतून खरेदी केलेल्या पावाच्या लादीत चक्क घुशीची लेंडी आढळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. त्यामुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

रविवार, दि.२० जुलै रोजी सतीष तागड यांच्या बाबतीत ही घटना घडली असून, त्यांनी बेकरीतून दोन पावाच्या लाद्या खरेदी केल्या. मात्र, एका लादीत त्यांना घुशीची मोठी आणि लेंडी दिसून आली. सदर प्रकार पाहून तागड यांनी बेकरीत धाव घेतली आणि इतर ग्राहकांसमोर हा प्रकार उघड केला असुन, हा पाव जर एखाद्या लहान मुलाने किंवा आजारी व्यक्तीने खाल्ला असता, तर त्यांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असता, असा संतप्त प्रतिक्रिया तागड यांनी व्यक्त केली आहे. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या निष्क्रीयतेवरही जोरदार टीका केली जात आहे.

FOOD AND DRUG ADMINISTRATION

शिरूर शहर आणि तालुक्यातील अनेक बेकऱ्यांमध्ये प्रचंड अस्वच्छता आहे. अन्न प्रशासन यंत्रणा केवळ कागदोपत्रीच कार्यरत असून, प्रत्यक्ष कारवाई होत नाही. शहरातील हॉटेल्स व बेकऱ्यांमध्ये शिळे, खराब, धोकादायक पदार्थ खुलेआम ग्राहकांना विकले जात आहेत. अन्न सुरक्षा विभागाकडून कोणतेही नियमित व काटेकोर निरीक्षण होत नसल्यामुळे या धोकादायक प्रकारांना आळा बसलेला नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे. या घटनेनंतर नागरिकांनी प्रशासनाकडे खोलवर चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे. संबंधित बेकरीवर तत्काळ गुन्हा दाखल करून कारवाई झाली नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन करू, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे. अन्न सुरक्षा विभाग यानंतर तरी जागा होईल का? हे पाहणे आता नागरिकांसाठी आणि प्रशासनासाठी दोघांसाठीही अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

# जिल्ह्यात अवकाळी पाऊस, गारपीट व अतिवृष्टीने भात रोपवाटिकांचे नुकसान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्ह्यात अवकाळी पाऊस, गारपीट व अतिवृष्टीमुळे जून महिन्यात चार तालुक्यांमध्ये १२७५ हेक्टरवरील भात रोपवाटिकांचे नुकसान झाले आहे. त्यामध्ये वेल्हा, मुळशी, मावळ व हवेली या तालुक्यांतील १९३ गावांतील ३ हजार ३२१ शेतकऱ्यांना नुकसानीच्या पंचनाम्यानुसार सुमारे १ कोटी ८ लाख ४३ हजार रुपयांइतकी नुकसानभरपाई मिळावी, असा प्रस्ताव जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी विभागीय महसूल आयुक्तांकडे पाठविला आहे. जूनमध्ये १४१ टक्के पाऊस पडला. वेल्हा, मुळशी, मावळ व हवेली या तालुक्यांत नवीन लागवड झालेल्या भात रोपवाटिकेचे नुकसान झालेले आहे. शासनाच्या २७ मार्च २०२३ च्या निर्णयान्वये जिरायती पिकांसाठी प्रतिहेक्टरी ८ हजार ५०० रुपये मदतीचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून भात रोपवाटिका नुकसानीचा पंचनाम्यानुसारचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविला होता. त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाने पुढे पाठविल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

जून महिन्यातील अतिवृष्टीमुळे शेतपिके, फळपिके, शेतजमीन आदींच्या ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसानीचे पंचनामे अंतिम झाले आहेत. शेतपिके, फळपिके व जमिनीचे १५ गावांतील १४७ शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यांचे ४०.१७ हेक्टरवरील पिकांचे ६ लाख ५८ हजार रुपयांइतके नुकसान झालेले आहे.

शासनाच्या २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार नुकसानीस आर्थिक साहाय्याचे दर प्रतिहेक्टरी कमीत कमी कोरडवाहू पिकांसाठी १ हजार रुपये, बागायती पिकांसाठी २ हजार रुपये व बहुवार्षिक पिकांसाठी २५०० रुपये आहे. तहलीसदार कार्यालयानुसार वेल्हा, मुळशी, लोणी काळभोर व दौंड यांचा या नुकसानीत समावेश असल्याचे काचोळे यांनी सांगितले.



# पुरंदर रोटरी क्लब : प्रमोद धनावडे अध्यक्षपदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** पुरंदर रोटरी क्लब ऑफ पुरंदरने २०२५-२६ या वर्षासाठी नव्या नेतृत्वाची घोषणा केली आहे. सासवड येथील प्रमोद शंकर धनावडे यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली असून, दंततज्ञ डॉ. उमाकांत ढवळे यांची सचिवपदी निवड झाली आहे. रविवारी (दि. २०) सासवड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झालेल्या पदग्रहण समारंभात ही माहिती जाहीर करण्यात आली. या सोहळ्यात सुनील जगताप यांनी उपाध्यक्ष म्हणून तर तुषार जगताप यांनी खजिनदार म्हणून जबाबदारी स्वीकारली.

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३१ चे २०२६-२७ चे प्रांतपाल नितीन ढमाले आणि सहाय्यक प्रांतपाल डॉ. राजेश दाते यांच्या हस्ते हा शानदार सोहळा पार पडला. ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा रोटरीयन राजवर्धिनी जगताप यांचीही याप्रसंगी विशेष उपस्थिती होती. या समारंभातील एक महत्त्वाचा आणि प्रेरणादायी क्षण म्हणजे पुरंदरमधील ग्रामीण भागातील शाळांमधील इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'आयडीयल स्टडी ॲप' चे वितरण. हे ॲप विद्यार्थ्यांच्या शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांना अधिक प्रभावीपणे अभ्यास करण्यास मदत करेल, असे इंदापूर रोटरी क्लबचे वसंत माळूंजकर यांनी सांगितले. यावेळी रोटरीचे माजी अध्यक्ष व संचालक ॲड. युवराज वारघडे, अनिल उरवणे, डॉ. प्रवीण जगताप, डॉ. सुमित काकडे, गुलाबराव गायकवाड, अभिजित बारवकर, डॉ. विनायक बांदेकर, ॲड. आनंद जगताप, जीवन कड, भारती गायकवाड, कृष्णा शेट्टी, प्रा. संदीप टिळेकर, डॉ. संदीप होले, डॉ. सचिन कुदळे, डॉ. नितीन पांढरे, संतोष गायकवाड, आणि विश्वनाथ गायकवाड यांचा समावेश होता. या वर्षासाठी रोटरीची नवी थीम 'चांगल्या कार्यासाठी एकत्र या' याचेही अनावरण करण्यात आले.

नवनिर्वाचित अध्यक्ष प्रमोद धनावडे यांनी त्यांच्या भाषणात, पुरंदर रोटरीचे संस्थापक दिवंगत चंद्रकाका जगताप आणि माजी आमदार संजय जगताप यांच्या विचारांनी प्रेरित होऊन काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. ग्रामीण भागात आरोग्य सेवा, शैक्षणिक साधने पुरवणे आणि शुद्ध पाणी पुरवठा यांसारखे महत्त्वाचे प्रकल्प राबवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या पदग्रहण समारंभाला माजी सनदी अधिकारी के. सी. कारकर, स्मिता वाघ, नितीन शहा, वसंत माळूंजकर, संतोष कुंभार, हेमलता माळूंजकर, प्राचार्य नंदकुमार सागर, कुंडलिक मेमाणे यांसह तालुक्यातील विविध गावांतून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# अलंकापुरीत माऊलींचे हरिनाम गजरात आगमन

## हजेरी मारुती मंदिरात हजेरी; दर्शनास भाविकांची गर्दी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराज पायी वारी पालखी सोहळा हरिनाम गजरात प्रवेशल्या नंतर एकादशी दिनी सोमवारी (दि. २१) श्रींचे पायीवारी पालखी सोहळ्याची सांगता मानकरी, वारकरी भाविकांचे उपस्थितीत हरिनाम गजरात हजेरी मारुती मंदिरात दिंडी प्रमुख विणेकरी यांचे अभंगरूपी सेवा रुजू करीत हजेरीच्या कार्यक्रमाने उत्साहात सांगता झाली. आळंदीत संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी दर्शनास लाखावर भाविकांनी कामिका आषाढी एकादशी दिनी श्रींचे दर्शनास गर्दी करून दर्शन घेतले.

यावेळी परंपरेने वसंतराव कुऱ्हाडे पाटील, श्रीधर कुऱ्हाडे पाटील, आणि डॉ. नाईक परिवाराचे वतीने नारळ व प्रसाद वाटप झाले. आषाढी एकादशी निमित्त श्रींचे मंदिरात तसेच हजेरी मारुती मंदिरात गाभारा आकर्षक फुलांनी सजविण्यात आला होता. तत्पूर्वी श्री संत ज्ञानोबा - तुकोबा यांची संतभेट आळंदी मंदिरात झाली. देहू संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, विश्वस्त दिलीप महाराज मोरे, गणेश महाराज मोरे, वैभव महाराज मोरे, विश्वस्त विक्रमसिंह महाराज मोरे, उमेश महाराज मोरे, लक्ष्मण महाराज मोरे यांचेसह देहू संस्थानचे माजी अध्यक्ष,विश्वस्त, महाराजांचे वंशज, भाविक, ग्रामस्थ यावेळी उपस्थीत होते. यावेळी श्रींचे गाभाऱ्यात पदाधिकाऱ्यांची गर्दीने श्री रुख्मिणी माता मूर्तीही थेट पदाधिकारी श्रींचे समोर उभे राहिल्याने झाकली गेली.



### इंद्रायणी आरती उत्साहात

● इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती सेवा समितीचे वतीने इंद्रायणी नदी घाटाची स्वच्छता करण्यात आली. यावेळी इंद्रायणी आरती सेवा समितीचे संयोजक अर्जुन मेदनकर, राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठानचे अध्यक्षा संयोजिका अनिता झुजम,शिळा कुलकर्णी, नीलम कुरधोंडकर, माजी नगरसेविका उषा नरके, शोभा कुलकर्णी, कौसल्या देवरे, सरस्वती भागवत, नंदा भामरे, त्रिवेणी वालकर, सविता वरळीकर, छाया वरळीकर, संगीत महामुनी, बाबुराव मोरे, महिला बचत गट महासंघ अध्यक्षा सुवर्ण काळे, सुरेखा काळभोर, शाळां होनावळे, अनिता शिंदे, लक्ष्मी जाधव, संगीत काळे, दिनकर तांबे, अमर गायकवाड, सुहास सावंत, ज्ञानेश्वर घुंडरे, गोविंद ठाकूर आदी मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते.



आळंदी मंदिरात संत भेट प्रसंगी आळंदी संस्थानचे विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजन नाथसाहेब, अँड.राजेंद्र उमाप, पालखी सोहळा प्रमुख भावार्थ देखणे, विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, निलेश महाराज लोंढे, मुख्य व्यवस्थापक माऊली वीर, देहू संस्थानचे माजी प्रमुख विश्वस्त पुरुषोत्तम महाराज मोरे, माणिक महाराज मोरे, देहू संस्थांचे विश्वस्त मंडळ आदी मान्यवर सोहळ्यास उपस्थित होते. पालखी सोहळा मालक राजेंद्र आरफळकर, बाळासाहेब आरफळकर, श्रींचे सेवक चोपदार बाळासाहेब रणदिवे, राजाभाऊ रंधवे चोपदार, पुजारी अमोल गांधी, राजाभाऊ चौधरी, माजी नगराध्यक्ष मानकरी राहूल चिताळकर पाटील, योगीराज कु-हाडे, योगेश आरू,स्वप्नील कुऱ्हाडे, अनिल कुऱ्हाडे, उपव्यवस्थापक तुकाराम महाराज माने, श्रीधर सरनाईक यांचेसह दिंडीकरी, विणेकरी मंदिरात भाविक, वारकरी यांचे दर्शनाचे नियोजनास तसेच संत भेट प्रसंगी दोन्ही संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. पहाट पूजेत परंपरेने पवमान अभिषेख आणि संत भेट प्रसंगी संत तुकाराम महाराज यांचे पादुका श्रींचे संजीवन समाधी समीप मांडत पूजा विधिवत वेदमंत्र जयघोषात करण्यात आली.

परंपरेच्या उपचारात मंदिरात परंपरेने श्रीना पवमान अभिषेख, दुधारती झाली. श्रीना नैवेद्य झाला. यावर्षी श्रींचे पालखीचे नगरप्रदक्षिणा हरिनाम गजरात झाली. मंदिर प्रदक्षिणेत सोहळ्यातील दिंड्यांतील विणेकरी यांचे अभंग हजेरी मारुती मंदिरात हजेरीचे कार्यक्रमात झाले. आषाढी एकादशी तसेच संतभेट यामुळे भाविकांची गर्दी वाढली. मंदिरातुन सकाळी संत भेट झाल्या नंतर संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने हरिनाम गजरात परतीचा प्रवास देहूकडे सुरु केला. श्रींचे पालखीची मंदिर प्रदक्षिणा आणि एकादशी निमित्त नगरप्रदक्षिणा हरिनाम गजरात झाली.

ख-या अर्थाने सोहळ्याची सांगता हरिनाम गजरात आळंदीत झाली. टाळ मृदंगाचा निनाद, हरी नामाचा जयघोष करीत श्रींचा चांदीचा लक्षवेधी मुखवटा फुलांनी सजलेल्या पालखीत विराजमान करीत श्रींचे पालखीची आषाढी एकादशी दिनी वैभवी मंदिर व नगरप्रदक्षिणा झाली. माऊलींचे पायी वारी पालखी सोहळा कालावधीत मंदिरात नित्य नैमित्तिक धार्मिक कार्यक्रम उत्साहात झाले.

---

## भिवरी येथील हॉटेलवर छापा

**सासवड :** भिवरी (ता. पुरंदर) येथील सिंडीकेट हॉटेलमध्ये अवैधरित्या हुक्का बार चालवला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर सासवड पोलिसांनी छापा टाकून तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सासवड पोलिसांकडून मिळालेले माहितीनुसार या प्रकरणी फिर्याद पोलीस कॉन्स्टेबल अक्षय शंकर चिले यांनी दिली असून, सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१८ चे कलम ४ अ व २१ अ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी संशयित आरोपी स्वप्नील संभाजी ढवळे (वय २६), पारस शाही (वय २३) इडिन रावल (वय २३, तिघेही रा. भिवरी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पथकाने गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकला असता, हॉटेलमध्ये ६ जण हुक्का ओढताना आढळून आले. तसेच आरोपी ग्राहकांना सेवा पुरवताना दिसले. छाप्यात चार हुक्का पॉट, चिलिम, हुक्का फ्लेव्हर, कोळसा व अन्य साहित्य असा ४,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रसंगी हुक्का पॉटमधील पाणी व कोळसा जागेवरच नष्ट करण्यात आला. संपूर्ण कारवाईचा पंचनामा करून जप्त मुद्देमाल सील करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संतोष सोनवणे हे करत आहेत. हुक्का पार्लरवरील कारवाईमुळे स्थानिकांत खळबळ उडाली आहे.

---

## सहा कक्ष अधिकारीपदी वर्षा कुलकर्णी यांची नियुक्ती



**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील काटी या गावातून वर्षा वंदना विजयकुमार कुलकर्णी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची सहाय्यक कक्ष अधिकारी परीक्षा उत्तीर्ण झाल्या असून, त्यांची सहाय्यक अधिकारी पदावर नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन होत आहे. प्रतिकुल परिस्थितीत वर्षा यांनी मोठ्या जिद्दीने हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

---

## भाटघर धरणातील पाणी झाले हिरवे



**नीरा :** भाटघर धरणाच्या उत्तरेकडील धरणाच्या भिंतीपासून काही अंतरावर हिरवेगार पाणी दिसत आहे तसेच या हिरव्यागार पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. दूषित पाण्यामुळे भाटघर धरणातून पाणीपुरवठा होणाऱ्या काही गावांच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. भाटघर धरणात हिरवेगार पाणी दिसत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या चार दिवसांपासून धरणात हिरवेगार पाणी असल्याने संगमनेर व शेजारील गावात रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. या परिसरात नऱ्हे व माळवाडी येथे खासगी दवाखाना असून सद्यस्थितीला दोन्ही दवाखान्यात गर्दी दिसून येत आहे. गावातील वयस्कर व चिमुकल्यांच्या जीवाला जास्त धोका निर्माण झाला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून भाटघर धरण पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस होत असल्याने पाणी गढूळ होऊन दूषित झाले आहे; परंतु चार दिवसांपासून पाण्याचा रंग बदलला असून पाणी हिरवेगार दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. धरणातील पाण्याने अचानक रंग बदलल्याने पाण्यामध्ये कुणी रसायन टाकले आहे की काय? किंवा धरण क्षेत्राच्या शेजारील फार्म हाऊस वाल्यांनी ड्रेनेज लाइनचे पाणी सोडले आहे की काय? असे तर्क वितर्क नागरिकांमधून होत आहे.

---

# हजरत पठाणशाह बाबांचा उरूस उत्साहात साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरानजीक असलेल्या पाडेगाव (ता. खंडाळा) येथील हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबा दर्गाहचा ४१ वा ऊरूस उत्साहात साजरा करण्यात आला. शुक्रवार (१८ जुलै) पासून ते रविवार (२० जुलै) या दरम्यान ऊरूसानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमासह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, ऊरूसानिमित्त दर्गाह परिसर रोषणाईने उजाळून निघाला होता.

पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या हद्दीवर असलेल्या पाडेगाव (ता. खंडाळा) येथील हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबा दर्गाह अनेक वर्षांपासून आहे. हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतिक म्हणून या दर्ग्याकडे पाहिले जाते. हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबांच्या ४१ व्या ऊरूसानिमित्त शुक्रवारी १८ जुलै रोजी सायंकाळी दर्गाह स्थळापासून नीरा गावातून संदल व गिलाफची मिरवणूक काढण्यात आली होती.रात्री साडेनऊ वाजता ही मिरवणूक पुन्हा दर्गाह स्थळावर आल्यानंतर बाबांच्या समाधीला धार्मिक विधिवत संदल लावण्यात आला.

शनिवारी १९ जुलैला दुस-या दिवशी ऊर्स असून बाबांच्या दर्शनासाठी नीरा, पाडेगाव, निंबुत,लोणंद, बारामती परिसरासह पुण्याहून दर्शना साठी भाविक आले होते. रात्री अकरा वाजता मिलादख्वाणीचा कार्यक्रम पार पडला. तिसऱ्या दिवशी २० जुलैला सकाळी नऊ वाजता कुराण पठण करण्यात आले. सकाळी ११ वाजता जियारतचा धार्मिक विधी करण्यात आल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पुरूषोत्तम जगताप, पुणे जि.प.चे माजी बांधकाम सभापती दत्ताजीराव चव्हाण, जि.प.चे माजी सदस्य विराज काकडे, नीरेचे उपसरपंच राजेश काकडे, समर्थ पतसंस्थेचे चेअरमन राजेश चव्हाण, नीरा ग्रा.पं.सदस्य अनिल चव्हाण, पाडेगांवचे माजी सरपंच विजय धायगुडे,



हजरत पठाणशाह बाबा दर्गाहचे दर्शन घेताना पुरूषोत्तम जगताप, राजेश चव्हाण, महेश काकडे व उपस्थित मान्यवर.

सोमेश्वरचे माजी संचालक महेश काकडे, बाळासाहेब ननवरे, अँड.पृथ्वीराज चव्हाण, भगवानराव माने, गजानन माने, नितीन कुलकर्णी यांच्यासह हजारो भाविकांनी बाबांचे दर्शन घेतले. दर्गाह ट्रस्टचे अध्यक्ष मुस्तफा आतार, उपाध्यक्ष रशीदभाई सय्यद, सचिव फिरोज सय्यद , विश्वस्त मोहंम्मदगौस आतार यांच्यासह दर्गाह खिदमतगार कमिटीचे मन्सुर सय्यद, आयुब मुलाणी, सिकंदर शेख, नसरूद्दीन शेख यांच्यासह तरूण कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

# खड्डे चुकविताना चार चाकी व दुचाकीची धडक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** मंचर-पारगाव (ता.आंबेगाव ) या रस्त्यावर अवसरी बुद्रुक गावच्या हद्दीत मुक्ताबाई मंदिराजवळ खड्डे चूकविण्याच्या नादात दुचाकी व चारचाकीचा अपघात झाला असून या अपघातात दुचाकी चालक सचिन ज्ञानेश्वर पडवळ (वय २९ वर्षे) हे गंभीर जखमी झाले आहे. त्यांच्यावर पारगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की सविंदणे येथील सचिन ज्ञानेश्वर पडवळ हे त्यांची एमएच-१२, एलई- ४५१८ दूचाकी वरून कामानिमित्त सकाळी मंचरच्या दिशेकडे जात असताना त्याचवेळी मंचर येथील नवीन लालखान पठाण (वय ५२ वर्षे) हे त्यांचे इंडिका एमएच -४३, आर- ४२६९ या गाडीत कुटुंबातील इतर तिघांसोबत पारगाव बाजूकडे जात होते. सकाळी नऊ वाजताचे दरम्यान अवसरी बुद्रुक गावचे हद्दीत मुक्ताबाई मंदिराजवळ इंडिका गाडी व दुचाकीची समोरासमोर धडक झाली. अपघातात दुचाकी चालक सचिन ज्ञानेश्वर पडवळ हा गंभीर जखमी झाला आहे. तर त्याच्यावर पारगाव येथे उपचार सुरू आहेत. अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

दरम्यान, सदर अपघात हा खड्डे बुजवण्याच्या नादात झाला असल्याचे सांगितले जात आहे. अवसरी ते पारगाव या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे असून खड्ड्यांमुळे वारंवार छोटे-मोठे अपघात घडत आहेत. या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठी ४१८ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. मात्र, अद्यापही काम सुरू झाले नाही. ठिकठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत. त्यामुळे वारंवार अपघात घडत आहेत. संबंधित ठेकेदाराने तात्पुरत्या स्वरूपात तात्काळ खड्डे बूजवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिक, प्रवासी करत आहेत.

---

# शालेय मुले शिकली भातशेती लागवडीचे धडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** जेजुरी - जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज जेजुरी विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी काळदरी खोऱ्यातील धनकवडी या गावामध्ये भात लागवडीसह अभ्यासक्रम पूरक उपक्रम राबविले यात पारंपरिक भात शेतीच्या लागवडीचा एका शेतकरी अनुभवी आज्जी बाईकडून. अनुभव शिकायला मिळाला भात रोपाची काढणी, प्रत्यक्ष भात लावणी, डोंगराळ गावच्या परंपरा, प्रथा आणि व्यथा, गावाकडचे जीवन, रानमेवा, शेतातील कष्ट, रानातील वनस्पती इत्यादी अनेक गोष्टी समजून घेतल्या.

निसर्गाच्या कुशीतील हे कौशल्य आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना आनंददायी व ज्ञानात्मक ठरेल असा विश्वास वर्गशिक्षक मधुसूदन जगताप यांनी व्यक्त केला. धनकवडी गावचे नागरिक व शेतकरी यांनी मोलाचे सहकार्य केले. चंदुकाका जगताप यांच्या बरोबरीने शिक्षण क्षेत्रात काम करणारे ताकवले गुरुजी यांचे कुटुंबीयांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. रानातील दुपारच्या जेवणानंतर या भात लागणीच्या उत्सवाची सांगता झाली. जिजामाता विद्यालयाच्या पुनम बाठे व श्वेतांबर बेलसरे तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनकवडीचे मुख्याध्यापक कटके सर व दीपक गिरी यांनी भात लागण उपक्रमाचे दर्जेदार नियोजन केले. या उपक्रमाचे अध्यक्ष आनंदी काकी जगताप, सचिव संजय जगताप, संस्थेचे सर्व संचालक, जिजामाता विद्यालयाच्य सर्व शिक्षक, शिक्षकेतर वृंद व पालकांनी मनापासून कौतुक केले. असे उपक्रम विद्यालयात राबविले जात आहेत व पुढेही राबविले जातील असा विश्वास पर्यवेक्षक पायगुडे मॅडम यांनी व्यक्त केला.



---

# मजुरांअभावी इंदापूरात खरीप हंगाम करपतोय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इतर पिकांच्या तुलनेत पेरुच्या बागांमध्ये मिळणारा रोजगार,वाहनांचे भाडे व कमिशनच्या मोहापायी मजुराच्या अज्ञानाचा फायदा उचलून अधिकच्या पैशाचे आमिष दाखवून मजुरांना त्यांच्या गावापासून दूर असलेल्या गावात शेतीच्या कामांसाठी

नेणाऱ्या अघोषित ठेकेदारांची सुरु असणारी चलती या बाबींमुळे, खरीप हंगामात फळबागांच्या व्यतिरिक्त इतर पिकांच्या पेरणीच्या कामांसाठी मजूरांची टंचाई भासत असल्याने मजुरांअभावी खरीप हंगाम करपत चालल्याचे इंदापूर तालुक्यामधील प्रत्येक गावातील चित्र आहे.

शेतीच्या कामासाठी शेतमजूर महिलेला प्रति तास ६० रुपये प्रमाणे दिवसाची ३०० रुपये हजेरी दिली जाते.सकाळी नऊ ते दुपारी एक या वेळेत त्या कामे निपटतात. त्यापुढे जर काम करण्याचा आग्रह धरला तर ६० रुपये तासाने त्यांचा ओव्हरटाईम सुरु होतो. शेतमजूर पुरुषाला प्रतिदिवस ६०० रुपये हजेरी दिली जाते. सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळात तो कामे करतो. हे वरवर दिसणारे चित्र आहे. मात्र, फळबागा विशेषतः पेरुच्या बागांचे क्षेत्र वाढले. त्यामध्ये महिला व पुरुष शेतमजूरांना अधिक पैसे कमावण्याची संधी मिळू लागली. त्यामुळे इतर पिकांच्या कामासाठी मजूर मिळेनासे होवू लागले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.पेरुच्या बागांना बांबू, तारकाठी करणे,ओढणे या कामात इतर पिकांच्या तुलनेत चांगले पैसे मिळतात. त्यामुळे



ते काम करणारांच्या पुरुष मजुरांच्या टोळ्या तयार झाल्या आहे. एकरी किमान पाच हजार रुपये दराने त्या टोळ्या हे काम उक्तेच घेत आहे. पटापट काम करायचे. दाम घेऊन मोकळे व्हायचे. लगेच दुसऱ्या कामाकडे लक्ष केंद्रित करायचे असा पैसा मिळवण्याचा वेगवान फंडा त्यातून निर्माण झाला आहे.

पेरुच्या बागेत पेरुला फोम बसवण्याचे काम महिला मजुराला दिले जाते. एक फोम बसवण्यासाठी ऐंशी ते नव्वद पैसे हजेरी दिली जाते. एक महिला एका दिवसात कमीत कमी हजार पेरुन फोम बसवते. एका दिवसात नऊशे रुपये कमवते. त्यामुळे पेरुच्या बागांमधील कामांकडे महिला पुरुष शेतमजूरांचा ओढा वाढत चालल्याचे दिसत आहे.

या खेरीज स्थानिक मजूरांना मजुरीसाठी परगावी नेणाऱ्या इसमांचा व्यवसाय सध्या तेजीत चालू आहे. वास्तविक पहाता प्रत्येक गावात मजुरीचे दर निश्चित ठरलेलेच असतात. मात्र परगावच्या शेतकऱ्यांना झटपट काम करण्यासाठी मजूर पुरवतो, त्या बदल्यात कमिशनची मागणी करायची. स्थानिक मजुरांना अधिकच्या रोजगाराचे आमिष दाखवून कामासाठी परगावात न्यायचे, अशी मजूर पुरवणाऱ्या अघोषित ठेकेदारांचा एक वर्ग तालुक्यात तयार झाला आहे. त्यांच्याकडे वाहन असले तर दुधात साखर. नसले तर एखाद्या वाहन मालकाला तोंडी कराराद्वारे तयार करायचे व त्याला मिळणाऱ्या दुधावरची साय खायची. वरुन संबंधित शेतमालकाकडून कमिशन ही काढायचे हे काम हा वर्ग मोठ्या शिताफीने करत आहे.

मजुरीच्या कामांच्या दृष्टीकोनातून योग्य असलेल्या युवा वर्गातील अनेकांनी शिक्षण झाल्यानंतर आलेल्या शहाणपणामुळे शेतीतील कामांपेक्षा जास्तीचा रोजगार मिळवून देणा-या बांधकाम व सेवा क्षेत्राकडे लक्ष केंद्रित केले आहे. त्याचा फटका शेतीला बसतो आहे. या सर्व स्थितीमुळे खरीप हंगाम करपत चाललेला आहे.




# ऐंशी टक्के लोकांना हवाय नोकरीत बदल

करिअर

दिवसेंदिवस भारताच्या लोकसंख्येत वाढ होत आहे; मात्र या वाढणाऱ्या लोकसंख्येबरोबरच रोजगाराच्या समस्यादेखील निर्माण होत आहेत. सध्या मोठ्या प्रमाणात नोकऱ्यांचे संकट आहे. एका अहवालानुसार, भारतात दर दहापैकी आठ लोक नवीन नोकरीच्या शोधात आहेत. अर्ध्याहून अधिक म्हणजे जवळपास ५५ टक्के लोक म्हणतात, की नवीन वर्षात नोकरी शोधणे अधिक कठीण झाले आहे. 'लिंक्डेन'ने केलेल्या अभ्यासात ही माहिती समोर आली आहे.

**भारतातील ६९ टक्के 'एचआर'**

व्यावसायिकांचा वाटते, की आता कुशल कर्मचारी शोधणे पूर्वीपेक्षा अधिक कठीण झाले आहे. याचा अर्थ २०२५ मध्ये नोकऱ्या शोधण्याच्या पद्धतीत बदल करण्याची गरज आहे. गेल्यावर्षीही नोकरी शोधणाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. मात्र आताही परिस्थिती सुधारलेली नाही. एका अभ्यासानुसार, ३७ टक्के लोक नवीन नोकरी शोधत नाहीत तर ५८ टक्के लोकांना वाटते, की या वर्षी तरी नोकरीच्या क्षेत्रात सुधारणा होईल आणि त्यांना नवीन नोकरी मिळू शकेल.

**नव्या नोकरीसाठी जास्त अर्ज**

नोकरीसाठी अनेक लोक एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणी अर्ज करत आहेत. ४९ टक्के लोक पूर्वीपेक्षा जास्त नोकऱ्यांसाठी अर्ज करत आहेत; मात्र त्यांना कमी प्रतिसाद मिळत आहे. २७ टक्के 'एचआर' व्यावसायिक दररोज अशा अनेक अर्जांची छाननी करत आहेत. ५५ टक्के लोकांचे म्हणणे आहे, की त्यांना प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये कौशल्यांचा अभाव आहे.

**'लिंक्ड इन इंडिया'चा अहवाल**

भारतीयांनी नोकरी शोधण्याच्या पद्धतीत विचारपूर्वक बदल करण्याची आवश्यकता असून 'लिंक्डेन प्रोफाइल' अपडेट ठेवा आणि तुमच्या कौशल्यांशी जुळणाऱ्या भूमिकांवर लक्ष केंद्रित करा, असे लिंक्ड इन इंडियाचा अहवाल सांगतो.

**'एआय'चा वापर**

भारतातील ६० टक्के लोक नवीन क्षेत्रात काम करण्यास तयार आहेत. ३९ टक्के लोक या वर्षी नवीन कौशल्ये शिकण्याची तयारी करत आहेत. भविष्यात बहुतांश नोकऱ्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. हे पाहता 'लिंक्डेन' ने सर्वाधिक नोकऱ्या देणाऱ्या तीन नवीन क्षेत्रांचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये एअरक्राफ्ट मेंटेनन्स इंजिनिअर, रोबोटिक्स टेक्निशियन आणि क्लोजिंग मॅनेजर यांचा समावेश आहे.

# हैद्राबादला पर्यटकांची सर्वाधिक पसंती

भटकंती


२०२४ च्या वार्षिक अहवालानुसार, पुरी, वाराणसी आणि हरिद्वार ही सर्वाधिक भेट दिलेली धार्मिक स्थळे ठरली आहेत. हैदराबादलाही या वर्षी पर्यटकांची सर्वाधिक पसंती मिळाली आहे.

या अहवालात संपूर्ण वर्षातील बुकिंग डेटादेखील समाविष्ट करण्यात आला आहे. भारत हे नेहमीच धार्मिक स्थळांचे केंद्र राहिले आहे. या अहवालात पुरी, वाराणसी आणि हरिद्वार ही सर्वात जास्त पसंतीची तीर्थक्षेत्रे असल्याचे समोर आले आहे. दुसरीकडे देवघर, पालणी, गोवर्धन या अध्यात्मिक स्थळांना कमी लोकांनी भेट दिली आहे. गोव्यापेक्षा या धार्मिक स्थळांना लोक जास्त भेट देत आहेत.



**उत्तर प्रदेशला भाविकांचा ओढा**

हैदराबादनंतर बेंगळुरू, दिल्ली आणि कोलकाता ही शहरे बुकिंगच्या यादीत अव्वल आहेत. सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे या यादीत उत्तर प्रदेशने प्रथम क्रमांकावर आपले स्थान निर्माण केले आहे. महाराष्ट्र, तेलंगणा आणि कर्नाटकातूनही भरपूर बुकिंग झाले आहे. पाटणा, राजमुंद्री आणि हुबळी या छोट्या शहरांच्या लोकप्रियतेमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. या अहवालाच्या आधारे बुकिंगमध्ये ४८ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे समोर आले आहे. हा अहवाल प्रसिद्ध करणाऱ्या 'ओवायओ'ने म्हटले आहे, की या वर्षी सुट्ट्यांमध्ये खूप लोकांनी प्रवास केला आहे. यामध्ये जयपूरदेखील मागे नाही. ते पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र आहेच पण त्यानंतर गोवा, पाँडिचेरी आणि म्हैसूरसारखी सदाहरित आवडती ठिकाणेही गजबलेली राहिली आहेत. विशेष म्हणजे मुंबईत बुकिंगमध्ये घट दिसून आली आहे. 'ओवायओ' चे ग्लोबल चीफ सर्व्हिस ऑफिसर श्रीरंग गोडबोले म्हणाले, की २०२४ हे जागतिक प्रवासाच्या दृष्टिकोनातून खूप वेगळे वर्ष ठरले आहे.



# कोणते स्मार्टफोन बाजारात येणार?

नवीन काय?

'ॲपल'च्या आयफोन १६ई सह इतर अनेक स्मार्टफोन फेब्रुवारीमध्ये लॉन्च झाले. आता स्मार्टफोन प्रेमींसाठी मार्च महिनाही असाच खास असणार आहे. कारण 'सॅमसंग'सह इतर अनेक कंपन्या या महिन्यात आपापली नवीन मॉडेल लॉन्च करणार आहेत. तेव्हा नवीन स्मार्टफोन घ्यायचा असेल तर या महिन्यातील अनेक नवीन पर्यायांची माहिती घ्या.

* 'नथिंग फोन ३ ए' या सीरिजमध्ये नथिंग फोन ३ए आणि नथिंग फोन ३ए प्रो ही मॉडेल्स चर्चेत आहेत. २ ए आणि २ ए प्लस च्या तुलनेत या दोन्ही मॉडेल्सना नवीन लुक आणि अपग्रेड फीचर्स दिले जातील, असे यासंबंधीच्या टीझरमधून समोर आले आहेच. ३ ए प्रो मध्ये ५० एमपी पेरिस्कोप कॅमेरा असण्याची अपेक्षा आहे.

* आयकूही मिड-रेंज सेगमेंटमध्ये एक नवीन स्मार्टफोन लॉन्च करणार असून 'आयकू निओ १०आर ५जी' ॲमेझॉनद्वारे विकला जाईल. त्याची किंमत ३० हजार रुपयांपेक्षा कमी असू शकते. यात ६.७८ इंचाचा डिस्प्ले आणि ८ एस जेन ३ प्रोसेसर असण्याची अपेक्षा आहे. त्याच्या मागील बाजूस एक ५० एमपी मुख्य सेन्सर प्रदान केला जाऊ शकतो.

* विवा टी४ एक्स ५ जी विवा टी४ एक्स ५ जी स्मार्टफोन देखील या महिन्यात लॉन्च होऊ शकतो. कंपनीने त्याचाही टीझर लाँच केला आहे. हा फोन ६.७२ इंचाचा एफएचडी, आयपीएस एलईडी डिस्प्ले, मीडिया टेक डायमेंशन ७३००, ५०एमपी मुख्य सेन्सरसह ड्युअल कॅमेरा सेट आणि जलद चार्जिंग सपोर्टसह ६,५०० एमएएच बॅटरीसह असेल. त्याच्या लॉन्चची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही.

* सॅमसंग मार्चमध्ये तीन नवीन फोन लॉन्च करण्याच्या तयारीत आहे. गॅलेक्सी ए सीरीज स्मार्टफोन भारतात लॉन्च केले जातील. हा फोन मेटल फ्रेमसह येऊ शकत असल्याचेहे टीझरमधून समोर आले आहे.



असे मानले जात आहे की कंपनी गॅलेक्सी ए २६ स्मार्टफोन गॅलेक्सी ए ३६ आणि गॅलेक्सी ए ५६ सोबत लॉन्च करू शकते.

* 'पोको' ने अधिकृतपणे एम ७ ५ जी भारतात लॉन्च करण्यास दुजोरा दिला आहे. कंपनीने दावा केला आहे की १०,००० रुपयांपेक्षा कमी किंमतीचा हा पहिला स्मार्टफोन असेल, जो १२ जीबी रॅम (६ जीबी फिजिकल रॅम + ६ व्हर्च्युअल रॅम) आणि स्नॅपड्रागन ४ जेन २ प्रोसेसरसह येईल.

# आयफोनच्या जुन्या वापरकर्त्यांना मिळणार व्हिज्युअल इंटेलिजेंस फीचर

टेक वर्ल्ड

'ॲपल'ने आयफोन वापरकर्त्यांना खूश केले आहे. कंपनीने घोषणा केली आहे की, आता आयफोन १५ प्रो आणि प्रो मॅक्स सारख्या जुन्या मॉडेल्सनाही आयफोन १६ मालिकेतील व्हिज्युअल इंटेलिजेंस फीचर मिळणार आहे. आगामी सॉफ्टवेअर अपडेटनंतर यूजर्स त्याचा आनंद घेऊ शकतील. आत्तापर्यंत हे फीचर फक्त आयफोन १६ सीरीजच्या उपकरणांमध्ये उपलब्ध होते. मात्र आता त्याची व्याप्ती वाढवली जात आहे.



या फीचरच्या मदतीने वापरकर्ते कोणत्याही वस्तू किंवा मजकुरावर कॅमेरा फोकस करू शकतात आणि त्याबद्दल माहिती मिळवू शकतात. हे ऑब्जेक्टची सर्व माहिती दर्शवू शकते आणि वापरकर्ते मजकुराचे भाषांतरदेखील करू शकतात. याशिवाय पुस्तकांचा सारांश सादर करणे, कुत्र्यांची जात ओळखणे अशी कामेही होऊ शकतात. हे कोणत्याही परदेशी भाषेचे भाषांतर करू शकते आणि यासाठी वापरकर्त्यांना इतर कोणत्याही ॲपवर जाण्याची आवश्यकता नाही. शोध क्षमता वाढवण्यासाठी गुगल आणि चॅटजीपीटी त्यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

**असे वापरू शकता**

आयफोन १५ प्रो वापरकर्ते ॲक्शन बटन किंवा कंट्रोल सेंटरमधून या वैशिष्ट्यात प्रवेश करु शकतील. कंपनीने आयफोन १६ मध्येदेखील हे फीचर दिले आहे आणि यामध्ये देखील यूजर्स कॅमेरा बटनाशिवाय याचा फायदा घेऊ शकतील. आयफोन १६ मालिकेत प्रवेश करण्यासाठी एक खास कॅमेरा बटन आहे.

# 'मायक्रोसॉफ्ट'चे अँड्राईडपाठोपाठ ॲपलसाठीही 'एआय' सॉफ्टवेअर

वाचाल तर खरं..

'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) च्या जगात टेक कंपन्यांमधील स्पर्धा वाढत आहे. 'ओपन एआय' ने स्पर्धा अधिक तीव्र केली आहे. आता तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज 'मायक्रोसॉफ्टने'ही या लढाईत प्रवेश केला आहे. कंपनीने नुकतेच आपले मोबाईल 'एआय ॲप' सादर केले आहे. 'मायक्रोसॉफ्ट'च्या 'एआय' मोबाईल ॲपला ला 'कॉपायलट' असे नाव देण्यात आले आहे. हे ॲप 'ओपन एआय' च्या चॅटजीपीटी ॲपसारखे आहे. यापूर्वी 'मायक्रोसॉफ्ट'ने 'अँड्रॉइड'साठी त्यांचे 'एआय' ॲप सादर केले होते. आता हे ॲपल वापरकर्त्यांसाठीदेखील सादर करण्यात आले आहे. आता 'मायक्रोसॉफ्ट'चे 'एआय ॲप' आयफोन आणि आयपॅडसारख्या ॲपल उपकरणांवरही वापरता येणार आहे.




**बिंग चॅटची अद्ययावत आवृत्ती**

'कॉपायलट' ॲप पूर्वी बिंग चॅट म्हणून ओळखले जात होते. 'मायक्रोसॉफ्ट'ने काही अपडेट्ससह 'कॉपायलट' नावाचे ॲप सादर केले आहे. 'कॉपायलट' एआय ॲप 'ओपन एआय'च्या जनरेटिव्ह मोबाइल ॲप एआय चॅटजीपीटी प्रमाणेच कार्य करते. अँड्रॉइड प्ले स्टोअरसह ॲपल ॲप स्टोअरवर आता कॉपायलट ॲप उपलब्ध आहे. यासह 'एआय'च्या क्षेत्रात स्पर्धेची नवी फेरी सुरू झाली आहे. चॅटजीपीटीच्या ॲपपेक्षा चांगले मायक्रोसॉफ्टचे एआय ॲप 'कॉपायलट' हे चॅट असिस्टंटप्रमाणे काम करते. हे ओपन एआय च्या कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल्सच्या क्षमतांचा वापर करते. हे ओपन एआयच्या स्वतःच्या चॅटजीपीटी ॲपपेक्षा चांगले असल्याचे सिद्ध होते आहे कारण ओपन एआयच्या चॅटजीपीटी ॲपची विनामूल्य आवृत्ती जीपीटी ३.५ वर चालते, तर मायक्रोसॉफ्टचे कॉपायलट ॲप ओपन एआयच्या नवीन मोठ्या भाषा मॉडेल -४ वर कार्य करते.


**या ॲपद्वारे काय करू शकता?**

कॉपायलट ॲपबाबत, मायक्रोसॉफ्टचा दावा आहे, की ते वापरकर्त्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरेल. या ॲपमध्ये चॅटबॉट कार्यक्षमता, डेल ई ३ द्वारा समर्थित प्रतिमा निर्मिती, ईमेल आणि दस्तऐवजांसाठी सुव्यवस्थित मजकूर मसुदा यांसारखी उत्कृष्ट वैशिष्ट्ये आहेत. हे ॲप साध्या मजकुराचे व्हिज्युअलमध्ये रूपांतर करण्यासदेखील सक्षम आहे.

# 'चॅटबॉट'मध्ये नवीन आवाज आणि प्रतिमा

भन्नाट

'ओपन एआय' त्याच्या चॅटबॉटमध्ये भिन्न आणि प्रगत ठेवण्यासाठी वेळोवेळी अनेक नवीन वैशिष्ट्ये जोडत आहे. कंपनीने सांगितले, की ती लवकरच 'चॅटबॉट'मध्ये नवीन आवाज आणि प्रतिमा क्षमता सादर करेल. त्यामुळे वापरकर्त्यांना त्यांचा आवाज वापरून प्रश्न विचारता येतील आणि मनवासारखा प्रतिसाद मिळू शकेल. म्हणजेच तुम्ही व्हॉइस असिस्टंटशी बोलता, त्याच पद्धतीने आता चॅटबॉटशीही बोलू शकाल. चॅटबॉट तुम्हाला तोंडी उत्तर देईल आणि तुम्ही क्रॉस प्रश्नदेखील विचारू शकाल.



'ओपन एआय' नुसार, 'चॅटजीपीटी' वापरकर्ते आता त्यांच्या मोबाईलवरून 'चॅटबॉट'शी संवाद साधू शकतात आणि रिअल-टाइम प्रतिसाद मिळवू शकतात. नवीन अपडेट सक्षम करण्यासाठी प्रथम मोबाइलवरील ॲप उघडा. नंतर सेटिंग्ज वर जा. येथे तुम्हाला नवीन वैशिष्ट्ये पर्यायाखाली व्हॉइस चॅट सक्षम करण्याचा पर्याय दिसेल. हे ऑन केल्यावर तुम्ही 'चॅटबॉट'शी बोलू शकता. 'ओपन एआय'ने सांगितले, की चॅट जीपीटी कंपनीच्या ओपन-सोर्स स्पीच रेकग्निशन सिस्टम व्हिस्परचा वापर करून बोललेले शब्द मजकुरात रुपांतरित करते.

आता तुम्ही 'एआय' चा चॅटबॉट उघडण्यासाठी चित्रांद्वारे प्रश्नदेखील विचारू शकता. उदाहरणार्थ, तुम्हाला सायकलचे सीट खाली करायचे असून ते कसे करायचे समजत नसेल, तर चॅटबॉटवरून याचे उत्तर मिळू शकते. यासाठी तुम्हाला सायकलचा फोटो चॅटबॉटशी शेअर करावा लागेल. त्यानंतर चॅटबॉट तुम्हाला स्टेप बाय स्टेप सीट खाली करण्याच्या टिप्स सांगेल. तुमच्याकडे टूलकिट असल्यास त्याचा फोटोदेखील अपलोड करू शकता आणि तुम्हाला कोणते टूल वापरायचे आहे ते चॅटबॉटला विचारू शकता.

'ओपन एआय' म्हणते की, व्हॉइस चॅट आणि इमेज रेकग्निशन वैशिष्ट्ये ही आता वापरकर्त्यांना उपलब्ध असतील. या लोकांना पुढील १४ दिवसांत यासंबंधीचे अपडेट मिळणे सुरू होईल. तुम्हाला लेटेस्ट अपडेट वापरायचा असेल तर चॅटजीपीटी प्लस चे सबस्क्रिप्शन घ्यावे लागेल.

# 'सॉफ्टवेअर'शी संबंध नसणारी व्यक्ती 'मेटा इंडिया'ची प्रमुख

अचिव्हर

**आजकाल 'सोशल मीडिया'वर प्रत्येकाचे अकाऊंट असते. एकमेकांशी संपर्कात राहण्यासाठी, चांगल्या-वाईट आठवणी शेअर करण्यासाठी फेसबुक, व्हॉट्सॲप आणि इंस्टाग्रामचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. 'मेटा' ही या तिघांची पॅरेंट कंपनी आहे. ती जगातील मोठ्या टेक कंपन्यांपैकी एक आहे. मात्र या कंपन्यांची 'इंडिया हेड' असणारी व्यक्ती भारतीय असून तिचा सॉफ्टवेअर जगाशी दूरदूरपर्यंत संबंध नाही, असे कोणी तुम्हाला सांगितले तर विश्वास बसेल का? नाही ना? परंतु हे खरे आहे. या क्षेत्रातील कोणतीही पदवी नसताना त्या 'मेटा'च्या इंडिया हेड कशा बनल्या? चला, जाणून घेऊ या.**

संध्या देवनाथन सध्या 'मेटा'च्या उपाध्यक्ष आणि 'मेटा इंडिया'च्या व्यवस्थापकीय संचालक आहेत. नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांना अजित मोहन यांच्या जागी 'मेटा इंडिया'चे प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले. यानंतर जानेवारी २०२३ मध्ये त्यांनी पदभार स्वीकारला. त्या वेळी संध्याजी 'मेटा'च्या 'गेमिंग प्रोजेक्ट'चे नेतृत्व करत होत्या. संध्या यांनी आपल्या करिअरमध्ये मोठी झेप घेतली आहे. त्यामुळे लाखो तरुणांसाठी त्या प्रेरणास्त्रोत बनल्या आहेत.

**'मेटा'मध्ये 'ग्रुप डायरेक्टर' म्हणून नियुक्ती**

संध्या देवनाथन २०१६ मध्ये 'मेटा ग्रुप'मध्ये सामील झाल्या. त्यांनी सिंगापूरमध्ये 'मेटा'मध्ये 'ग्रुप डायरेक्टर' म्हणून नियुक्ती स्वीकारली होती. 'साऊथ इस्ट एशियन मार्केट'मध्ये मेटाच्या ई-कॉमर्स, ट्रॅव्हल आणि आर्थिक सेवांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. त्यांनी सिंगापूर आणि व्हिएतनाममध्ये कंपनीचा व्यवसाय वाढवण्यास मदत केली. नंतर त्यांना सिंगापूरमध्ये व्यवस्थापकीय संचालक आणि व्हिएतनाममध्ये कंपनीची व्यवसाय प्रमुख बनवण्यात आले. यानंतर २०२० मध्ये त्या 'मेटा'च्या आशिया-पॅसिफिक प्रदेशातील गेमिंग प्रोजेक्टचे नेतृत्व करण्यासाठी त्या इंडोनेशियाला गेल्या.

**'लीडरशीप कोर्स'ने बदलले आयुष्य**

संध्या देवनाथन यांच्या शिक्षणाविषयी फार कमी जणांना माहिती आहे. संध्या यांनी आंध्र प्रदेश विद्यापीठातून 'केमिकल इंजिनीअरिंग'मध्ये बी. टेक केले. त्यांनी १९९४ ते १९९८ पर्यंत आंध्र' प्रदेशमध्ये शिक्षण घेतले. त्यानंतर १९९८ ते २००० पर्यंत त्यांनी दिल्ली विद्यापीठातून एमबीए केले. २०१४ मध्ये त्यांनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी बिझनेस स्कूलमधून लीडरशीपचा कोर्स केला आणि या कोर्समुळेच त्यांच्या करिअरला कलाटणी मिळाली. त्यांचे व्यवस्थापन कौशल्य बळकट झाले. पुढे याच कौशल्यामुळे त्यांना विविध जबाबदाऱ्या मिळाल्या.

**विविध पदांचा अनुभव**

'मेटा'मध्ये सामील होण्यापूर्वी संध्या यांनी साधारण २२ वर्षे वेगवेगळ्या क्षेत्रात काम केले. यात त्यांना करिअर समृद्ध करणारा अनुभव मिळाला. त्यांनी बँकिंग, पेमेंट आणि तंत्रज्ञान क्षेत्रातही काम केले. त्यांनी २००० ते २००७ पर्यंत 'सिटी ग्रुप'मध्ये विविध पदांवर काम केले. त्यानंतर २००९ ते २०१५ पर्यंत स्टँडर्ड चार्टर्डमध्ये काम केले.

**'मेटा'च्या मुख्य व्यवसाय अधिकाऱ्यांकडून कौतुक**

संध्या यांना प्रॉडक्ट इनोवेशन आणि पार्टनरशिप बिल्डिंग क्षेत्रातील तज्ज्ञ मानले जाते. 'मेटा'च्या मुख्य व्यवसाय अधिकारी मार्ने लेव्हिन यांनी संध्या यांची 'इंडिया हेड' म्हणून नियुक्ती केली.



## भारताने माघार घेतली, आम्ही नाही...! पाकिस्तानकडून नव्या वादाला सुरूवात

भारत विरुद्ध पाकिस्तान क्रिकेट वाद पुन्हा एकदा चिघळला आहे. वर्ल्ड चॅम्पियनशिप लीग (WCL 2025) स्पर्धेतील भारत-पाकिस्तान सामना भारतीय खेळाडूंच्या माघारीमुळे रद्द करण्यात आला. पण यानंतर पाकिस्तानकडून नव्या वादाला सुरुवात झाली आहे. वर्ल्ड चॅम्पियनशिप लीग मधील भारत-पाकिस्तान सामना रद्द झाल्यानंतर त्यांचा जरा जास्तच जळफळाट झालेला पाहायला मिळतोय. शाहिद आफ्रिदीच्या टीकेत सूर मिसळताना अनेक माजी पाकिस्तानी खेळाडूंनी भारताच्या भूमिकेवर टीका केली. आता तर पाकिस्तानी खेळाडूंनी नवा वाद सुरू केला आहे. IND vs PAK सामना रद्द झाल्याने दोन्ही संघांना १-१ गुण देण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला आहे, परंतु पाकिस्तानकडून आता त्याला विरोध होताना दिसतोय. भारताने माघार घेतली, आम्ही नाही... अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

# बुद्धिबळ स्पर्धेत गोरांक्ष खंडेलवाल, नैतिक माने, वेदांत काळे, शाश्वत गुप्ता यांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कुंटे चेस अकादमी यांच्या वतीने व किंडर स्पोर्टस एलएलपी यांच्या संलग्नतेने आयोजित चौथ्या मिलेनियम नॅशनल स्कुल व कुंटे चेस अकादमी विविध वयोगटातील बुद्धिबळ स्पर्धेत गोरांक्ष खंडेलवाल, नैतिक माने, वेदांत काळे, शाश्वत गुप्ता यांनी आपापल्या गटात अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले.

मिलेनियम नॅशनल स्कूल, कर्वे रोड येथे पार पडलेल्या या स्पर्धेत सातव्या फेरीत 9 वर्षाखालील गटात तिसऱ्या पटावरील लढतीत गोरांक्ष खंडेलवालने तनय माहेश्वरीचा पराभव करून 6 गुण व 32.5बुकोल्सकट सरासरीच्या जोरावर पहिला क्रमांक पटकावला. तर, रियांश पितळेने अनिश जवळकरचा पराभव करून 6 गुणांसह (30 बुकोल्स कट सरासरी) दुसरा क्रमांक पटकावला. विहान शहा याने अव्युक्त शर्माचा पराभव करून 6 गुणांसह (28 बुकोल्स कट सरासरी) तिसरा क्रमांक पटकावला.

11 वर्षाखालील गटात दुसऱ्या पटावरील सामन्यात नैतिक माने याने रिजूल कुराडेवर विजय मिळवत 6 गुणांसह विजेतेपद पटकावले. तर, पहिल्या पटावर क्षितिज प्रसाद याने राघव पावडेला बरोबरीत रोखले व 6गुणांसह (28.5बुकोल्स कट सरासरी) दुसरे स्थान मिळवले. हियान रेड्डीने विराट दोडकेला पराभुत करून 5.5 गुणांसह तिसरे स्थान पटकावले.

13 वर्षाखालील गटात पहिल्या पटावर वेदांत काळे याने लाव्या अग्रवालचा पराभव करून 6.5 गुणांसह विजेतपदाचा मान पटकावला. याच गटात अमेय चौधरी व अविरत चौहान यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. 15 वर्षाखालील गटात शाश्वत गुप्ता याने शिवम पेठकरवर विजय मिळवत 6 गुणांसह अव्वल स्थान मिळवले. तर, याच गटात आरूष बुडजादे(5.5गुण) याने दुसरे आणि परम जालन(5गुण) याने तिसरे स्थान पटकावले.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना करंडक व रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण आंतरराष्ट्रीय मास्टर अक्षय बोरगांवकर, अमृत बोरगांवकर, मनिषा बोरगांवकर, पीडीसीसीचे उपाध्यक्ष प्रकाश कुंटे, कुंटे चेस अकादमी च्या संचालिका मृणालिनी कुंटे - औरंगाबादकर, आंतरराष्ट्रीय मास्टर अभिषेक केळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चीफ आरबीटर आयए दिप्ती शिदोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## इंग्लंडची ती 'चूक' भारताच्या पथ्यावर पडणार

**नवी दिल्ली :** इंग्लंडने चौथ्या कसोटीसाठी त्यांचा अंतिम एकादश संघ जाहीर केला. ८ वर्षानंतर लिएम डॉसनचे पुनरागमन झाले आहे आणि हीच गोष्ट टीम इंडियाच्या पथ्यावर पडणारी आहे.भारत-इंग्लंड यांच्यातली चौथी कसोटी उद्यापासून मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड येथे खेळवली जाणार आहे. यजमान इंग्लंडने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली असल्याने मँचेस्टरमध्ये विजय मिळवणे टीम इंडियासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. दुखापतींमुळे टीम इंडियाला प्लेइंग इलेव्हन निवडणे आव्हानात्मक वाटत असले तरी इंग्लंडने आधीच त्यांचे अंतिम अकरा खेळाडू जाहीर केले आहेत. पण, इंग्लंडची ही घाई त्यांनाच महागात पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे आणि तशी भन्नाट आकडेवारी समोर आली आहे.



बुधवारपासून सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटीसाठी इंग्लंडने सोमवारी प्लेइंग इलेव्हन जाहीर केली. हॅम्पशायरचा फिरकीपटू लिएम डॉसन हा दुखापतग्रस्त शोएब बशीर याच्या जागी प्लेइंग इलेव्हनमध्ये परतला आहे. ८ वर्षानंतर डॉसन इंग्लंडकडून कसोटी खेळणार आहे. २०१७ मध्ये त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध इंग्लंडसाठी शेवटची कसोटी खेळली होती. त्याने ३ कसोटी सामन्यांत एकूण ८४ धावा केल्या, तर ७ विकेट्स घेतल्या आहेत.

## फुटबॉल स्पर्धेत लॉयला, व्हिबग्योर, मिलेनियम नॅशनल स्कूलचे विजय

**पुणे :** शिक्षण विभाग पुणे मनपा व जिल्हा क्रीडा परिषद आयोजित पंधरा वर्षांखालील गटाच्या सुब्रतो मुखर्जी करंडक शालेय फुटबॉल स्पर्धेत लॉयला, क्रूट मेमोरिअल स्कूल, व्हिबग्योर, मिलेनियम नॅशनल स्कूलने आपापल्या प्रतिस्पध्यांवर विजय मिळविले. बीएमसीसीच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत पाषाणच्या लॉयला प्रशालेने इंडो स्कॉट ग्लोबल स्कूलचा चार गोलने पराभव केला त्यात महत्त्वाचा वाटा अधिराजसिंगने केलेल्या (४ व ९ वे मिनीट) दोन गोलचा होता त्याला प्रणय संचेती व समर्थ वाघने प्रत्येकी एक गोल करून सुरेख साथ दिली. विघ्नेश सूर्यवंशीने दोन (७ व २३ वे मिनीटे तर विराज बाबरने केलेल्या स्कूलने ऑक्सफर्ड वर्ल्ड स्कूलचा एक गोलच्या जोरावर कुट मेमोरिअल ३-० असा पराभव केला.

आदित्यराज निम्हण व समर्थ भारद्वाजने केलेल्या प्रत्येकी एक गोलच्या जोरावर बालेवाडीच्या व्हिबग्योर स्कूलने खडकीच्या सेंट जोसेफ प्रशालेवर २-१ असा विजय मिळविला. पराभूत संघाकडून एकमेव गोल कुशल पोराईने केला. मिलेनियम नॅशनल स्कूलने हडपसरच्या म.न.पा. क्रीडानिकेतन ८३ मुलांची प्रशालेचा २-० असा पराभव केला. यावेळी आदित्य येलने व अथर्व इंगळीकरने प्रत्येकी एक गोल केला. सोहम दळवी व अर्णव भदाणेने केलेल्या प्रत्येकी एक गोलच्या जोरावर वारजेच्या आर्यन वर्ल्ड स्कूलने कोठारी नॅशनल स्कूलवर २-० असा विजय प्राप्त केला. सेंट मेरीज स्कूलने बाणेरच्या डॉ. श्यामराव कलमाडी स्कूलचा ४-० असा पराभव केला यावेळी शिवेन तलवार, निर्वाण वाडगे, शार्वील उत्तुरे व देवाशसिंगने प्रत्येकी एक गोल केला.

## यशराज, ध्रुवची आगेकूच कायम

**पुणे :** नांदेड येथे सुरू झालेल्या ज्युनियर गटाच्या राज्य निवड बॅडमिंटन स्पर्धेत मुलांच्या एकेरीत पुण्याच्या सार्थक पाटणकर, निक्षेप कात्रे, अवधूत कदम, यशराज कदम आणि ध्रुव निकमने विजय मिळविले. नांदेडमध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत सार्थक पाटणकरने तनिष्क केंजळेवर १९-१७, १५-१३ असा, कोणार्क इंचेकरने वेदांत सिद्धेश्वरेवर १०-१५, १५-७, १५-९ असा, बाराव्या मानांकित ध्रुव निकमने वेद भोईरवर १५-१३, १०-१५, १५-११ असा, पंधराव्या मानांकित अवधूत कदमने रूजुल वाडतेवर १५-१०, १५-४ असा विजय मिळविला. सातव्या मानांकित यशराज कदमने सलिल मणेरीचा १५-१०, १५-५ असा, निक्षेप कात्रेने हग्वेद भोसलेचा १५-५, १५-८ असा, तर कृष्णा जसूजाने स्पर्श हिंगेचा १५-८, १५-१३ असा पराभव केला.

एकोणीस वर्षांखालील मुलींच्या गटात सातव्या मानांकित जिज्ञासा चौधरीने निरंजनी देशपांडेला १५-८, १५-८ असे, जिया उतेकरने मृणाल पोतदारला १५-११, १५-१३ असे, अव्वल मानांकित युतिका चव्हाणने केया व्होराला १५-७, १५-८ असे, पुण्याच्या जुई जाधवने सृष्टी पाटीलला १५-५, १५-३ असे तर आठव्या मानांकित राधा गाडगीळने सिया वायदंडेला १५-४, १५-११ असे हरविले.

## आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेत ४० भारतीय खेळाडूंना संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी वर्षी जानेवारीमध्ये 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर'च्या रूपाने देशात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकल स्पर्धेचे आयोजन होत आहे. या स्पर्धेत यजमान या नात्याने ४० भारतीय सायकलपटूंना संधी देण्यात येणार असून, यात महाराष्ट्रातील १० खेळाडूंचा सामवेश असेल.

हिंदुस्थानात प्रथमच होत असलेल्या या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि गतीने तयारीला लागावे, असे निर्देश उपमुखमंत्री अजित पवार यांनी दिले. या स्पर्धेमुळे पुणे शहर व जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक पटलावर येईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर' स्पर्धेच्या अनुषंगाने आढावा बैठकीत ते बोलत होते. अजित पवार पुढे म्हणाले, 'या स्पर्धेसाठी आवश्यक रस्त्यांची दुरुस्ती, मार्गाची स्वच्छता, वैद्यकीय सुविधा आदी बाबींवर लक्ष द्यावे. स्पर्धेच्या आयोजनाबाबत प्रशासनाने वेळोवेळी आढावा घ्यावा. केलेल्या कार्यवाहीची माहिती वेळोवेळी सादर करावी. त्यानुसार आवश्यक तेथे त्रुटींची दुरुस्ती करता येईल.'

पुणे शहर व पिंपरी-चिंचवड, मावळ, मुळशी, पिंपरी-चिंचवड, भोर, वेल्हे, मुळशी, पुणे शहर, पुरंदर आणि बारामती अशी चार टप्प्यांत ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत सुमारे ५० देशांचे खेळाडू सहभागी व्हावेत, असा प्रयत्न सुरू आहे,' अशी माहिती सायकल फेडरेशन ऑफ इंडियाचे (सीएफआय) महासचिव मनिंदर पाल सिंग यांनी द दिली. 'ही सायकल स्पर्धा पाहून प्रेरणा मिळालेल्या नवोदित खेळाडूंच्या सरावासाठी शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे वेलोड्रम उभारण्यासाठी ३५ कोटी रुपयांचा प्रस्ताव केला असल्याचे राज्याच्या क्रोडा आयुक्त शीतल तेली उगले यांनी सांगितले.

### 'पीडीएफए लीग' फुटबॉल स्पर्धा

## स्पोर्टस्‌मेनिया एफसी, दुर्गा सॉकर क्लब, लेजंड्स फुटबॉल ॲकॅडमी संघ विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटने (पीडीएफए) तर्फे आयोजित 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात स्पोर्टस्‌मेनिया एफसी, दुर्गा सॉकर क्लब, लेजंड्स फुटबॉल ॲकॅडमी, पुना सोशल एससी, साई फुटबॉल ॲकॅडमी आणि युनिक वानवडी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

खराडी येथील टॉपप्ले फुटबॉल मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या व्दितीय श्रेणी गटाच्या झालेल्या सामन्यामध्ये स्पोर्टस्‌मेनिया एफसी संघाने रेंजहिल्स् मिलान संघाचा ११-० असा धुव्वा उडविला. नील सुदर्शन याने सर्वाधिक चार गोल तर, अथर्व निवडेकर याने दोन गोल केले. अविनाश चक्रवती, रूनी चिनोदरी, अक्षय निटवे, राजवर्धन पी. आणि ऑस्टॅन लाझरस यांनी प्रत्येकी एकेक गोल केले. मयुर वाघिरे आणि तुषार दुर्गा यांनी केलेल्या गोलांमुळे दुर्गा सॉकर क्लबने इंद्रायणी एफसीचा २-१ असा पराभव केला. लेजंड्स फुटबॉल ॲकॅडमीने एफसी जोसेफ संघाचा ७-१ असा सहज पराभव केला. लेजंड्स संघाकडून विन्सेंट जोसेफ आणि कार्तिक देसाई यांनी प्रत्येकी दोन गोल तर, अखिल पी., रोहीत सी. आणि ऑस्टिन जोसेफ यांनी प्रत्येकी एकेक गोल केला.

संजय थापा, स्वप्निल गायकवाड आणि जेसी दोडके यांनी केलेल्या गोलांच्या मदतीने पुना सोशल एससी संघाने उत्कर्ष क्रिडा मंच कोथरूड ब संघाचा ३-२ असा पराभव केला. यश भाटीया आणि शुभम गिरी यांच्या गोलपुर्ण कामगिरीच्या जोरावर साई फुटबॉल ॲकॅडमीने सनी डेज् एफसीचा २-० असा सहज पराभव केला. टायसन पॉल याने केलेल्या दोन गोलांच्या मदतीने युनिक वानवडी सांने सिटी एफसी पुणे संघाचा २-१ असा पराभव केला.

### राज्यस्तरीय १५ व १७ वर्षाखालील बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत

## विश्वजित थविल, शरयू रांजणे, ऋत्व सजवान, शौर्या मडवी यांना अग्रमानांकन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुधांशु बॅडमिंटन अकादमी यांच्या वतीने व रोहित ग्रुप यांच्या सहकार्याने आयोजित पीवायसी - पिनॅकल फाऊंडेशन आणि एसबीए कप पुरस्कृत योनेक्स सनराईज राज्यस्तरीय 15 व 17 वर्षाखालील बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत विश्वजित थविल, शरयू रांजणे, ऋत्व सजवान, शौर्या मडवी यांना अग्र मानांकन देण्यात आले आहे.

ही स्पर्धा पीवायसी हिंदू जिमखाना व डेक्कन जिमखाना बॅडमिंटन कोर्ट या ठिकाणी 22 ते 27 जुलै 2025 या कालावधीत रंगणार आहे. 15 वर्षाखालील मुलांच्या गटात नाशिकच्या विश्वजित थविलला प्रथम मानांकन देण्यात आले आहे. तर याच मुलींच्या गटात पुण्याच्या शरयू रांजणे हिला अव्वल मानांकन मिळाले आहे.



17 वर्षाखालील मुलांच्या गटात नागपूरच्या ऋत्व सजवान याला तर, मुलींच्या गटात नागपूरच्या शौर्या मडवीला प्रथम मानांकन देण्यात आले आहे.

खेळाडूंची मानांकन यादी खालीलप्रमाणे:

15 वर्षाखालील मुले: 1. विश्वजित थविल (नाशिक), 2.चिन्मय फणसे (पुणे), 3.आदित्य याउल (नागपूर), 4.मयंक राजपूत (ठाणे), 5.सिब्तैनराझा सोमजी (पुणे), 6.मयुरेश भुटकी

15 वर्षाखालील मुली: 1.शरयू रांजणे(पुणे), 2.सोयरा शेलार(पुणे), 3.कायरा रैना(पुणे), 4.ख्याती कत्रे(पुणे), 5.शर्वरी सुरवसे(पुणे);

17 वर्षाखालील मुले: 1. ऋत्व सजवान (नागपूर), 2.यश ढेंबरे (ठाणे), 3.सचित त्रिपाठी (पुणे), 4.अवधूत कदम (पुणे), 5.हर्षित माहीमकर, 6.ओजस जोशी (पुणे), 7.अभिक शर्मा (पुणे), 8. हर्षित नेरकर(नाशिक);

17 वर्षाखालील मुली: 1. शौर्या मडवी (नागपूर), 2. गाथा सूर्यवंशी, 3. धृती जोशी (पुणे), 4. प्रांजल शिंदे (पालघर), 5.केतकी थिटे, 6.अनुष्का इप्टे, 7.पूर्वा मुंडले (पुणे), 8. जुई जाधव(पुणे);

## चेंबूर जिमखाना कॅरम स्पर्धेत सागर व आकांक्षाला प्रथम मानांकन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** द चेंबूर जिमखान्याच्या वतीने तसेच महाराष्ट्र कॅरम असोसिएशन पुणे आणि मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेच्या मान्यतेने ४ थी चेंबूर जिमखाना राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरीत पुण्याच्या सागर वाघमारेला प्रथम मानांकन तर यंदाच्या राज्य विजेत्या मुंबईच्या प्रशांत मोरेला द्वितीय मानांकन देण्यात आले आहे. महिला एकेरीत प्रथम मानांकन मिळवण्याचा मान यंदाच्या शिव छत्रपती पुरस्कार विजेत्या रत्नागिरीच्या आकांक्षा कदमला मिळाला असून ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरला दुसरे मानांकन प्राप्त झाले.



स्पधेतील सुरुवातीच्या काही महत्वाच्या सामान्यांचे तसेच उपउपांत्य फेरीपासूनच्या सामान्यांचे थेट प्रसारण महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या युट्युब चॅनेलवरून करण्यात येणार असून मराठी, हिंदी व इंग्रजीमधून या समान्यांचे समालोचन करण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेते तब्बल १ लाख १० हजारांची कमाई करणार आहेत. यंदाच्या मोसमात राज्यातील हि पाचवी स्पर्धा आहे.

स्पर्धेतील मानांकन पुढील प्रमाणे.

**पुरुष एकेरी :** १) सागर वाघमारे (पुणे), २) प्रशांत मोरे (मुंबई), ३) झैद अहमद फारुकी (ठाणे), ४) प्रफुल मोरे (मुंबई), ५) समीर महम्मद जाबीर अन्सारी (ठाणे), ६) विकास धारिया (मुंबई), ७) राहुल सोळंकी (मुंबई), ८) अभिजित त्रिपनकर ( पुणे)

**महिला एकेरी :** १) आकांक्षा कदम (रत्नागिरी), २) समृद्धी घाडीगावकर (ठाणे), ३) मिताली पाठक ( मुंबई), ४) केशर निर्गुण (सिंधुदुर्ग), ५) प्राजक्ता नारायणकर (मुंबई उपनगर), ६) अंबिका हरिथ ( मुंबई), ७) रिंकी कुमारी (मुंबई), ८) ऐशा साजिद खान (मुंबई).

### बुवा साळवी चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत

## पुरुष विभागात सतेज संघ व महिला विभागात राजमाता जिजाऊ विजेता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सतेज संघ,बाणेर यांच्या वतीने " कबड्डी महर्षी स्व. शंकरराव ऊर्फ बुवा साळवी चषक निमंत्रित पुरुष व महिला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा - २०२५ व " बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन यांच्या विद्यमाने पुरुष व महिला " स्वर्गीय शंकरराव उर्फ बुवा साळवी चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत पुरुष विभागात सतेज संघ विजेता व नांदेडचा एस.एम. पटेल स्पोर्टस फाऊंडेशन उपविजेता तर महिला विभागात राजमाता जिजाऊ विजेता तर महेशदादा स्पोर्टस संघ उपविजेता ठरला.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, स्पर्धा आयोजक व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह व पुणे महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष बाबुराव चांदेरे, खजिनदार मंगल पांडे, क्रीडा आयुक्त शितल तेली-उगले, पुणे शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष राहुल बालवडकर, पुणे शहर युवक राष्ट्रवादी कॉंग्रेसचे समिर चांदेर, पीडीसीसी बँकेचे उपाध्यक्ष सुनिल चांदेरे, कविता आल्हाट, नाना काटे, निर्मला नवले, ज्ञानेश्वर तापकीर, गजानन बालवडकर, रोहिणी चिमटे उपस्थित होते. पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष दत्तात्रय कळमकर, सरकार्यवाह दत्तात्रय झिंजुर्डे सर्व पदाधिकारी, यास्पर्धेचे निरिक्षक बजरंग परदेशी, पंच प्रमुख मालोजी भोसले, पुणे लीग स्पर्धेचे पंच प्रमुख इम्रान शेख, सहाय्यक अनिल यादव, आदी उपस्थित होते.



पुरुष विभागात झालेल्या अंतिम सामन्यात बाणेरच्या सतेज संघाने नांदेडच्या एस.एम.पटेल स्पोर्टस फाऊंडेशन संघावर ४०-२२ गुणांनी एकतर्फी विजय मिळवित स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. मध्यंतराला सतेज संघाकडे २७-१२ गुणांची आघाडी होती. सतेज संघाच्या पृथ्वीराज शिंदे, सोहम मुजगल यांनी चौफेर आक्रमण करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. किरण मगर व सौरभ देशमुख यांनी सुरेख पकडी घेतल्या. एस.एस.पटेल स्पोर्टस फाऊंडेशनच्या आर्यन ढवळे, मोबीन शेख यांनी काहीसा प्रतिकार केला. तर वैभव मोरे याने पकडी केल्या.

अत्यंत दोलायमान झालेल्या चुरशीच्या सामन्यात राजमाता जिजाऊ संघाने महेशदादा स्पोर्टस फाऊंडेशन संघावर सुवर्ण चढाईत २७-२६ असा विजय मिळविला. मध्यंतराला १०-१३ असा पिछाडीवर होता. शेवटच्या मिनिटापर्यंत अत्यंत चुरशीच्याव दोलायमान अवस्थेत हा सामना होता. शेवटच्या मिनिटात हा सामना २१-२१ अशा समान गुणांवर संपला. त्यानंतर दोन्ही संघाना नियमानुसार पाच पाच चढाया दिल्या. दोन्ही संघाच्या प्रशिक्षकांनी एक एक गुण देण्याची रणनिती आखल्याचे दिसून आले. परिणामी पाच पाच चढायांमध्येही दोन्ही संघानी २६-२६ अशी बरोबरी साधली. त्यानंतर सरपंच गजानन पाटील यांनी दोन्ही संघनायकांना बोलावून पुन्हा नाणेफेक घेतली. ही नाणेफेक महेशदादा स्पोर्टस संघाने जिंकली व खेळाडूंनी एकच जल्लोश केला. महेशदादा स्पोर्टस संघाच्या आर्या पाटील हिने अपेक्षे प्रमाणे चढाई केली व तिची राजमाता जिजाऊच्या कोपरा रक्षक असलेल्या कोमल आवळे हिने चवडा पकड घेत पकड केली. तिला मध्यरक्षक असलेल्या प्रतिक्षा लांडगे व ऋतुजा निगडे यांनी मदत करीत पकड केली व आपल्या संघाला विजय मिळवून दिला. या सामन्यात राजमाता जिजाऊ संघाच्या निकिता पडवळ व रेखा सावंत यांनी चांगला प्रतिकार केला. तर कोमल आवळे व प्रतिक्षा लांडगे यांनी सुरेख पकडी केल्या.

#रा